जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
जळगाव, शुक्रवार, २० मार्च २०२६ । युगाब्द ५१२७ । वर्ष : ३२ । अंक : २२१ । मूल्य ४ रुपये । पृष्ठे ८ + ४ = १२ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध


**चोपड्यात ३० गाळे सील अन् ५० नळजोडण्या खंडित**

वाचा पान ८ वर

# माध्यमांच्या अभिव्यक्तीत विवेक, शैली, वैचारिक बांधिलकी हवी

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे मत

**नागपूर, १९ मार्च**

माध्यमांच्या क्षेत्रात नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक असले, तरी त्याचा समाजाच्या कल्याणासाठी उपयोग झाला पाहिजे. त्यामुळेच नव्या तंत्राचा अंगीकार करताना देखील माध्यमांच्या अभिव्यक्तीत विवेक, शैली आणि वैचारिक बांधिलकी असली पाहिजे, असे मत रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी आज येथे व्यक्त केले.

दै. तरुण भारतचा शताब्दीपूर्ती सोहळा गुरुवारी गुढीपाडव्याला अत्यंत थाटात, उत्साहात आणि भरगच्च उपस्थितीत कविवर्य सुरेश भट सभागृहात झाला.

पान ७ वर



सरसंघचालकांची प्रकट मुलाखत घेताना शैलेश पांडे व रवींद्र देशपांडे

## पुणे आवृत्ती सुरू झाल्याचा आनंद

पुणे आवृत्तीबाबतच्या प्रश्नाबाबत सरसंघचालक म्हणाले की, अनेक प्रकारच्या अडचणी येऊनही संघ वाढला; तेच तरुण भारतबद्दल म्हणता येईल. माझ्या बालपणी तरुण भारत वाचला का, अशी विचारणा होत असे. माझा आणि तरुण भारतचा संबंध इतका घनिष्ठ आहे. आता पुण्यात तरुण भारतची आवृत्ती सुरू होत आहे, याचा आनंद वाटतो. तेथील स्वयंसेवकांना तरुण भारतबद्दल आपुलकी आहेच. ते सहकार्य करतीलच. वैचारिक प्रतिबद्धता आणि व्यावसायिक दृष्टिकोन अंगीकारून पुढे जाता येते, हे नागपूरच्या तरुण भारतने गेल्या काही वर्षांत सिद्ध केलेच आहे. वर्तमानपत्र कसे चालवायचे हे तरुण भारत परिवाराला कळते. त्याच पद्धतीने पुण्यातही वृत्तपत्राचे संचालन केल्यास ते यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

(प. पू. सरसंघचालकांची सविस्तर मुलाखत वाचा २२ तारखेच्या 'आसमंत' पुरवणीत)

## विचारपुष्प



व्यक्तिगत स्वातंत्र्य व संघटनेत त्यावर येणाऱ्या मर्यादा, यासंबंधी व्यक्तीचा दृष्टिकोन काय असावा, याचाही आपण विचार केला पाहिजे. सर्वसामान्य मनुष्याची आणि ध्येयसमर्पित मनुष्याची व्यक्तिगत स्वातंत्र्यासंबंधीची कल्पना यात जमीन-अस्मानचे अंतर आहे. ध्येय साध्य करण्यासाठी आपल्यावर सोपविलेले कार्य उत्कृष्टपणे करणे हेच ध्येयनिष्ठ स्वयंसेवकाकरिता सर्वांत महत्त्वाचे काम असते.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# मेथी, मालपूर परिसरात मेघगर्जनेसह अवकाळी पाऊस

## अंजनविहिरे येथे गारपीट; गहू, हरभऱ्यासह भाजीपाला पिकांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**मेथी (शिंदखेडा), १९ मार्च**

शिंदखेडा तालुक्यातील मेथी, मालपूरसह अंजनविहिरे, देगाव, सोनशेलू, खर्दे, मांडळ, वाडी, कामपूर, विखरण परिसरात गुरुवारी (१९ मार्च) सायंकाळी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचे आगमन झाले. अवकाळी पावसाने काढणीला आलेला गहू, हरभरा यांसह भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले. अंजनविहिरे येथे अवकाळी पावसात गारांचाही वर्षाव झाला.



राज्यातील विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये १७ ते २० मार्चदरम्यान दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला आहे. विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही प्रमाणात गारपिटीची शक्यताही वर्तविण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून वातावरणात होणारा बदल शेतकऱ्यांची धाकधूक वाढवीत होता. गुरुवारी सायंकाळी अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या स्वप्नांवर वरवंटा फिरविला. परिसरात बराच काळ वीजपुरवठा खंडित झाला होता.

शेताच्या बांधावर कापून ठेवलेला हरभरा झाकण्यासाठी शेतकरी व कुटुंबांची तारांबळ उडाल्याचे दिसून आले. अंजनविहिरे येथे अवकाळी पावसात गारांचाही वर्षाव झाला.

**मालपूर परिसरात तुरळक सरी**

मालपूरसह परिसरात गुरुवारी सायंकाळी जोरदार वादळ वाऱ्यासह अवकाळी पाऊन आल्याने रब्बी हंगामातील गहू, हरभरा झाकण्यासाठी शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. गव्हाचे उभे पीक काढण्यासाठी शेतकऱ्यांनी हार्वेस्टर मालकाकडे रांगा लावल्या. तासाभरानंतर हलक्या सरींना सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांचा जीव मेटाकुटीस आला. जोरदार वादळामुळे हरभरा पिकावरील पालही उडाल्याने अखेर हतबल होऊन शेतकऱ्यांनी गावाची वाट धरली. अजून दोन दिवस अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविल्यामुळे शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे.



# जळगावच्या नंदिनी पाटील यांची 'यूपीएससी'त ऐतिहासिक झेप!

**जळगाव :** लेवा पाटीदार समाजातील नंदिनी संजीव पाटील यांनी यूपीएससी परीक्षेत ऑल इंडिया रँक-५१२ मिळविली. विशेष म्हणजे, समाजातील यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्या त्या पहिलीच मुलगी ठरली.

नंदिनी या संजीव देविदास पाटील व शिल्पा संजीव पाटील यांची कन्या आहेत. आई-वडिलांनी शिक्षणाची परंपरा, प्रामाणिकपणा आणि कष्टाची शिकवण, हेच संस्कार नंदिनी यांच्या यशामागचा खंबीर पाया ठरले. लेवा पाटीदार समाज केवळ कष्टाळूपणासाठी नव्हे, तर शिक्षणनिष्ठा, प्रामाणिकपणा, शिस्त आणि प्रगतिशील विचारसरणी यासाठी ओळखला जातो. बुद्धिमत्तेच्या जोरावर आणि कर्तृत्वाच्या बळावर समाजाने शेतीपासून उद्योग, शिक्षण, प्रशासन आणि विविध क्षेत्रांत वेगळी ओळख निर्माण केली आहे. नंदिनी पाटील यांनी या परंपरेला नवी उंची देत, लेवा समाजाच्या सामर्थ्याची आणि संस्कारांची झलक देशपातळीवर दाखवून दिली आहे. नंदिनी पाटील यांचा हा प्रवास समाजातील प्रत्येक तरुण-तरुणीसाठी दीपस्तंभ आहे. दरम्यान, धनंजय भास्कर कोल्हे यांच्या प्रतिकूल परिस्थितीतून, अपार जिद्द, अथक परिश्रम आणि अढळ आत्मविश्वासाच्या बळावर नंदिनी पाटील यांनी देदीप्यमान यश मिळविले.

## महत्त्वाचे

### एचडीएफसी बँकेच्या अध्यक्षांचा राजीनामा

**नवी दिल्ली :** खासगी क्षेत्रातील सर्वात मोठी बँक एचडीएफसीचे अध्यक्ष आणि स्वतंत्र संचालक अतनू चक्रवर्ती यांनी गुरुवारी पदाचा राजीनामा दिला. नैतिक कारणामुळे राजीनाम्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे. केकी मिस्त्री यांची अंतरिम अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यास आरबीआयने मंजुरी दिली आहे. चक्रवर्ती यांच्या राजीनाम्याचे वृत समोर आल्यानंतर एचडीएफसी बँकेचे शेअर्स नऊ टक्क्यांनी घसरले, ज्यामुळे बँकेचे एकूण बाजार मूल्य ६५,१७६ कोटींनी घसरले. राजीनामा पत्रात चक्रवर्ती यांनी म्हटले की, गेल्या दोन वर्षांत, मी बँकेमध्ये अशा काही घटना आणि कार्यपद्धती पाहिल्या आहेत, ज्या माझ्या वैयक्तिक मूल्यांशी आणि नैतिकतेशी विसंगत होत्या. हाच माझ्या निर्णयाचा आधार आहे. बँकेतील कार्यपद्धती आक्षेपार्ह असून, मी अशा वातावरणात काम करू शकत नाही.

### नायजेरियात आत्मघाती हल्ला; ४८ नागरिक ठार

**अबुजा :** नायजेरियातील मैदुगुरी येथे झालेल्या आत्मघाती हल्ल्यात ४८ नागरिकांचा मृत्यू झाला, तर १०० पेक्षा जास्त जखमी झाले आहेत. संघर्षग्रस्त शहरातील अलिकडच्या काळातील हा सर्वांत प्राणघातक हल्ल्यांपैकी एक आहे. पोलिस विभागाचे प्रवक्ते नाहूम केनेथ डासो यांनी सांगितले की, मैदुगुरी येथील बाजारपेठेत बुधवारी अचानक स्फोट झाला. बचाव पथकाने जखमींना रुग्णालयात हलविले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आतापर्यंत ४८ नागरिकांच्या मृत्यूला दुजोरा दिला. १०० पेक्षा अधिक जणांवर उपचार सुरू आहेत. प्राथमिक तपासात बोको हरामने आत्मघाती स्फोट घडविल्याची माहिती समोर आली. मात्र, अद्याप कोणत्याही गटाने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही.

## धर्मांतराविरोधातील विधेयक छत्तीसगडमध्ये झाले पारित

**रायपूर, १९ मार्च**

छत्तीसगड विधानसभेने बळजबरी, प्रलोभन, फसवणूक किंवा चुकीची माहिती देऊन होणारे धर्मांतर रोखण्याच्या उद्देशाने एक विधेयक पारित केले. यात सामूहिक धर्मांतराच्या प्रकरणांमध्ये जन्मठेपेच्या शिक्षेसह कठोर तरतुदी आहेत.

उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांनी सभागृहात सादर केलेले 'छत्तीसगड धर्म स्वातंत्र्य विधेयक २०२६ मांडण्यापूर्वी ते विचारविनिमयासाठी निवडक समितीकडे सोपवावे ही काँग्रेस आमदारांची मागणी पीठासीन अधिकाऱ्यांनी फेटाळल्यानंतर काँग्रेस आमदारांनी केलेल्या बहिष्काराच्या पृष्ठभूमीवर आणि पाच तासांच्या चर्चेनंतर मंजूर करण्यात आले.

विधेयकावरील चर्चेदरम्यान गृहखात्याचीही जबाबदारी सांभाळणाऱ्या शर्मा यांनी काँग्रेसवर 'व्होट बँके'चे राजकारण करीत असल्याचा आरोप केला. शर्मा म्हणाले की, सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन हे विधेयक सादर करण्यात आले.

# भविष्यातील युद्धांत ड्रोन निर्णायक : संरक्षणमंत्री

## भारताला स्वावलंबनाशिवाय पर्याय नाही

**नवी दिल्ली, १९ मार्च**

भविष्यातील युद्धांमध्ये ड्रोन आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञान निर्णायक ठरणार आहे. भारताला ड्रोन निर्मिती क्षेत्रात स्वावलंबी होण्याशिवाय पर्याय नाही. स्वावलंबन केवळ उत्पादन स्तरावरच नव्हे, तर घटक स्तरावरही आवश्यक आहे. ड्रोनच्या साच्यापासून ते सॉफ्टवेअर, इंजिन आणि बॅटरीपर्यंत सर्व काही भारतातच तयार होणे काळाची गरज असल्याचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले.

राजधानी दिल्लीत गुरुवारी राष्ट्रीय संरक्षण उद्योग परिषदेचे उद्घाटन राजनाथ सिंह यांच्या हस्ते पार



पडले, तसेच त्यांनी 'डिफेन्स इंडिया स्टार्टअप चॅलेंज' च्या १४ व्या आवृत्तीचा शुभारंभ केला. यावेळी संबोधित करताना संरक्षण मंत्री म्हणाले, जागतिक आव्हाने सातत्याने वाढत आहेत. आधी रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध आणि आता इराण व इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे ड्रोनचे महत्त्व लक्षणीयरीत्या वाढले आहे. भारताने एक मजबूत ड्रोन उत्पादन परिसंस्था विकसित करणे गरजेचे आहे. येत्या काही वर्षांत आपल्याला ड्रोन उत्पादनाचे जागतिक केंद्र बनावे लागेल. मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षांनी ड्रोन आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाचे महत्त्व सिद्ध केले आहे. संपूर्ण जग रशिया आणि युक्रेन, तसेच इराण आणि इस्रायल यांच्यातील भीषण संघर्ष पाहत असताना, भविष्यातील युद्धांमध्ये ड्रोन आणि ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाची महत्त्वपूर्ण भूमिका महत्त्वाची असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

### इतरांवर अवलंबून राहणे धोक्याचे

**ड्रोन निर्मितीच्या महत्त्वासंदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, आजच्या काळात रणनीतिक स्वायत्तता, संरक्षण सज्जता आणि आत्मनिर्भरतेसाठी स्वदेशी ड्रोन उत्पादनाची परिसंस्था आवश्यक आहे. भारताच्या संरक्षण सज्जतेसाठी आणि सामरिक स्वायत्ततेसाठी, ड्रोन निर्मितीमध्ये पूर्णपणे आत्मनिर्भर होणे अत्यावश्यक आहे, इतरांवर अवलंबून राहणे धोक्याचे ठरेल.**

## इराणच्या तेलावरील निर्बंध हटवणार : बेसेंट

**वॉशिंग्टन, १९ मार्च**

जागतिक पुरवठा वाढवण्यासाठी आणि किमती नियंत्रित ठेवण्यासाठी लवकरच इराणवरील तेलाचे निर्बंध शिथिल केले जातील, अशी माहिती अमेरिकेचे महसूल सचिव स्कॉट बेसंट यांनी गुरुवारी दिली.

आखाती देशातील संघर्ष आणि होर्मुझ जलमार्गातील जहाजांची वाहतूक विस्कळीत झाल्याने जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर उच्चांक गाठत आहे, अशातच किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी इराणच्या तेल विक्रीवर लादलेले निर्बंध काही काळासाठी हटवले जाऊ शकते, असे बेसेंट यांनी स्पष्ट केले.

# शेअर बाजार धडाडधम्

## जून २०२४ नंतरची सर्वात मोठी पडझड



**मुंबई, १९ मार्च**

जागतिक बाजारातील नकारात्मक संकेत आणि कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी वाढ यामुळे गुरुवारी भारतीय शेअर बाजारात मोठी पडझड झाली. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या तेजीला पूर्णविराम देत सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही निर्देशांकांमध्ये ३ टक्क्यांहून अधिक घसरण नोंदविण्यात आली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 'सेन्सेक्स' २,४९६.८९ अंकांनी, म्हणजेच ३.२६ टक्क्यांनी घसरून ७४,२०७.२४ वर बंद झाला. जून २०२४ नंतरची ही एका दिवसातील सर्वात मोठी घसरण ठरली.

दिवसभरातील व्यवहारादरम्यान सेन्सेक्स २,७५३.१८ अंकांच्या घसरणीसह ७३,९५०.९५ या नीचांकी पातळीवर पोहोचला होता. दुसरीकडे राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक 'निफ्टी' ७७५.६५ अंकांनी कोसळून २३,००२.१५ वर स्थिरावला. एचडीएफसी बँकेतील मोठ्या विक्रीमुळे बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रातील समभागांमध्ये ३ टक्क्यांपर्यंत घसरण दिसून आली. मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांतही प्रत्येकी २ टक्क्यांची घट झाली.

## चांदी-सोन्याचे दर गडगडले

**नवी दिल्ली, १९ मार्च**

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या युद्धाचा फटका सोने-चांदीच्या दरालाही बसला आहे. गुरूवारी सोने तब्बल १२ हजार तर चांदीचे दर ३४ हजार रुपयांनी घसरले आहेत.

अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व्ह'ने व्याजदर स्थिर ठेवण्याच्या निर्णयामुळे सोने आणि चांदीचे दर गडगडले, असे सांगण्यात येत आहे. एमसीएक्सवर सोन्याच्या दरात जवळपास १२,००० रुपयांची चांदीच्या दरात जवळपास ३४,००० ची घसरण झाली आहे. मागील सत्रात ५ मे डिलिव्हरीची चांदी २,४८,१९४ प्रति किलोवर बंद झाली होती. परंतु आज ती २,४५,००० वर उघडली.




### सोन्याचीही चमक फिकी

**मागील सत्रात २ एप्रिलच्या डिलिव्हरीचे सोने १,५३,०२५ प्रति १० ग्रॅमवर बंद झाले होते. आज, ते १,५१,९४१ वर उघडले. व्यवहारादरम्यान, त्यात ११,९०४ ची घसरण होऊन ते १,४१,१२१ वर आले. सायंकाळी ७:१५ वाजता सोन्याचा भाव १०,००५ रुपये म्हणजेच सुमारे ७ टक्क्यांनी घसरून १४३,२५९ वर पोहोचला होता. ५ जूनच्या डिलिव्हरीच्या सोन्याच्या दरातही १०,००० रुपयांपेक्षा जास्त घसरण झाली.**

# प्रभू श्रीरामासमोर नतमस्तक होणे भारतमातेला वंदन करण्यासारखे

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे प्रतिपादन




अयोध्या येथील राममंदिरात गुरुवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते श्रीराम यंत्राची स्थापना करण्यात आली. या कार्यक्रमाला उपस्थित उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि रा. स्व. संघाचे अ. भा. निमंत्रित सदस्य भय्याजी जोशी

**अयोध्या, १९ मार्च**

राम जन्मभूमीवरील भूमिपूजन, येथील प्राणप्रतिष्ठा, भाविकांसाठी रामदरबाराचे उद्घाटन आणि मंदिराच्या शिखरावर धर्मध्वजाचे आरोहण हे सर्व आपल्या इतिहासातील सुवर्णक्षण आहेत. प्रभू श्रीराम यांच्यासमोर नतमस्तक होणे हे भारतमातेला वंदन करण्यासारखे आहे, असे उद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढले आहे. मुर्मू यांनी गुरुवारी अयोध्येला भेट देऊन रामललाचे दर्शन घेतले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी रा. स्व. संघाचे अ. भा. निमंत्रित सदस्य भय्याजी जोशी उपस्थित होते.

'जय श्रीराम' या जयघोषाने आपल्या भाषणाची सुरुवात करताना त्या म्हणाल्या, "भगवान श्रीरामाच्या आशीर्वादाने भारत २०२७ पर्यंत किंवा त्याआधी विकसित राष्ट्र बनू शकेल. निष्ठावान भक्त आणि भक्ती या दोघांचाही मार्ग एकच आहे. प्रभू श्रीरामचरणी नतमस्तक होणे आणि भारतमातेला वंदन करणे हे दोन्ही एकच आहे."

या भेटीत त्यांनी विशेष धार्मिक विधींमध्ये सहभाग घेतला आणि 'श्रीराम यंत्र' म्हणून ओळखली जाणारी १५० किलो वजनाची सोन्याचा मुलामा असलेली धातूची पट्टी स्थापित केली. राष्ट्रपती म्हणाल्या की, जी भावना प्रभू रामाप्रती भक्तीची प्रेरणा देते, तीच भावना देशभक्तीचीही प्रेरणा देते. ज्या हृदयांमध्ये 'नमामि रामं रघुवंश नाथम्'चे सूर उमटतात, त्याच हृदयातून आपले राष्ट्रगीत 'वंदे मातरम्' गायले जाते. भारत एका विकसित आणि समताधिष्ठित समाजाच्या उभारणीच्या दिशेने सातत्यपूर्ण प्रगती करीत आहे. अशा समाजाची संकल्पना गोस्वामी तुलसीदासांनी वर्णन केलेल्या रामराज्याच्या कल्पनेत प्रतिबिंबित झालेली दिसते.

रावणाचा वध केल्यानंतर माता सीता आणि लक्ष्मण यांच्यासह भगवान श्रीरामांचे अयोध्येत झालेल्या आगमनाचे अत्यंत कलात्मक असे रेखाचित्र आपल्या संविधानाच्या मूळ प्रतीमध्ये सुशोभित करण्यात आले आहे. ही रेषाकृती मूलभूत हक्कांच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा तिसऱ्या भागाच्या सुरुवातीला आढळते, असे मुर्मू म्हणाल्या.

### अयोध्या स्वर्गाहून श्रेष्ठ

**प्रभू श्रीरामाला अयोध्या स्वर्गाहून प्रिय आहे आणि या पवित्र भूमीला भेट देण्याची संधी मिळाल्याबद्दल मुर्मू यांनी कृतज्ञता व्यक्त केली. धर्मग्रंथांमधील संदर्भांची आठवण करून देत त्या म्हणाल्या, प्रभू श्रीरामचंद्रांनी स्वतः आपल्या जन्मस्थानाचे वर्णन स्वर्गाहूनही श्रेष्ठ असे केले आहे. 'रामचरितमानस'मध्ये प्रभू श्रीराम सीताजींना सांगतात की, जरी सर्वांनी वैकुंठाचे माहात्म्य वर्णिले असले, तरी मला अवधपुरीच अधिक प्रिय वाटते.**


श्री क्षुधाशांती सेवा संस्था
नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६
शुद्ध व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबध्द संस्था
सकाळी १० ते ९ (जेवण पार्सल उपलब्ध)
शुक्रवार, २० मार्च २०२६
लसुण चटणी, शेंगदाणे चटणी, वेफर्स, उपवास चिवडा उपलब्ध
वरण, भात, बट्टी, गंगाफळाची भाजी ५० रु.
वरण, बट्टी ३० रु.
सँडविच भाकरी २० रू. नग
पोळी भाजी १५ रु. प्लेट
मेथी पराठा व चटणी १० रू.
मसाला पुरी २० रु.
पार्सल मिळेल.
सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे
ऑर्डर- एम.एम.पाटील
मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.
केशवस्मृती सेवासंस्था समूहाचा उपक्रम
सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.

# थोडक्यात महत्त्वाचे...

## सारंगखेडा येथे ट्रॅक्टरच्या अपघातात एकाचा मृत्यू

**शहादा :** शहादा-दोंडाईचा रस्त्यावरील सारंगखेडा गावातील अमर ऊस रसवंतीगृहाजवळ झालेल्या ट्रॅक्टर अपघातात ३५ वर्षीय मजुराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना १७ मार्चला दुपारी पाऊणच्या सुमारास घडली. सायबू सजन पगारे (वय ३५, रा. कोकले, ता. साक्री, जि. धुळे) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. फिर्यादी श्रीराम पिरण ठाकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, चालक अरुण सुभाष ठाकरे (रा. छडवेल, ता. साक्री) हा ट्रॅक्टर (एमएच १८, जीएफ ६१०२) भरधाव चालवीत होता. रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने ट्रॅक्टर चालवल्यामुळे झालेल्या अपघातात सायबू पगारे यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी सारंगखेडा पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता २०२३ च्या कलम १०६ (१), २८१ आणि मोटारवाहन कायद्याच्या कलम १८४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी रवींद्र बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार जलाल शेख तपास करीत आहेत.

## नंदुरबार जिल्ह्याचे आता हसन मुश्रीफ पालकमंत्री



**नंदुरबार :** जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदी वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन सकिना मियालाल मुश्रीफ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्रिपद रिक्त होते. त्यामुळे पालकमंत्रिपदी कुणाची वर्णी लागेल, याची उत्सुकता होती. अखेर राज्य शासनाकडून बुधवारी (१८ मार्च) नंदुरबार जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदी वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन सकिना मियालाल मुश्रीफ यांची नियुक्तीची घोषणा करण्यात आली. यासंदर्भात राज्यपालांच्या आदेशानुसार शासनाचे उपसचिव हेमंत महाजन यांनी नियुक्ती आदेश जारी केले आहेत.

## चिमठाणे आरोग्य केंद्र वय वंदना कार्ड वाटपात प्रथम

**मेथी (शिंदखेडा) :** चिमठाणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राने केंद्र व राज्य शासनांतर्गत वय वंदना कार्ड वाटपात जिल्ह्यात प्रथम स्थान मिळविले. पणन व राजशिष्टाचारमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार रावल व शिंदखेडा तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. रुचिरा पवार यांच्या मार्गदर्शनात चिमठाणे प्राथमिक आरोग्य केंद्राने वय वंदनाचे १०० टक्के म्हणजे एक हजार ७३१ कार्ड वाटप पूर्ण करून उद्दिष्टपूर्ती करीत धुळे जिल्ह्यात प्रथम स्थान मिळविले. चिमठाणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वीरेंद्र गिरासे यांनी चिमठाणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपिका मोरे व त्यांच्या पथकाचा गौरव केला. या वेळी आरोग्य केंद्रातील कर्मचारी कोमलसिंग गिरासे, सरला जाधव, दिनेश चौधरी, अमोल पाटील, योगेश वाघ, अनिता विसपुते, धनश्री सोनवणे आदी उपस्थित होते. वीरेंद्र गिरासे यांनी मनोगत व्यक्त केले. या योजनेचे प्राथमिक आरोग्य केंद्राचे उद्दिष्ट पूर्ण झालेले असले, तरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या विभागात ७० वर्षांपुढील महिला-पुरुषांचे अजून सर्वेक्षण करून कोणीही या योजनेपासून वंचित राहणार नाही अशी दक्षता घ्यावी, असे आवाहन त्यांनी कर्मचाऱ्यांना केले.

## धुळे जिल्ह्यात ३१ मार्चपर्यंत प्रतिबंधात्मक मनाई आदेश

**धुळे :** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी १७ ते ३१ मार्चदरम्यान प्रतिबंधात्मक मनाई आदेश मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) अन्वये लागू राहतील, असे आदेश अपर जिल्हा दंडाधिकारी शरद पवार यांनी दिले आहेत. हे आदेश पाचपेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही मंडळीस किंवा मिरवणुकीस मनाई करील. सभा, मिरवणुका, मोर्चा, बैठक कार्यक्रम व रॅली आदी परवानगीबाबत स्थानिक पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत योग्य तो निर्णय घेऊन परवानगी घ्यावी, तसेच लग्नकार्य किंवा अंत्ययात्रेस शासनाने वेळोवेळी दिलेले निर्बंध लागू असतील. हा आदेश १७ मार्चच्या मध्यरात्रीपासून ३१ मार्चच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.



## सूरमय गीतात ज्येष्ठीजण मंत्रमुग्ध

**जळगाव :** गुढीपाडवा आणि मराठी नवीन वर्षाच्या निमित्ताने शहरातील चैतन्य नगर ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यालयात गायक वृंद यांनी विविध भक्ती गीत व भावगीते सादर करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. सुरुवातीला चैतन्य नगर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष ॲड. अरुण धांडे यांनी गुढी उभारून पूजा केली. प्रातःकाळी या भक्ती गीतांच्या मैफिलने पहाट प्रफुल्लित झाली.

सुरुवात निळकंठ कासार यांनी गायलेल्या गणेश वंदनेने झाली. भगवंत फडणीस यांनी खेळ मांडियेला ,देव माझा विठू सावळा पुष्पा पाटील यांनी सादर केले. आता कोठे धावे मन हा अभंग निळकंठ कासार यांनी सादर केला. नीता बिचवे यांनी किती सांगू मी सांगू कुणाला. कबिराचे विणतो शेले दत्तात्रय मेटकर यांनी विठू माऊली, तर डॉ नरेंद्र पाटील यांनी फिरत्या चाका वरती, प्रकाश जोशी यांनी ह्या फुलांच्या गंध कोशी हे भावगीत सादर केले. निवृत्त प्राचार्य भालचंद्र पाटील यांच्या तुझे गीत गाण्यासाठीचे उद्घाटन ॲड. अरुण धांडे यांनी केले. भागवत पाटील यांनी हे तुझे गीत गाण्यासाठी सादर करून मैफिलीचा शेवट झाला. अंजली चौधरी,मालती जुनागडे यांनीही भक्ती गित केले.निवेदन प्रतिभा पाटील यांनी तर संघाचे अध्यक्ष ॲड. अरुण धांडे व महिलाअध्यक्ष भारती पाटील यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी सचिव बोरोले, विकास बोरसे, दिनेश पाटील आदींनी पुढाकार घेतला.

# निधन वार्ता



### सोपान काळे; आज अंत्ययात्रा

**जळगाव :** शहरातील सोपानदेवनगर परिसरातील रहिवासी सोपान रामदास काळे यांचे गुरुवारी (१९ मार्च) अल्प आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवारी (२० मार्च) सकाळी नऊला नेरी नाका परिसरातील स्मशानभूमीकडे निघेल. विशाल काळे व दिनेश काळे यांचे ते वडील होत.




### अर्जुनराव जाधव

**जळगाव :** शहरातील दादावाडी परिसरातील गुजराल पेट्रोल पंपामागील मयुरेश्वर कॉलनीतील रहिवासी व सीमाशुल्क आणि केंद्रीय उत्पादनशुल्क विभागाचे निवृत्त अधीक्षक अर्जुनराव दाजिबा जाधव (वय ८४) यांचे बुधवारी (१८ मार्च) मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, दोन मुलगे, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सुप्रिया संजय मराठे, समीर जाधव, विक्रम जाधव यांचे ते वडील होत.



### प्रा. डॉ. राजेश भामरे

**जळगाव :** येथील मोहाडी रस्त्यावरील नेहरूनगर परिसरातील रहिवासी तथा इकरा महाविद्यालयातील प्रा. डॉ. राजेश वसंत भामरे (वय ५३) यांचे बुधवारी (१८ मार्च) पहाटे पावणेपाचच्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, भाऊ, बहीण असा परिवार आहे. प्रा. डॉ. संजय भामरे यांचे बंधू, तर ऋषिकेश व अनुराग यांचे ते वडील होत.





### सुनील काकडे

**सोयगाव :** येथील रहिवासी सुनील तुळशीराम काकडे (वय ५६) यांचे बुधवारी (१८ मार्च) सायंकाळी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

# शहाद्याच्या व्यापाऱ्याचे आइस्क्रीमचे काळे कारस्थान; मुदतबाह्य अन् निकृष्ट मालाची विक्री

## अन्न-औषध प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष? गरिबांच्या जीवाशी खेळणाऱ्या मुजोर व्यापाऱ्याकडून विक्रेत्यालाच धमकी



**तभा वृत्तसेवा**
**शहादा, १९ मार्च**

उन्हाळ्याचा तडाखा वाढताच थंडपेये आणि आईस्क्रीमची मागणी गगनाला भिडली आहे. मात्र, याच संधीचा फायदा घेत शहादा येथील एका बड्या व्यापाऱ्याने धडगाव तालुक्यातील दुर्गम भागात विषारी आणि मुदतबाह्य आइस्क्रीमचा पुरवठा केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नामांकित ब्रँडच्या नावाखाली निकृष्ट दर्जाचा माल खपवून ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ मांडला जात असून, तक्रार करणाऱ्या किरकोळ विक्रेत्यालाच चक्क गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली जात असल्याने खळबळ उडाली आहे.

**काय आहे नेमके प्रकरण?**

शहादा येथील मेमन नावाचा व्यापारी धडगाव तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर आइस्क्रीमचा पुरवठा करतो. मिळालेल्या माहितीनुसार, मेमन यांच्याकडून काठेवाडिया आणि बरकादेवी या दोन प्रसिद्ध ब्रँडच्या नावाचा वापर करून खालच्या दर्जाचे आइस्क्रीम आणि कोल्ड ड्रिंक्स विकले जात आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, विक्रीसाठी पाठविण्यात आलेला हा साठा मुदतबाह्य झाला असूनही तो चढ्या दराने ग्रामीण भागातील अडाणी विक्रेत्यांच्या माथी मारला जात आहे.

**९८ हजारांची फसवणूक; विक्रेत्यालाच धमकावले**

धडगाव तालुक्यातील खांडबारा येथील किरकोळ विक्रेते अनिल पाडवी यांनी मेमन यांच्याकडून सुमारे ९८ हजार रुपये किमतीच्या आइस्क्रीमची खरेदी केली होती. मात्र, मालाची डिलिव्हरी मिळाल्यानंतर तपासणी केली असता, हा सर्व माल निकृष्ट, दुर्गंधीयुक्त आणि खाण्यायोग्य नसल्याचे पाडवी यांच्या निदर्शनाला आले. जेव्हा पाडवी यांनी या खराब मालाबाबत मेमन यांच्याकडे जाब विचारला आणि माल बदलून देण्याची विनंती केली, तेव्हा मेमन यांनी आपली चूक मान्य करण्याऐवजी उलट पाडवी यांनाच तुझ्यावरच गुन्हा दाखल करीन, अशी मुजोर धमकी दिली. यामुळे छोटे विक्रेते आता दहशतीखाली आहेत.

**अन्न-औषध प्रशासनाचे झोपेचे सोंग**

एवढ्या मोठ्या प्रमाणावर भेसळयुक्त आणि मुदतबाह्य अन्नपदार्थांची उघडपणे विक्री सुरू असताना, नंदुरबार जिल्ह्याचे अन्न व औषध प्रशासन नेमके काय करत आहे, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

> मी ९८ हजार रुपये खर्च करून माल घेतला; पण तो पूर्णपणे निकृष्ट आणि मुदत संपलेला निघाला. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ नको म्हणून मी तो बदलून मागितला, तर मेमन मलाच उलट धमकी देत आहेत. माझी मोठी आर्थिक फसवणूक झाली असून, प्रशासनाने या व्यापाऱ्यावर तातडीने कारवाई करून माझा परतावा मिळवून द्यावा.
> **- अनिल पाडवी (पीडित विक्रेता, खांडबारा, ता. धडगाव)**

दुर्गम भागातील लहान मुले आणि नागरिक या आइस्क्रीमचे सेवन करतात, ज्यातून मोठ्या प्रमाणावर विषबाधा होण्याची भीती व्यक्त होत आहे. या व्यापाऱ्याला प्रशासनाचे 'अभय' लाभले आहे की काय, असा संशय आता बळावू लागला आहे. आता या प्रकरणाची दखल घेऊन जिल्हा प्रशासन आणि अन्न व औषध विभाग संबंधित मुजोर व्यापाऱ्यावर कठोर कायदेशीर कारवाई करणार की नेहमीप्रमाणे डोळेझाक करून सर्वसामान्यांचे आरोग्य वाऱ्यावर सोडणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# नवापूर तालुका कृषी कार्यालयात २० लाखांचा अपहार

## तत्कालीन कृषी अधिकाऱ्यांसह दोघांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, १९ मार्च**

नवापूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयात वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) रकमेत फेरफार करून शासनाची सुमारे २० लाख ५० हजार १४८ रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी नवापूर पोलिसांनी तत्कालीन तालुका कृषी अधिकारी आणि एका टॅक्स कन्सल्टंटविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

**नेमकी घटना काय?**

२०१८ ते २०२० दरम्यान मृद व जलसंधारण योजनेंतर्गत झालेल्या कामांचा वस्तू व सेवा कर (जीएसटी) भरणे आवश्यक होते. तत्कालीन तालुका कृषी अधिकारी वसंत धर्मराज चौधरी यांनी ही रक्कम भरण्यासाठी अधिकृत धनादेशाद्वारे एकूण ३० लाख ३३ हजार १७० रुपये टॅक्स कन्सल्टंट राकेश भालचंद्र कोठावदे याला दिले होते. तपासात असे समोर आले की, संशयित राकेश कोठावदे याने या रकमेपैकी केवळ नऊ लाख ८३ हजार २२ रुपये ई-पेमेंटद्वारे जीएसटी विभागाकडे जमा केले. उर्वरित २० लाख ५० हजार १४८ रुपये शासकीय तिजोरीत जमा न करता, दोन्ही संशयितांनी संगनमत करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वापरले आणि शासनाची फसवणूक केली.

**मृत कर्मचाऱ्याच्या नावावर बनावट कागदपत्रे**

गुन्ह्याचे गांभीर्य अधिक वाढवणारी बाब म्हणजे, संशयित राकेश कोठावदे याने ही रक्कम कार्यालयातील मृत लिपिक किरण झिंगा कन्हैया यांना दिल्याचे भासवले. यासाठी त्याने बनावट व्हाउचर्स तयार केले आणि त्यावर मृत कर्मचाऱ्याच्या खोट्या सह्या करून ते खरे असल्याचे भासवले.

सध्याचे तालुका कृषी अधिकारी रविशंकर गेमसिंग पाडवी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नवापूर पोलीस ठाण्यात नवापूर येथील संशयित टॅक्स कन्सल्टंट राकेश भालचंद्र कोठावदे व निवृत्त कृषी उपसंचालक तथा तत्कालीन तालुका कृषी अधिकारी वसंत धर्मराज चौधरी यांच्याविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ४०९, ४२०, ४६४, ४६८, ४७१ आणि ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अभिजित किशोर अहिरे तपास करीत आहेत. या घोटाळ्यामुळे कृषी विभागात मोठी खळबळ माजली आहे.

# नंदुरबारला ३० फूट उंचावरून पडून कामगाराचा मृत्यू

## दुकानमालकासह कंत्राटदाराविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, १९ मार्च**

नंदुरबार शहरातील तळोदा रस्त्यावरील सिंधी कॉलनी भागात एका दुकानाचा फलक लावण्याचे काम करीत असताना, सुरक्षेची कोणतीही साधने न पुरविल्यामुळे ३० फूट उंचीवरून पडून ३० वर्षीय कामगाराचा मृत्यू झाला. याप्रकरणी निष्काळजीपणा दाखवून मृत्यूला कारणीभूत ठरल्याबद्दल उपनगर पोलीस ठाण्यात दुकानमालक आणि कंत्राटदाराविरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या कलम १०६ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनिल बाबुलाल विश्नोई (वय ३०, रा. राजस्थान, ह. मु. नंदुरबार) हा १७ मार्चला दुपारी चारच्या सुमारास नंदुरबार शहरातील सिंधी कॉलनीतील रॉयल क्लासिक या दुकानाचा फलक लावण्याचे काम करीत होता. साधारण ३० फूट उंचीवर हे काम सुरू असताना तो अचानक खाली पडला. त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान सायंकाळी साडेपाचच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला.

मृत अनिल याला कामावर पाठविणारा कंत्राटदार रामनिवास खिच्चड आणि दुकानमालक सुमित सावलानी यांनी निष्काळजीपणा केल्याचे समोर आले आहे. एवढ्या उंचीवर काम करण्यासाठी आवश्यक असलेले हेल्मेट, सेफ्टी जॅकेट, सुरक्षा दोर, हँडग्लोव्हज किंवा इतर कोणतेही संरक्षणात्मक साहित्य कामगाराला पुरविण्यात आले नव्हते. कोणत्याही मदतीशिवाय त्याला एकट्यालाच उंचीवर काम करण्यास सांगण्यात आल्याने ही दुर्घटना घडली. या प्रकरणी सुमित अशोककुमार सावलानी (वय २७, दुकानमालक, रा. जुनी सिंधी कॉलनी, नंदुरबार) व रामनिवास धर्मराज खिच्चड (वय २८, कंत्राटदार, रा. औरिया विहार कॉलनी, नंदुरबार) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक साहेबराव पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक संजोग बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अमोल देशमुख तपास करीत आहेत.

# पिंगाणे शिवारातून दीड लाखाच्या मोटारीसह केबल लंपास

## शहादा पोलिसांत चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल; रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, १९ मार्च**

तालुक्यातील पिंगाणे शिवारात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, दोन वेगवेगळ्या शेतांतून पाच अश्वशक्तीच्या सौरऊर्जा पाण्याची मोटार आणि केबल, असा सुमारे दीड लाख किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शहादा पोलीस ठाण्यात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी उमेश सुनील पाटील (वय ४०, रा. पिंगाणे, ता. शहादा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, पिंगाणे शिवारातील गट क्रमांक १३१/१ मध्ये त्यांची एक लाख ३० हजार रुपये किमतीची सौरऊर्जेवरील पाण्याची मोटार आणि २०० फूट केबल बसविली होती. १३ ते १७ मार्चदरम्यान चोरट्याने ही मोटार आणि केबल लंपास केली. तसेच याच शिवारातील गट क्रमांक ५२/२ मधून सुदाम मगन पाटील यांची २० हजारांची २५० फूट केबलही चोरट्यांनी लंपास केली आहे. दोन्ही ठिकाणांहून एकूण एक लाख ५० हजार रुपयांचा माल चोरीला गेल्याचे तपासात समोर आले आहे.

याप्रकरणी उमेश पाटील यांच्या फिर्यादीवरून शहादा पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता २०२३ च्या कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी हेमंतकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक प्रदीपसिंग राजपूत तपास करीत आहेत.

शेतशिवारात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे शेतकरीवर्गात चिंतेचे वातावरण पसरले असून, पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

# नंदुरबारमध्ये तरुणावर रॉडने प्राणघातक हल्ला

## हॉटेलमध्ये बसून जेवण करण्याच्या वादातून टोकाचे पाऊल; पोलिसांत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, १९ मार्च**

नंदुरबार शहरातील धुळे- नवापूर रस्त्यावरील एका हॉटेलसमोर किरकोळ वादातून नऊ जणांच्या टोळक्याने तरुणासह त्याच्या नातेवाईकांना बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात तरुणाच्या डोक्यावर लोखंडी रॉडने वार करून ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता २०२३ च्या नवीन कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अक्षय आत्माराम गवळी (वय ३२, रा. जयंतीनगर, नंदुरबार) हे त्यांचे वडील आणि चुलतभावासोबत धुळे-नवापूर रस्त्यावरील राजपूत पेट्रोल पंपाजवळील खान्देश जंक्शन-३९ हॉटेलसमोर होते. या वेळी संशयितांनी ''हॉटेलमध्ये येऊन बसून जेवण करा, आम्ही बाहेर ऑर्डर केलेले जेवण हॉटेलच्या बाहेर आणून देत नाही,'' असे सांगत वाद उकरून काढला. या किरकोळ कारणावरून संतापलेल्या संशयितांनी संगनमताने अक्षय गवळी आणि त्याच्या वडिलांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करीत हाताबुक्क्यांनी मारहाण केली. वाद इतका



विकोपाला गेला की, संशयित उमेश माळी याने अक्षय गवळीचा चुलतभाऊ मनोज श्रीलाल साबळे याच्यावर लोखंडी रॉडने डोक्यावर जोरदार प्रहार केला. या हल्ल्यात मनोज साबळे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी अक्षय गवळी यांच्या फिर्यादीवरून नंदुरबार शहर पोलिसांनी एकूण नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यात पराग राजेश रघुवंशी, प्रफुल्ल राजेश रघुवंशी, सूर्यकांत खंडू माळी, उमेश माळी (पाणीपुरीवाला), जगदीश माळी, बापू गुरव, जयेश धनराज माळी, जीवन माळी (सर्व रा. नंदुरबार) आणि एका अनोळखी व्यक्तीचा समावेश आहे.

शहर पोलिसांनी घटनेची गांभीर्याने दखल घेत संशयितांविरुद्ध खुनाचा प्रयत्न (कलम १०९-१), बेकायदेशीर जमाव जमवणे (कलम १८९, १९१, १९०), आणि जमावबंदी आदेशाचे उल्लंघन (कलम १३५) अशा विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला.

पोलीस निरीक्षक निलेश देसले यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक तानाजी बहिरम तपास करीत आहेत. शहरात अशा प्रकारे किरकोळ वादातून गुन्हेगारी कृत्य करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कडक पवित्रा घेतला असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

# नंदुरबारला प्रशासनातर्फे शांतता समितीची बैठक

## आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर नियोजनावर चर्चामंथन

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, १९ मार्च**

आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर नंदुरबार येथे जिल्हा प्रशासनातर्फे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय शांतता समितीच्या बैठकीत नियोजनासह कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्याबाबत चर्चामंथन करण्यात आले.

नंदुरबार जिल्ह्यात रमजान ईद, श्रीराम नवमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व इतर महत्त्वाचे सण-उत्सव शांततेत पार पडून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे नंदुरबार येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात बुधवारी (१८ मार्च) दुपारी तीनला जिल्हास्तरीय व




तालुकास्तरीय शांतता समितीची बैठक घेण्यात आली. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस अध्यक्षस्थानी होते.

बैठकीत आगामी सण-उत्सवांच्या अनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली. या वेळी जिल्हाभरातील विविध ठिकाणांहून शांतता समितीचे १०० ते १५० सदस्य, प्रतिष्ठित नागरिक व विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, उपजिल्हाधिकारी धनंजय गोपटे, निवासी उपजिल्हाधिकारी आशा गांगुर्डे, उपविभागीय पोलीस अधिकारी (नंदुरबार) संजय महाजन, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहादा) दत्ता पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी (अक्कलकुवा) सुभाष भोये, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील तसेच जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व इतर प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

## नंदुरबारच्या देसाईपुरातील राममंदिरात चोरी

**शहादा :** नंदुरबार शहरातील देसाईपुरा भागात असलेल्या निवृत्त व्यक्तीच्या राहत्या घरात आणि राममंदिरात चोरट्याने डल्ला मारल्याची घटना समोर आली आहे. ६ एप्रिल २०२५ ते १७ मार्च २०२६ दरम्यान ही चोरी झाली असून, चोरट्याने दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने घरातून संसारोपयोगी वस्तूंची चोरी केली आहे. यामध्ये १५० रुपये किमतीची ५ मोठी पितळी पातेली, २०० रुपये किमतीची स्टीलची मोठी ताटे व परात, ३४०० रुपये किमतीचे दोन गॅस सिलेंडर आणि शेगडी, तसेच ३५० रुपये किमतीचे ॲल्युमिनिअमचे भांडे आणि ५० रुपये किमतीची देवपूजेची मोठी पितळी थाळी असा मुद्देमाल चोरून नेला आहे. यासंदर्भात फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक नीलेश देसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक तपास करीत आहेत.

घर असो वा शेत
झेनिथ पाईप सेवेत...
ISI भारतात प्रथम क्रमांकावर असलेले
बिर्लांचे एक उत्पादन
झेनिथ
स्टील पाईप
जी.आय.पाईप
एम.एस.पाईप


• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'केसर-कस्तुरी' २६,२७ नवीपेठ,
जुन्या बस स्टँडसमोर गल्लीत जळगाव
2232641 TO 2232645

### टायटल व्हेरिफिकेशनची जाहिर नोटीस

तमाम लोकांना, वित्तीय संस्थांना, बँकांना, सरकारी क्रेडीट सोसायटी, को. ऑप. बँक, पतसंस्था, निम सरकारी कार्यालय यांना मला माझे पक्षकार **श्री. विकास वसंत वाणी,** रा. कैलास नगर, चाळीसगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव यांनी दिलेल्या हक्क व अधिकारान्वये या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**१) मिळकतीचे वर्णनः- मौजे चाळीसगांव,** ता. चाळीसगांव, जि. जळगांव येथील स.नं.४६९/३/अ, मधील प्लॉट नं. ३७ यांसी क्षेत्र २३५.८७ चौ.मी. **यापेकी पश्चिमेकडील प्लॉट क्षेत्र ११७.९४ चौ.मी. व त्यावरील बांधीव क्षेत्र ५१.५६ चौ.मी. व त्यावरील गच्चीचे ताबा व मालकी हक्कांसह, यांसी चतुःसिमाः पुर्वेस-** याच प्लॉट नं.३७ मधील उर्वरीत क्षेत्र, **पश्चिमेस-** रस्ता, **दक्षिणेस-** रस्ता, **उत्तरेस -**प्लॉट नं. ३८. येणेप्रमाणे उपरोक्त मिळकतीत जाणे-येणेचे, वहीवाटीचे हक्कांसह तदंगभुत वस्तुसूध्दा.

२) सदरील मिळकत ही **१) सौ. माधवी मिलींद कुलकर्णी, २) श्री. मिलींद सुर्यकांत कुलकर्णी,** दोघेही रा. भडगांव रोड, चाळीसगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव यांचे मालकीची असुन सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची असुन सदर मिळकत ही कोठेही गहाण, हक्क, हितसंबंध, बोजा, तारण, गहाण, जप्तीत, जामीनकीत, कर्ज प्रकरण, वाटणीत, वारसा हक्कात, विकसन करारात, मेहेरमध्ये, कोर्ट कारवाईत, संबंध दिशा व सिमा क्षेत्र वगैरे बाबत कुठल्याही हक्क, दावा, अधिकार नसल्याचे सांगितलेले आहे. तरी खालील सही करणार यांच्याशी जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत कोणाच्याही कोणत्याही प्रकारची तक्रारी अगर हरकत असल्यास समक्ष भेटून कागदोपत्री पुरावा दाखवुन तशी खात्री पटवुन आपली लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. तसा कोणताही आक्षेप वर मुदतीत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध, बोजा विरहीत व क्लिअर मार्केटेबल टायटलची आहे असे समजुन आमचे अशिल **हे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील,** ही जाहीर नोटीस दिली.

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी सांगितलेवरुन, माहिती दिलेवरुन आज रोजी अशिलांचे खर्चाने प्रसिध्दीस दिली आहे.

**सही/-**
**जळगांव**
**दिनांक** १९/०३/२०२६
**ॲड. शैलेश रविकांत नागला**
**ऑफिसः-** फ्लॅट नं. ३ पहिला मजला, कालिदास चेंबर्स (श्रध्दा अपार्टमेंट) शाहू कॉम्प्लेक्स जवळ, जळगांव.
मो.नं.८२०८००९६८९

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग,** डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com

# जगातील सर्वात मोठ्या वायू प्रकल्पावर हल्ला

## ● इराणकडून क्षेपणास्त्राचा मारा, कतारचे रास लाफान पुरवठा केंद्र उद्ध्वस्त
## ● कुवैत, सौदी, युएईच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पाला आग

◆ **दोहा, १९ मार्च**

अमेरिका-इस्रायली सैन्याने इराणच्या इंधन प्रकल्पांना लक्ष्य केल्याने संतापलेल्या इराणने गुरुवारी पहाटे कतार, कुवेत, युएई आणि सौदी अरबच्या तेल आणि वायू प्रकल्पांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा मारा करीत प्रत्युत्तर दिले. यात कतार येथील जगातील सर्वात मोठा लिक्विफाइड नॅचरल गॅस अर्थात् एलएनजी प्रकल्प उद्ध्वस्त झाला. याशिवाय एका तेल शुद्धीकरण प्रकल्पाला आग लागली. दुसरीकडे या हल्ल्यात युएई आणि सौदी अरबच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पाचे मोठे नुकसान झाले. जगातील सर्वात मोठ्या एलएनजी प्रकल्प असलेल्या रास लाफानवरील हल्ल्यानंतर, तेथील उत्पादन पूर्णपणे थांबवण्यात आले.



इराणने कतारच्या सर्वात मोठ्या द्रवीकृत नैसर्गिक वायू (एलएनजी) प्रकल्प रास लाफानवर क्षेपणास्त्र हल्ला केल्याने आंतरराष्ट्रीय तेल आणि वायू बाजारात खळबळ माजली आहे. इराणने कतारवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. या हल्ल्यामुळे वायू प्रकल्पाला भीषण आग लागली. कतारच्या गृह मंत्रालयाने हल्ल्याची पुष्टी करताना सांगितले की, प्रकल्पातून कर्मचाऱ्यांना आधीच सुरक्षितस्थळी हलवण्यात आल्याने जीवितहानी झालेली नाही, परंतु एलएनजी पुरवठा केंद्र उद्ध्वस्त झाले. या प्रकल्पातून जागतिक मागणीच्या २० टक्के वायूचा पुरवठा केला जातो. या हल्ल्यामुळे नैसर्गिक वायूच्या किमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

कुवेतच्या मीना अल अहमदी तेल शुद्धीकरण प्रकल्पाला आग लागली. बचाव पथकाकडून आगीवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहे. दुसरीकडे युएई आणि सौदी अरबने इराणच्या हल्ल्यात तेल शुद्धीकरण प्रकल्पाचे नुकसान झाल्याचे सांगितले.

### भारतावर काय परिणाम होईल?

एलएनजी-उत्पादक देशांवरील हल्ल्यांचा भारतासारख्या देशांवर गंभीर परिणाम होत आहे, जो आपल्या नैसर्गिक वायूच्या गरजांपैकी सुमारे ५० टक्के आंतरराष्ट्रीय बाजारातून पूर्ण करतो. भारत नैसर्गिक वायूच्या गरजांपैकी सुमारे २० टक्के कतारकडून आयात करतो. वायू प्रकल्पावरील हल्ल्याने भारताला होणारा पुरवठा खंडित होण्याची शक्यता आहे. ■

### दक्षिण पार्स गॅस क्षेत्रावरील हल्ल्याला प्रत्युत्तर

अमेरिका-इस्रायलने बुधवारी रात्री इराणच्या दक्षिण पार्स गॅस क्षेत्रात जोरदार हल्ले केले. हे जगातील सर्वात मोठे नैसर्गिक वायू क्षेत्र आहे. दक्षिण पार्समधून काढलेला बहुतांश वायू इराणकडून देशांतर्गत वापरासाठी वापरला जातो. या गॅस क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेता, संयुक्त अरब अमिराती आणि कतारने हल्ल्याचा निषेध केला. यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की, पुन्हा या प्रदेशावर हल्ले केले जाणार नाहीत. ■

# आमच्या संयमाचा अंत पाहू नये

## सौदी अरब, युएईचा इशारा

◆ **रियाध, १९ मार्च**

आखाती देशांवरील हल्ल्यामुळे आम्ही चिंतेत आहोत. इराणने आमच्या संयमाचा अंत पाहू नये, आमच्या देशांवर हल्ले सुरूच राहिल्यास प्रतिहल्ला केला जाईल, संयमाचा अंत पाहू नये, अशा शब्दात सौदी अरब, युएईने संयुक्त निवेदन जारी करीत इराणला इशारा दिला.

सौदी अरबचे परराष्ट्र मंत्री, प्रिन्स फैसल बिन फरहान अल सौद पत्रपरिषदेत म्हणाले, आखाती देशांवर होणारे हल्ले थांबवणे आमचे प्राथमिक ध्येय आहे. इराणचे हल्ले सुरूच राहिल्यास आम्हाला लष्करी कारवाईचा निर्णय घ्यावा लागेल. इराणने आमच्या संयमाचा अंत पाहू नये. आखाती देशांवरील हल्ले तात्काळ थांबले पाहिजेत. शेजारी देश या संघर्षाचा भाग नाहीत. हल्ले थांबवण्यासाठी राजकीय, आर्थिक आणि राजनैतिक अशा सर्व शक्य मार्गांचा वापर आमच्याकडून सुरू आहे. इराण युद्धविरामासाठी वाटाघाटी सुरू करायला हव्या. त्यांचा शेजारी देशांवर विश्वास नसणे चर्चेचा मार्ग बंद होण्यासाठी कारणीभूत आहे. अशा परिस्थितीत इराणचेच नुकसान होणार आहे. इराणवर आमचा जो काही थोडाफार विश्वास उरला होता, तो आता पूर्णपणे नाहीसा झाला आहे. आमच्यावर नियोजित हल्ले केले जात आहे. पायाभूत सुविधा आणि तेल प्रकल्पावर हल्ले करणे आम्ही सहन करणार नाही.



### ... तर इराणचे अस्तित्व राहणार नाही : ट्रम्प

आखाती देशांतील तेल आणि वायू प्रकल्पावरील इराणच्या हल्ल्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षा डोनाल्ड ट्रम्प चांगलेच संतापले. त्यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, कतारच्या वायू आणि तेल प्रकल्पांवर पुन्हा हल्ला झाल्यास इराणचे अस्तित्व जगातून नाहीसे होईल. अमेरिकेच्या कारवाईची किंमत तेथील जनतेला मोजावी लागेल. आखाती देशावरील हल्ले तत्काळ थांबवावे अन्यथा दक्षिण पार्स गॅस क्षेत्र पूर्णपणे नष्ट केले जाईल. ■

**धमक्यांना घाबरत नाही**

अमेरिका आणि इस्रायलच्या लष्करी, हवाई तळांवर हल्ले करणे सुरूच ठेवणार आहे. आम्ही पोकळ धमक्यांना घाबरत नाही, असा पलटवार इराणच्या आयआरजीसीने जारी केलेल्या निवेदनातून केला. कतार, युएई, सौदी अरब, कुवेत, ओमानवर आम्हीच हल्ले केले आणि पुढेही सुरूच ठेवणार आहे. आमच्या नेत्यांच्या मृत्यूचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही. शत्रूने इराणच्या ऊर्जा सुविधांना लक्ष्य केल्यानेत आम्ही आखाती देशांच्या तेल, वायू प्रकल्पांवर प्रतिहल्ले केले.

# अमेरिकन जनतेवरही युद्ध लादले

## अब्बास अराघची यांचा ट्रम्प यांच्यावर संताप

◆ **तेहरान, १९ मार्च**

इराणवर जबरदस्तीने युद्ध लादले गेले आणि त्याचे आर्थिक परिणाम सामान्य अमेरिकन नागरिकांना भोगावे लागतील. मध्य पूर्वेतील विकास रोखणे आणि चीन-भारतासारख्या विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांना धक्का पोहोचविणे हाच अमेरिकेचा हेतू असल्याचा आरोप इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी केला.



सरकारी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत अराघची म्हणाले, हे युद्ध आता केवळ एक लष्करी संघर्ष राहिलेला नाही, तर त्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवरही होईल. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे २०० अब्ज डॉलर्सचे नुकसान झाले आहे. ही केवळ सुरुवात आहे आणि भविष्यात आकडा वाढतच राहील.

इस्रायलने इराणच्या अणुकार्यक्रमाबद्दल दिशाभूल करणारी माहिती पसरवून अमेरिकेला युद्धात सामील होण्यास प्रवृत्त केले. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू अमेरिकेच्या धोरणांवर प्रभाव टाकत आहेत आणि अमेरिकेला मोठ्या प्रादेशिक संघर्षात ढकलत आहेत. रुग्णालये, शाळा आणि वारसा स्थळांवर हल्ले झाले, जे आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन आहे.



### होर्मुझ सामुद्रधुनीजवळ अमेरिकेचा भीषण हल्ला

अमेरिकेने इराणच्या दक्षिण किनारपट्टीवरील होर्मुझची सामुद्रधुनी परिसरातील क्षेपणास्त्र तळांना लक्ष्य करत मोठा हवाई हल्ला केला. या हल्ल्यात अमेरिकेने २,२०० किलो वजनाच्या शक्तिशाली बंकर बस्टर बॉम्बचा वर्षाव केला, यात आयआरजीसीचे अनेक सैनिक मारले गेले. यूएस सेंट्रल कमांडने हल्ल्याची पुष्टी केली आहे. ■

**युद्धाच्या निधीवरून अमेरिकन खासदारांचा विरोध**

पेंटागॉनने इराण युद्धासाठी अमेरिकी काँग्रेसकडे २०० अब्ज डॉलर्सची मागणी केली. या प्रस्तावाला अनेक डेमोक्रॅटिक खासदारांचा विरोध केला. डेमोक्रॅटिक खासदार ख्रिस व्हॅन हॉलेन म्हणाले, २०० अब्ज डॉलर्स हा अशा युद्धाचा खर्च आहे जे अमेरिकन जनतेला नको आहे आणि त्यामुळे अमेरिका अधिक सुरक्षित होणार नाही.

**तीन निदर्शकांना फाशी**

इराण सरकारने जानेवारीतील आंदोलनात सहभागी असलेल्या तीन जणांना फाशी दिली. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांनी त्यांच्यावर दोन जणांच्या हत्येचा आरोप केला होता. इराणच्या सरकारी माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, इराणमधील आंदोलनादरम्यान अंदाजे ३,११७ लोक मारले गेले.

# कारवाईसाठी कोणाचाही दबाव नाही

## केंट यांच्या आरोपांना व्हाईट हाऊसचे प्रत्युत्तर


◆ **वॉशिंग्टन, १९ मार्च**

व्हाइट हाऊसने राष्ट्रीय दहशतवादविरोधी केंद्राचे माजी संचालक ज्यो. केंट यांनी केलेले आरोप व्हाईट हाऊसने फेटाळून लावताना स्पष्ट केले की, इराणविरोधात कारवाईसाठी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यावर कोणाचाही दबाव नव्हता. राष्ट्राध्यक्ष दुसऱ्या देशाच्या सांगण्यावरून काम करत नाहीत आणि ते जगातील सर्वात शक्तिशाली नेते आहेत, अमेरिकेचे हित लक्षात घेऊनच निर्णय घेतात.

व्हाइट हाऊसच्या प्रवक्त्या कॅरोलिन लेविट यांनी निवेदनात म्हटले की, केंट यांनी राजीनामा देताना केलेले आरोप निराधार आहे. राष्ट्राध्यक्षांनी केंट यांना देशाची सेवा करण्याची संधी दिली होती, परंतु त्यांनी खोट्या तथ्याच्या आधारावर आरोप केले. जो व्यक्ती इराणला दहशतवादाचा समर्थक मानत नाही, तो दहशतवादविरोधी विभागाचा प्रमुख असू शकत नाही. अणुबॉम्ब तयार करण्यासाठी इराण वेगाने बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे विकसित करत होता. इराण अमेरिकन सैन्य आणि तळांवर हल्ला करण्याची योजना आखत होता. त्यामुळे, आपल्या लष्कराचे आणि मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला.

### केंट यांची चौकशी सुरू

देशातील गोपनीय माहिती उघड केल्याच्या आरोपात एफबीआयने ज्यो. केंट यांची चौकशी सुरू केली आहे. केंट यांच्याशिवाय एफबीआयचे माजी संचालक जेम्स कोमी आणि न्यूयॉर्कच्या ॲटर्नी जनरल लेटिशिया जेम्स यांची देखील चौकशी करण्यात येत असल्याचे लेविट यांनी म्हटले आहे. ■




# खासदार-आमदारांना निधी वितरणावर बंदी

## निवडणूक असलेल्या राज्यांबाबत आयोगाचा निर्णय

◆ **नवी दिल्ली, १९ मार्च**

भारतीय निवडणूक आयोगाने केरळ, पश्चिम बंगाल, पुदुचेरी, तामिळनाडू, कर्नाटक आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये स्थानिक क्षेत्र विकासासाठी कोणताही नवीन निधी वितरित करण्यावर बंदी घातली आहे. या राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये विधानसभा निवडणुका आणि पोटनिवडणुका जाहीर झाल्यानंतर लागू झालेल्या आदर्श आचारसंहितेमुळे आयोगाने हे निर्देश जारी केले. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खासदार (राज्यसभा सदस्यांसह), आमदार किंवा विधान परिषद सदस्यांना स्थानिक क्षेत्र विकास योजनांतर्गत कोणताही नवीन निधी वाटप करू नये, असे निर्देश आयोगाने दिले आहे.

निवडणूक आयोगाचे अवर सचिव प्रफुल्ल अवस्थी यांनी या संदर्भात कॅबिनेट सचिव, भारत सरकारचे सचिव, मुख्य सचिव आणि या राज्यांच्या व केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र लिहिले आहे. एका अधिकाऱ्याने सांगितले की, हे पत्र जारी होण्यापूर्वी ज्या कामांसाठी कार्यदेश प्राप्त झाले होते. परंतु, प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली नव्हती. ती कामे आता सुरू करता येणार नाहीत. ही कामे निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच सुरू होतील. तथापि, जर कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली असेल, तर ते सुरू ठेवता येईल आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या समाधानानुसार, पूर्ण झालेल्या कामाच्या देयकावर कोणताही निर्बंध राहणार नाही. जिथे आराखडे मंजूर झाले आहेत, निधी प्राप्त झाला आहे आणि बांधकाम साहित्य जागेवर पोहोचले आहे, तिथे काम नियोजित वेळेनुसार पूर्ण केले जाऊ शकते, असेही स्पष्ट केले आहे.

### या राज्यांमध्ये आचारसंहिता

आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि पुदुचेरी येथील विधानसभा निवडणुकांसोबतच गोवा (पोंडा), गुजरात (उमरेठ), कर्नाटक (बागलकोट आणि दावणगेरे दक्षिण), महाराष्ट्र (राहुरी आणि बारामती), नागालँड (कोरिडांग) आणि त्रिपुरा (धर्मनगर) येथे पोटनिवडणुका जाहीर करण्यात आल्या आहेत. केरळ, आसाम, तामिळनाडू आणि पुदुचेरीमध्ये आगामी विधानसभा निवडणुका एकाच टप्प्यात तर पश्चिम बंगालमध्ये दोन टप्प्यांत पार पडतील. याव्यतिरिक्त कर्नाटक आणि महाराष्ट्रातील प्रत्येकी दोन जागांसह सहा राज्यांमधील आठ जागांसाठी ९ आणि २३ एप्रिल रोजी पोटनिवडणुका होणार आहेत. विद्यमान सदस्यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागांवर या पोटनिवडणुका घेण्यात येत आहेत. ■

# अनिल अंबानी यांची सीबीआय चौकशी

## स्टेट बँकेचे फसवणूक प्रकरण

◆ **नवी दिल्ली, १९ मार्च**

रिलायन्स कम्युनिकेशन्स लि. च्या विरोधात कथित २९२९ कोटी रुपयांच्या फसवणुकीबाबत भारतीय स्टेट बँकेने दाखल केलेल्या तक्रारीच्या प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात् सीबीआयने गुरुवारी उद्योजक अनिल अंबानी यांची चौकशी केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



चौकशीसाठी अनिल अंबानी सकाळी सीबीआयच्या मुख्यालयात दाखल झाले. बँकेने कंपनीला दिलेल्या कर्जनिधीमध्ये निधीचे वळते करणे, गैरविनियोग आणि इतर अनियमितता झाल्याचा आरोप सीबीआयने केल्याचे त्यांनी सांगितले.

स्टेट बँकेच्या तक्रारीवरून दाखल एफआयआर प्रकरणी चौकशीसाठी अनिल अंबानी १९ आणि २० मार्च रोजी सीबीआयसमोर चौकशीसाठी उपस्थित राहणार आहेत, असे अनिल अंबानी यांच्या प्रवक्त्याने सांगितले. या प्रकरणात संपूर्ण सहकार्य केले जाईल, अशा वचनबद्धतेनुसार अनिल अंबानी चौकशीसाठी उपस्थित राहणार आहेत.

स्टेट बँकेची २,९२९.०५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपावरून सीबीआयने मागील वर्षी ऑगस्टमध्ये अंबानी यांच्यावर गुन्हा दाखल केला होता. आता एफआयआरचा भाग बनलेल्या सीबीआयच्या तक्रारीनुसार आणि २०१८ च्या आकडेवारीनुसार या कंपनीकडे विविध कर्जदात्यांची ४० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम थकित होती. यामध्ये केवळ या सार्वजनिक बँकेलाच २,९२९.०५ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे.

गुन्हेगारी कट, फसवणूक आणि गुन्हेगारी स्वरूपाचा विश्वासघात केल्याच्या आरोपावरून सीबीआयने अंबानी आणि आरकॉमविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# जुबीन प्रकरणाच्या सुनावणीसाठी फास्ट-ट्रॅक न्यायालय नियुक्त

**गुवाहाटी :** आसामचे गायक जुबीन गर्ग यांच्या मृत्यू प्रकरणाची दररोज सुनावणी करण्यासाठी गुवाहाटी उच्च न्यायालयाने एक विशेष फास्ट-ट्रॅक सत्र न्यायालय नियुक्त केले आहे. बक्सा जिल्ह्याच्या जिल्हा न्यायाधीश शर्मिला भुईया या फास्ट-ट्रॅक न्यायालयाचे अध्यक्षस्थान भूषवतील. गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांनी ही नियुक्ती केली आहे.

जुबीन गर्ग यांचा गतवर्षी १९ सप्टेंबर रोजी सिंगापूरमध्ये समुद्रात पोहताना मृत्यू झाला होता. जुबीन तिथे चौथ्या नॉर्थ ईस्ट इंडिया फेस्टिव्हलमध्ये भाग घेण्यासाठी गेले होते. आसाम पोलिसांच्या सीआयडीच्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) या प्रकरणाची चौकशी केली आणि स्थानिक न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. त्यात सात जणांना आरोपी बनवण्यात आले आहे.

## अग्रलेख...

# बहुरूपी, बुभुक्षित भोंदू!

कोणत्याही एखाद्या उत्पादनास किंवा सेवेस मोठी मागणी असल्याचे सिद्ध होऊ लागते तेव्हा मागणीनुसार पुरवठा करणाऱ्यांची गर्दीही वाढू लागते, आणि मागणी वाढू लागली की त्या उत्पादन किंवा सेवेची किंमतही वाढत जाते, हा अर्थशास्त्राचा सामान्य नियम अध्यात्माच्या बाजाराला तंतोतंत लागू ठरताना दिसत आहे. असे झाले की वस्तू वा सेवांचा दर्जा खालावतो, भेसळीसारखे प्रकार वाढतात आणि काळाबाजारासही ऊत येतो. अलिकडे असंख्य संकटे आणि समस्यांचा सार्वत्रिक सुळसुळाट झालेला असताना व त्यापासून संरक्षण करण्याची हमी देणाऱ्यांचे हात मात्र तोकडे ठरत असताना, समाज किंवा व्यक्ती संरक्षणाच्या अपेक्षेने कोठे तरी नजरा खिळवून बसलेली असते. ज्यांचे हात वरपर्यंत वगैरे पोहोचलेले असतात, खिसे कायम खुळखुळत असतात, अशांना असे संरक्षण मिळविणे फारसे अवघड होत नाही. पण असा वर्ग फारच थोडा असून ज्यांची तशी क्षमता नाही, त्यांना मात्र समस्यामुक्ती आणि संकटांपासून संरक्षणासाठी देवावर किंवा नियतीवर अवलंबून राहणे भाग पडते. कोणत्याही समस्येमुळे ईश्वराने किंवा दैवाने मार्ग काढून द्यावा अशी हतबल भावना जेव्हा सामूहिकरीत्या वाढीस लागते, तेव्हा अशा हतबलांची गर्दी श्रद्धेच्या बाजारात सुरक्षिततेचा शोध घेऊ लागते आणि या बाजारातील सेवा किंवा उत्पादकांची मागणी वाढू लागली की पुरवठादारांची चंगळ सुरू होते. बाजाराचा हा नियम श्रद्धेच्या बाजारातही लागू ठरू लागला, तेव्हापासून अनेकांनी या बाजारात आपली आपली दुकाने थाटली. गेल्या काही दशकांपासून या बाजारात कायम तेजीच दिसत असून येथील दुकानदारांची भरभराट होत असल्याचे दिसते. कारण, या बाजारात मानसिक गरजांची पूर्तता होते अशी भावना असलेल्या ग्राहकांकडून दुकानदारांच्या दारी रीघ लागलेलीच असते. त्यामुळे दिवसागणिक कोठल्या ना कोठल्या गावात, शहरात किंवा देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात एखादा बाजारू दुकानदार आपले दुकान सुरू करतो, आपल्या पद्धतशीर यंत्रणेद्वारे लाखो रुपये खर्च करून जोरदार जाहिरातबाजी करतो आणि असे नवे दुकान सुरू झाल्याचे कळताच, तिकडे गरजू ग्राहकांची रीघ लागते. या व्यवसायाची साखळी मोठी गूढ असते. तो धंदा बघता बघता फोफावतो आणि मानसिक सुखाच्या भ्रामक कल्पनांत गुरफटलेला ग्राहकही त्या दुकानाची जाहिरात करू लागतो. अशा रीतीने अध्यात्म, ज्योतिष, भविष्यज्ञान, संकटमुक्ती, प्रेमविवाह, प्रतिष्ठा, राजकीय यश, संपत्तीच्या समस्या, कौटुंबिक कलह, अपत्यप्राप्ती अशा असंख्य समस्यांनी ग्रासलेले ग्राहक या दुकानदारांकडे रांगा लावतात. या बाजारातील प्रत्येक दुकानदाराने आपल्या धंद्याला साजेसा अवतार धारण केलेला असतो. यासाठी फार मोठी भांडवली गुंतवणूकही केलेली असते. प्रथमदर्शनी संकटमोचक भासावा असा एक मुखवटा त्यांना धारण करावा लागतो. त्यांच्या चेहऱ्यावर एक निरागस हास्य विलसत असते. अंगी ईश्वरी किंवा अतिमानवी शक्ती असल्याची जाणीव करून देणारा बाह्यांगी साधेपणा त्यांना धारण करावा लागतो आणि वैराग्याची किंवा विरक्तीची चिन्हे असलेली वेषभूषा परिधान करून आध्यात्मिक तेजाची झळाळी असलेल्या मुखवट्याआड मूळचा चेहरा बेमालूम झाकून ठेवावा लागतो. दैवी शक्तीचा वास असल्याचा भास व्हावा यासाठी मठ किंवा आश्रम नावाच्या या दुकानात धूप, अगरबत्त्या, चंदनादी पूजावस्तूंची गर्दी ठेवावी लागते आणि भक्तगण जमा होऊ लागले की दिशाभूल करण्यासाठी एखाद्या चमत्काराची जादूही त्यांनी आत्मसात करून ठेवावी लागते.

असेच एक दुकान महाराष्ट्राच्या अहिल्यानगर आणि नाशिक परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून जोमाने धंदा करत होते. त्याच्या नादी लागलेल्या ग्राहकांमध्ये सर्वच प्रकारचे भक्त असल्याने, त्याच्या धंद्याला संरक्षणाचे कवचही लाभल्याची चर्चा होती. राजकीय नेते, मंत्री, प्रतिष्ठित उद्योजक, सामान्य समस्याग्रस्त अशा सर्वांना या भक्ताने समस्यामुक्तीचा भविष्यवेधी मार्ग दाखविणारे दुकान सुरू केले आणि फसवणुकीच्या एका प्रकरणात त्याचा मुखवटा टराटरा फाटला. भविष्यवेध घेऊन समस्यामुक्तीचा मार्ग दाखविण्याचा दावा करणारा कॅप्टन खरात नावाचा हा भोंदू म्हणजे केवळ एका व्यक्तीच्या विकृत गुन्हेगारी प्रवृत्तीचे उदाहरण नाही; तर ते आपल्या समाजाच्या मानसिकतेतील खोलवर दडलेल्या अंधश्रद्धा, भीती आणि आंधळ्या श्रद्धेच्या जाळ्याचे भयावह चित्र उलगडणारे आणखी एक उदाहरण आहे. स्वतःला आध्यात्मिक मार्गदर्शक, ज्योतिषी आणि 'दैवी शक्तीचा धनी' म्हणविणाऱ्या या भोंदू दुकानदाराने असाच, आध्यात्मिक मुखवटा चढविला आणि कोणत्या ना कोणत्या समस्यांच्या भयाने पछाडलेल्या महिलांना मुक्तीचा विश्वास देत त्यांच्या शारीरिक आणि मानसिक शोषणाची आपली विकृती जोपासत राहिला. कॅप्टन खरात प्रकरण ही बाब जितकी धक्कादायक आहे, तितकीच सामाजिक मानसिकतेच्या बदलांचा अंतर्मुखपणे विचार करावयास भाग पाडणारी आहे. उपाय, विधी, कुंडली दोष किंवा दैवी संकट यांसारख्या संकल्पनांच्या आडून लोकांना भयभीत करणे आणि त्यातून स्वतःसाठी सत्ता व नियंत्रण निर्माण करणे ही या भोंदूची या बाजारातील युक्ती नवीन नाही. मात्र, या प्रकरणात ती अत्यंत योजनाबद्ध आणि क्रूर स्वरूपात वापरली गेल्याचे दिसते. गुंगीची औषधे देऊन अत्याचार करणे आणि त्याचे चित्रीकरण करून त्यांची पिळवणूक वा शोषण करणे ही केवळ वैयक्तिक गुन्हेगारी नाही; तर ती संघटित शोषण व्यवस्थेची लक्षणे आहेत. यामागील सामाजिक पृष्ठभूमीही दुर्लक्षित करता येणार नाही. आधुनिक शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीनंतरही समाजातील मोठा वर्ग अजूनही अंधश्रद्धेच्या पाशात अडकलेला आहे. संकटाच्या क्षणी तर्कबुद्धीपेक्षा 'आशीर्वाद देऊन संरक्षणाची हमी देणारा कोणीतरी वरचा हात' शोधण्याची मानसिकता अजूनही प्रबळ आहे. अशा वेळी 'कॅप्टन खरात'सारखे भोंदू स्वतःला देवदूत किंवा मार्गदर्शक म्हणून उभे करतात आणि लोकांच्या भीतीचा फायदा घेतात. या प्रकरणात राजकीय आणि प्रभावशाली व्यक्तींशी असलेले संभाव्य संबंध ही बाब अधिक गंभीर म्हणावी लागेल. अशा विकृत प्रवृत्तींना किंवा व्यक्तींना सामाजिक किंवा राजकीय संरक्षण मिळत असेल, तर न्यायव्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी केवळ गुन्हेगाराला शिक्षा देण्यापुरती मर्यादित राहू नये; तर त्या मागील साखळी, संबंध आणि संभाव्य संगनमत उघड करणेही तितकेच आवश्यक आहे. महिला सुरक्षेच्या दृष्टीनेही हे प्रकरण म्हणजे धोक्याचा एक गंभीर इशारा आहे. घर, कार्यालय किंवा सार्वजनिक ठिकाणांबरोबरच 'आध्यात्मिक' किंवा 'धार्मिक' जागाही सुरक्षित आहेत, असा समज या घटनेने खोटा ठरवला आहे. महिलांच्या विश्वासाचा गैरवापर करून केलेले शोषण हे समाजाच्या नैतिक अध:पतनाचे द्योतक आहे. त्यामुळे महिलांनी अशा तथाकथित गुरू, बाबांबाबत अधिक सजग राहणे आणि कोणत्याही संशयास्पद वर्तनाची त्वरित तक्रार करणे आवश्यक आहे. गेल्या अनेक दशकांत वारंवार उघडकीस येत असलेल्या अशा घटनांतून समाज जागृतीचे आणि श्रद्धा व अंधश्रद्धा यांतील धूसर सीमरेषा दाखवून देण्याचे महत्त्वही पुन्हा अधोरेखित होते. महाराष्ट्राने यापूर्वीही कायदे किंवा मोहिमांतून समाजजागृती केली आहे; परंतु अजूनही ती अपुरी आहे. शिक्षण व्यवस्थेत वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे, माध्यमांनी जबाबदारीने अशा प्रकरणांचा पाठपुरावा करणे आणि प्रशासनाने कठोर कारवाई करणे, या तिन्ही गोष्टी एकत्रितपणे घडल्याशिवाय बदल संभवत नाही. कॅप्टन खरात प्रकरणातून पुन्हा तोच जुना मूलभूत प्रश्न पुढे आला आहे. आपण खरोखरच पुरोगामी, प्रगतिशील, आधुनिक, विवेकनिष्ठ समाज आहोत, की संकटाच्या वेळी अजूनही आपण अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन अंधश्रद्धांच्या बाजारपेठांतील भोंदू बहुरुप्यांची भरभराट करतो, या प्रश्नाचे उत्तर शोधणे ही केवळ सरकार किंवा न्यायव्यवस्थेची जबाबदारी नाही. विवेक, विज्ञाननिष्ठा आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांचा स्वीकार केल्याशिवाय अशा घटनांची पुनरावृत्ती थांबणार नाही हे स्पष्ट असल्याने, ही समाजाची जबाबदारी ठरते. अन्यथा 'कॅप्टन खरात' ही केवळ एक व्यक्ती न राहता एक प्रवृत्ती बनत जाईल आणि तीच सर्वांत मोठी धोक्याची घंटा ठरेल.

---

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# दोन मालमत्ता विकून एक घर घेतल्यास भांडवली नफा कर कसा वाचवता येतो?

आजच्या काळात अनेक व्यक्तींकडे एकापेक्षा जास्त स्थावर मालमत्ता असणे, ही सामान्य बाब झाली आहे. नोकरी, व्यवसाय किंवा गुंतवणुकीच्या उद्देशाने लोक वेगवेगळ्या काळात फ्लॅट, घर किंवा प्लॉट खरेदी करतात. काही वर्षांनंतर परिस्थिती बदलते आणि अनेक जण दोन लहान मालमत्ता विकून एक मोठे किंवा चांगल्या ठिकाणचे घर खरेदी करण्याचा निर्णय घेतात. अशा व्यवहारांमध्ये सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे भांडवली नफा कर. योग्य नियोजन केले नाही, तर लाखो रुपयांचा कर भरावा लागू शकतो. मात्र, आयकर कायद्यातील काही तरतुदींचा योग्य वापर केल्यास हा कर पूर्णपणे किंवा मोठ्या प्रमाणात वाचवता येतो. हा लेख अशाच व्यावहारिक परिस्थितींचे सविस्तर स्पष्टीकरण देतो.

**भांडवली नफा कर कसा लागू होतो?** : जेव्हा एखादी व्यक्ती स्थावर मालमत्ता (फ्लॅट, घर, प्लॉट किंवा जमीन) विकते आणि त्या विक्रीतून नफा मिळतो, तेव्हा त्या नफ्यावर आयकर कायद्यानुसार कर आकारला जातो. जर मालमत्ता २४ महिन्यांपेक्षा जास्त काळ धरून ठेवली असेल, तर त्या नफ्यावर दीर्घकालीन भांडवली नफा (एलटीसीजी) लागू होतो.

२० टक्के की १२.५ टक्के - योग्य पर्याय कोणता? हे निवडण्याचा पर्याय फक्त ज्यांनी संपत्ती २३/०७/२०२४ च्या आधी संपादित केली आहे, त्यांच्यासाठीच उपलब्ध आहे. सध्या एलटीसीजीसाठी दोन पर्याय उपलब्ध आहेत

**१.२० टक्के कर (अनुक्रमणिका सह)**

• खरेदी किंमत इंडेक्सेशनने वाढवली जाते, • महागाईचा फायदा मिळतो, • दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी फायदेशीर

**२. १२.५ टक्के कर (अनुक्रमणिका शिवाय)** • नवीन पर्याय

• सोपी गणना, • काही प्रकरणांमध्ये कमी कर लागू होऊ शकतो

करदात्याने व्यवहारानुसार योग्य पर्याय निवडणे आवश्यक आहे.

**कलम ५४ - निवासी घर विकल्यास सवलत** : जर एखाद्या व्यक्तीने निवासी घर विकून दुसरे निवासी घर खरेदी केले, तर कलम ५४ अंतर्गत सवलत मिळते. **अटी** : • विकलेली मालमत्ता निवासी घर असावी, • नवीन मालमत्ता निवासी घर असावी

**खरेदी/बांधकाम कालावधी** : • विक्रीपूर्वी १ वर्ष, • विक्रीनंतर २ वर्षे • ३ वर्षांत बांधकाम

**कलम ५४एफ - प्लॉट किंवा जमीन विकल्यास सवलत** : जर प्लॉट किंवा जमीन विकून नवीन घर घेतले, तर कलम ५४ लागू होतो.

**अटी** : • विक्रीच्या दिवशी एकापेक्षा जास्त निवासी घर नसावे, • संपूर्ण विक्री किंमत गुंतवणे आवश्यक, • अंशतः गुंतवणूक केल्यास आनुपातिक सवलत

व्यावहारिक कर नियोजन - महत्त्वाच्या परिस्थिती

**परिस्थिती १** : दोन फ्लॅट विकून एक नवीन फ्लॅट

समजा : • फ्लॅट १ नफा : ३० लाख रुपये, • फ्लॅट २ नफा : २५ लाख रुपये. एकूण भांडवली नफा : ५५ लाख

जर ७० लाख किमतीचा नवीन फ्लॅट खरेदी केला, तर कलम ५४ अंतर्गत संपूर्ण ५५ लाख सवलत मिळू शकते.

**परिस्थिती २** : एक फ्लॅट आणि एक प्लॉट विकून एक घर खरेदी करणे

समजा : • फ्लॅट नफा : ३५ लाख - कलम ५४, • प्लॉट नफा : २५ लाख - कलम ५४. एकूण नफा : ६० लाख

**येथे सर्वांत महत्त्वाचा मुद्दा** : कलम ५४एफ साठी अट आहे की, विक्रीच्या दिवशी करदात्याकडे एकापेक्षा जास्त निवासी घर नसावे. म्हणून व्यवहाराचा क्रम अत्यंत महत्त्वाचा ठरतो. **योग्य पद्धत** : • प्रथम फ्लॅट विकणे, • त्यानंतर प्लॉट विकणे, • आणि मग नवीन घर खरेदी करणे

**योग्य नियोजन केल्यास** : • ३५ लाख (कलम ५४), • २५ लाख (कलम ५४ एफ) एकूण ६० लाख पूर्णतः करमुक्त होऊ शकतो.

चुकीचा क्रम ठेवल्यास कलम ५४ एफ सवलत नाकारली जाऊ शकते.

**परिस्थिती ३** : दोन मालमत्ता विकून नवीन घर बांधणे

**समजा** : • एकूण विक्री रक्कम : १.५० कोटी रुपये, • भांडवली नफा : ७० लाख रुपये

**जर** : प्लॉट खरेदी केला आणि ३ वर्षांच्या आत घर बांधले- कलम ५४/५४एफ अंतर्गत सवलत मिळू शकते

**भांडवली नफा खाते योजना (सीजीएएस) चे महत्त्व** : अनेक वेळा मालमत्ता विकली जाते, पण लगेच नवीन गुंतवणूक करता येत नाही.

**अशा वेळी** : • आयटीआर भरण्याच्या अंतिम तारखेपूर्वी सीजीएएस खात्यात रक्कम जमा करणे आवश्यक. अन्यथा कर सवलत मिळणार नाही.

**व्यवहार करताना होणाऱ्या सामान्य चुका**

• कलम ५४ आणि ५४ एफ मधील फरक न समजणे, • ५४ एफ पात्रता (एकापेक्षा जास्त घरांचा नियम), • दुर्लक्षित करणे, • व्यवहाराचा चुकीचा क्रम ठेवणे, • सीजीएएसमध्ये रक्कम जमा न करणे, • पूर्ण रक्कम गुंतवणूक न करणे. **निष्कर्ष** : दोन मालमत्ता विकून एक नवीन घर खरेदी करणे ही केवळ गुंतवणूक नसून, एक कर नियोजनाची संधी आहे.

**योग्य नियोजन केल्यास** : • कलम ५४, • कलम ५४एफ, • आणि २० टक्के विरुद्ध १२.५ टक्के कर पर्याय

सामान्य वाचकांसाठी एक गोष्ट लक्षात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे की, मालमत्ता खरेदी-विक्री ही केवळ गुंतवणूक किंवा गरज पूर्ण करण्याची प्रक्रिया नसून, ती एक महत्त्वाची कर नियोजनाची संधी देखील असते. अनेक वेळा योग्य माहितीच्या अभावामुळे किंवा घाईघाईत घेतलेल्या निर्णयांमुळे अनावश्यक भांडवली नफा कर भरावा लागतो. प्रत्यक्षात, आयकर कायद्यातील उपलब्ध तरतुदींचा योग्य आणि वेळेवर वापर केल्यास मोठ्या प्रमाणात कर बचत करता येते. त्यामुळे कोणतीही मालमत्ता विकण्यापूर्वी व्यवहाराचा क्रम, गुंतवणुकीचा कालावधी आणि संबंधित सवलतींची अटी समजून घेणे आवश्यक आहे. योग्य सल्ला आणि नियोजन केल्यास आपण केवळ चांगली मालमत्ता मिळवू शकत नाही, तर आपल्या आर्थिक फायद्याचाही जास्तीत जास्त लाभ घेऊ शकतो.

(९०९६३३२३५३, कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार)

---

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# मानवजात अधिक रानटी होतेय का?

सध्याचे जग एका विचित्र वळणावर उभे आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाने अभूतपूर्व प्रगती साधली, मानवाने चंद्र-मंगळ गाठला, कृत्रिम बुद्धिमत्ता दैनंदिन आयुष्याचा भाग झाली; पण अशा नव्या आकांक्षांच्या, स्वप्नांच्या काळात पृथ्वीवर संघर्षांचे, युद्धांचे सावट अधिक गडद होताना दिसते. एका बाजूला विकासाची चकाकी, तर दुसऱ्या बाजूला विनाशाची छाया अशा संघर्षात मानवजात अडकलेली आहे. सध्या जगात अनेक ठिकाणी संघर्ष पेटलेले आहेत. इराण-इस्रायल-अमेरिका हा संघर्ष ताजा आहे. त्याने सारे जग वेठीस धरले आहे. युक्रेन आणि रशिया यांच्यातील युद्धाने दोन वर्षांहून अधिक काळ जगात अस्थिरता निर्माण केली आहे. हे सारे संघर्ष भूभागांसाठी तर आहेतच, शिवाय सामरिक वर्चस्व, राजकीय वर्चस्व आणि जागतिक सत्ता-संतुलनाचा प्रश्न याच्याशी संबंधित आहे. गाझा पट्टी आणि इस्रायल यांच्यातील संघर्षाने मानवी संकटाची परिसीमा गाठली आहे. हजारो निरपराध नागरिकांचे जीव जात आहेत आणि युद्धाचे नियमही पायदळी तुडवले जात आहेत. सुदानमध्ये अंतर्गत सत्तासंघर्षामुळे गृहयुद्ध सुरू आहे. म्यानमारमध्ये सैन्य आणि लोकशाही समर्थक यांच्यातील संघर्ष अजूनही शांत झालेला नाही. येमेनमध्ये अनेक वर्षांपासून सुरू असलेले युद्ध हे मानवांसाठी आपत्तीचे मोठे केंद्र बनले आहे. सीरियात दशकभर चाललेल्या युद्धाने संपूर्ण पिढी उद्ध्वस्त केली आहे. हे सगळे पाहता, संघर्षांची संख्या मोजणेही अवघड झाले आहे. संघर्षांचे स्वरूपही बदलले आहे.

पूर्वीची युद्धे राष्ट्रांमध्ये थेट होत असत; आज युद्धे बहुआयामी झाली आहेत. आर्थिक निर्बंध, माहिती युद्ध (इन्फर्मेशन वॉरफेअर), सायबर हल्ले आणि दहशतवादी कारवाया ही सगळी आधुनिक युद्धाची रूपे आहेत. शत्रू सीमारेषेच्या पल्याड आहे तसा तो इंटरनेटच्या जाळ्यातही आहे. त्यामुळे युद्ध अधिक गुंतागुंतीचे, अधिक व्यापक झाले आहे. या पृष्ठभूमीवर सर्वांत मोठा प्रश्न उभा राहतो तो असा की, प्रगती-प्रगती म्हणत असताना मानवजातीने नेमके काय साध्य केले? आजही जगात कोट्यवधी लोक भुकेने त्रस्त आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालांनुसार, अन्नाची



कमतरता आणि कुपोषण ही गंभीर जागतिक समस्या आहे. शिक्षणाच्या क्षेत्रातही मोठी तफावत आहे. अनेक देशांमध्ये मुलांना प्राथमिक शिक्षणही मिळत नाही. म्हणजेच, एकीकडे शस्त्रास्त्रांवर अब्जावधी डॉलर्स खर्च होत आहेत, तर दुसरीकडे मूलभूत गरजांसाठी निधी अपुरा पडतो. युद्धांमुळे निर्माण झालेल्या शस्त्रास्त्रांच्या नव्या स्पर्धेने या संकटात भर घातली आहे. इराणकडून या युद्धात जी शस्त्रास्त्रे दाखविली जात आहेत, त्यावरून त्या देशाने किती खर्च केला असेल, याची कल्पना येते. अण्वस्त्रांची संख्या, अत्याधुनिक क्षेपणास्त्रे, ड्रोन तंत्रज्ञान या सर्व गोष्टींवर प्रचंड खर्च केला जातो. हा पैसा जर शिक्षण, आरोग्य आणि गरिबी निर्मूलनासाठी वापरला गेला असता, तर जगाचे चित्र वेगळे असते. पण वास्तव वेगळे आहे. भीती आणि अविश्वास यांच्या आधारेच जगाचे राजकारण चालते. यामुळेच एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो आणि तो असा की- जग अधिक रानटी होत आहे का? की हीच प्रगतीची किंमत आहे? वस्तुस्थिती अशी आहे की मानवाचे बाह्य जीवन अधिक आधुनिक झाले असले, तरी अंतर्मनातील संघर्ष संपलेले नाहीत. लोभ, सत्तेची लालसा, वर्चस्वाची इच्छा या मानवी प्रवृत्ती अजूनही तशाच आहेत. त्यामुळे तंत्रज्ञान बदलले, पण मनुष्याचा मूलभूत स्वभाव फारसा बदललेला नाही. ही स्थिती बदलायची असेल तर जागतिक पातळीवर संवाद आणि कूटनीती (डिप्लोमसी) यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. देशांनी आपले मतभेद चर्चेने सोडवण्याची तयारी ठेवली पाहिजे. दुसरे म्हणजे, आंतरराष्ट्रीय संस्थांची भूमिका अधिक प्रभावी होणे गरजेचे आहे. संयुक्त राष्ट्रांसारख्या संस्थांनी केवळ निवेदने देण्यापेक्षा ठोस कारवाई करण्याची गरज आहे. मानवाचेच निर्णय मानवाचे भविष्य ठरवतील. आपण विनाशाचा मार्ग निवडला, तर सभ्यतेचा व प्रगतीचा मुखवटा टिकणार नाही, हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

९८५०३३९२४०

---

## प्रासंगिक

**प्रमोद डोरले**

# भारतीय संस्कृतीचा शाश्वत आधारस्तंभ

रामायण आणि महाभारत ही महाकाव्ये भारतीय संस्कृतीचे दोन शाश्वत आधारस्तंभ आहेत. सांस्कृतिक जीवनाच्या वाटचालीत पडझडीत, विविध आक्रमण कालातील अंधारलेल्या युगात, सत्याचा, धर्माचा, जीवन मर्यादांचा दिव्य प्रकाश दाखविणारे दीपस्तंभ म्हणून ही दोन महाकाव्ये आधुनिक काळातही वैचारिक, तात्त्विक ज्ञानात्मक मार्गदर्शन करण्याची क्षमता ठेवू शकतात. या दृष्टीने ही दोन महाकाव्ये अक्षर वाङ्मय या कसोटीला पूर्ण न्याय देणारी अशीच आहे. व्यासोच्छिष्ट जगत सर्वम् ही उक्ती आजही सार्थ ठरते आहे. रामायण आणि महाभारत या ग्रंथातील तत्त्वज्ञानाने भारतीय संस्कृतीला नीतिमूल्यांचे, जीवनाच्या शाश्वत, चिरंतन मूल्यांचे अधिष्ठान मिळाले आहे. त्यांतील महन्मंगल आणि उदात्त चारित्र्याच्या गुण संस्कारांमुळे येथील समाजमनाचे पोषण झाले. विकसन झाले. आसेतुहिमाचल पसरलेल्या या देशात सांस्कृतिक एकता निर्माण होऊ शकली. त्याच एकात्मतेच्या जोरावर अनेक भीषण आक्रमणाचे आघात ही संस्कृती पचवू शकली हे जगाने अनुभवलेले सत्य आहे

सूर्यवंशी इक्ष्वाकू कुळात जन्मलेले प्रभू श्रीरामचंद्र हे मर्यादा पुरुषोत्तम आहेत. महर्षी श्री वाल्मीकिंच्या दिव्य प्रतिभेतून साकार झालेले हे महन्मंगल चरित्र! व्यक्तिमत्त्व! मानवी जीवनाशी संबंधित असलेल्या सर्व भूमिकांचा परमोच्च उत्तुंग आदर्श म्हणजे प्रभु श्रीरामचंद्र! रामराज्याची निर्मिती करणारा आदर्श राजा, वडिलांनी दिलेल्या वचनपूर्तीसाठी सिंहासनावर पडणारे पाऊल दुसऱ्याच क्षणाला वनातील कंट-काकीर्ण मार्गावर टाकून रघुकुल रीत सदा चली आयी -- प्राण जाय पर वचन न जायी- हा रघुवंशाचा वारसा जोपासणारा आदर्श पुत्र, रावणाने सीतामाईला पळवून नेल्यानंतर व्याकुळतेने, हे सीते! हे सीते म्हणून आक्रोश करणारा, विरहाग्नीत पोळणारा आदर्श पती, सुग्रीवावरील अन्याय दूर करून त्याला योग्य तो न्याय मिळवून देणारा परम मित्र, युद्धात लक्ष्मणाला शक्तीचा आघातामुळे आलेल्या मूर्च्छावस्थेत भावुक होऊन विलाप करणारा ज्येष्ठ बंधू, कैकेयीने अन्याय केलेला असतानाही कौसल्येपेक्षाही तिला अधिक मान देणारा पुत्र, सामान्य वनवासी जीवन जगणाऱ्या गुहाला सन्मानाने मित्र म्हणून स्वीकार करणारा हितैषी, सर्वप्रकारच्या सामर्थ्याने सुसज्ज असलेल्या दानवी, मायावी सामर्थ्याने युक्त आणि प्रत्यक्ष देवांनाही पराजित करणाऱ्या असुर शक्तीचा सहजपणे पराभव करणारा वीराग्रणी नेता, रावणाचा वध झाल्यानंतर मरणान्तानि न वैराणि न मे कृतानिच- चा शत्रुभावना विरहिततेचा मानवधर्माचा मापदंड प्रस्थापित करणारा महामानव आणि अयोध्येला परत आल्याबरोबर आपली मातृभूमी म्हणून तिला वंदन करून 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गात अपि गरियसी' या श्रेष्ठतम राष्ट्रभक्तीचा आदर्श प्रस्थापित करणारा, पुण्यभूमी धर्मभूमी, देवभूमी भारतमातेचा सुपुत्र अशा अनेक विलोभनीय जीवनादर्शांनी विनटलेले असे हे मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्री रामचंद्रांचे चरित्र!



महर्षी श्री वाल्मीकिंच्या दिव्य प्रतिभेतून प्रकट झालेल्या या रामायण महाकाव्याचा, त्यांतील विविध व्यक्तिजीवनाचा प्रभाव विश्वव्यापी आहे. विश्वसंचार करणाऱ्या आपल्या पूर्वजांनी ही रामकथा आपल्या सोबत जगाच्या विविध देशांमध्ये नेली. ते परत आलेत पण जीवनजगण्याचे तत्त्वज्ञान शिकविणारी रामकथा तेथे रुजली - विकसित झाली. त्यांच्याही जीवनाचे एक अविभाज्य अंग झाली. त्यांच्या साहित्यात, आचरणात, समाजजीवनात, राष्ट्रजीवनात, परंपरागत मूल्यांमध्ये विसावली, प्रतिबिंबित झाली. रामकथेच्या प्रभावाने प्रभावित झालेले देश म्हणून आज आपण चीन, तिबेट, सायबेरिया, कांबोडिया (कम्बुज) इंडोनेशिया, इत्यादी अनेक देशांची नावे घेऊ शकतो. रामन् रवागान् म्हणजे रामकथा, रामायण हे त्यांच्या जीवनाचे मार्गदर्शन करणारे पाथेय आहे. उदाहरण म्हणून आपण काही उल्लेख पाहू.

सायवेरियातील रामकथेत रिच्छेन पाल्साङ्गो या लेखकाने लोकांना उपदेश करताना असे म्हटले आहे की, ओलान-दुर आरव, बोलुग्रासन येरवे रवुमन् देमि, आलिया नागादुम्बा । ओख्यु आमुर सांगुरक्रुवा इंद्रेन, ओम्बागान दूर नेङ्ग उलु शिनुग्युयाई । ओल्ज गुसेल दुर नेङ्ग येसे शिनुग्सेन उ गेम इयरे । ओरिदुमान्गोस उन निगेन रवागान लंगा-दुर आलाग्दासान्'' म्हणजे -- जनतेच्या नेत्यांनी, महापुरुषांनी क्षुल्लक अशा आनंदात मग्न होऊ नये. विषयलंपट होऊ नये. लोभात पडल्याने व कामवश झाल्याने प्राचीन काळी राक्षसराज रावण लंकेत मारला गेला. इंडोनेशियातील रामायणाला काकाविन रामायण असे म्हणतात. त्यात श्रीराम भरताला उपदेश करताना म्हणतात- हे भरता! चारित्र्याचे रक्षण कर. राग द्वेष सोडून दे. ईर्ष्या आदि दोषांपासून मन आणि शरीर शून्य कर. अत्याधिक अहंकारापासून स्वतःला वाचव. निंदा करू नकोस. कुलीन घराण्याचा गर्व बाळगू नकोस. हे भरता हाच खरा धर्म आहे व हेच खरे सत्य आहे. श्रीरामाचा उपदेश ऐकून भरत अयोध्येला परत गेला आणि भक्तिपूर्वक राज्य रक्षणात व्यग्र राहिला 'भरत सिर तमोल-भक्ति मंराक्ष राज्य'. - अशी ही ब्रह्मांडाला व्यापून असणारी रामकथा संपूर्ण मानव समाजाच्या मनावर अधिराज्य गाजवणारी! मानवी जीवनाचा उद्देश काय? त्याला अर्थ केव्हा आणि कसा प्राप्त होतो. मानवी जीवनात पार पाडाव्या लागणाऱ्या या विविध भूमिकांमध्ये । कर्तव्यनिष्ठेच्या अंतिम मर्यादा कशा व कोणत्या? वरील सर्व मूलभूत प्रश्नांची, हिंदू धर्म, परंपरा, संस्कृती यांना साक्षी ठेवून महर्षी वाल्मीकिंनी हा ग्रंथ लिहिला आहे. विविध व्यक्तिरेखांच्या माध्यमातून त्याचा मर्मग्राही आलेख स्पष्ट केला आहे. रामायणातील व्यक्तिरेखा दशरथ, कौसल्या, कैकेयी, सुमित्रा, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, सीता, हनुमान, वाली, सुग्रीव, विभीषण, रावण, कुंभकर्ण, या व्यक्तिरेखा आणि भक्तिमार्ग प्रदीप असलेली शबरी, मानवी जीवनातील एकेका भावाचे उत्तुंग शिखर आहे. त्यांचे भाव प्रकटनातून वाल्मीकिंनी संपूर्ण मानवी जीवनाचा उत्क्रांतीपटच रेखाटला आहे. या सर्वांच्या भावविश्वाचे मध्य केंद्रक (न्यूक्लियस) मात्र राम आहे. रथचक्राच्या आऱ्याप्रमाणे सर्व जीवनरेखा या केंद्राशी निगडित आहेत. त्यामुळे सूर्यचिन्हांकित ध्वज पताकेसह इक्ष्वाकू कुळाचा हा जीवनरथ अक्षुण्णपणे, अखंडपणे धावतो आहे. युगानुयुगे तो धावतच राहणारा आहे. कथा, प्रवचन, कीर्तन, नामस्मरण, नवविधा भक्ती, रामायणातीलल व्यक्तिदर्शन, अध्यात्म, तत्त्वज्ञान या विविध आयामातून रामकथेचा हा गजर होतच राहणार आहे. त्यांत आतापर्यंत अनेकांनी सहभाग दिला आहे. स्वतःचा खारीचा वाटा उचलला आहे. रामकथेचा सेतु बांधण्यास मदत केली आहे. संवाद, कथा, कीर्तन, प्रवचनाद्वारा रामायणकथा घराघरापर्यंत, घरातील व्यक्ती व्यक्तींपर्यंत पोहोचविण्याचा अथक व प्रमाणिक प्रयत्न केला आहे. अयोध्येतील नूतन भव्य राम मंदिरात किती कोटी लोकांनी दर्शन घेतले, किती कोटी रुपयांचा व्यवहार झाला. 'टुरिझम' कसे विकसित झाले यापेक्षा हिंदू समाजातील घराघरातील सीतारूपी मातृशक्ती स्त्रीभक्षी आणि 'जिहादी' असुरी शक्तींपासून कशी सुरक्षित ठेवता येईल आणि त्यासाठी रावणाचे दहा मस्तके 'तोडण्याचा' अतुल पराक्रमाची प्रेरणा कशी मिळेल याचे चिंतन करण्याची आवश्यकता आहे. .... 'देवदास पावती फत्ते यद्यर्थी संशय नाही' हा 'देवा -- सूर' संग्रमात सिद्ध झालेला, प्रचीतीस आलेला 'शाश्वत सिद्धांत आहे'.

९८६०२९६१३१

---

## वाचक पत्रे

### 'उंच राहो गुढी तरुण भारताची'

लहानपणापासून घरी 'तरुण भारत' येत होता. रविवारच्या पुरवणीत बालविभाग होता. तो नेहमी वाचायचो. बालवय संपल्यावर सिनेमाचे आकर्षण असायचे. तेव्हा सिनेमा प्रदर्शित व्हायच्या आत त्याची स्टोरी पेपरला यायची. शशिकुमार भगत लिहायचे. ते सुद्धा नित्य वाचत असायचो. 'बंडी उलार झाली' हे सदर माझ्या अत्यंत आवडीचे होते. वहाडी भाषेतील लिखाण मला प्रचंड आवडायचं. जेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार होते तेव्हा त्यांनी बेरोजगारांसाठी भत्ता सुरू केला होता. तेव्हा त्यांनाच उद्देशून मी पहिलं वहिलं पत्र तरुण भारतात वाचकांचे मनोगत सदरात पाठवले होते त्याचे शीर्षक होते ''काय शरदराव चेष्टा करता.'' ते प्रकाशित झालं आणि आजूबाजूच्यांनी सांगितलं. तेव्हापासून विविध घटनांवर लिहिणे सुरू झाले व समाजातील इतरही लोक विविध विषय देते झाले. आजही ते अव्याहतपणे सुरूच आहे. कोण्या वाचकाचा फोन आला व कौतुकाचे दोन शब्द आले की मन सुखावून जाते. एक लेखक म्हणून तरुण भारतनेच मला घडविले आहे. मला कवी म्हणूनही ओळख तरुण भारताचीच आहे. आज या वृत्तपत्राला शंभर वर्ष झाले म्हणून मी सांगतो की ''माझ्या वृत्तपत्राला शंभर वर्ष झाले'' सोशल मीडियाच्या विविध साधनांमधून एक वृत्तपत्र नुसते टिकावे नाही तर नवनवीन संकल्पना राबवीत वाढतच जावे. आता तर पुण्यातही भरारी घेण्यास सज्ज यासारखे दुसरे कौतुक नाही. एक उत्तम व्यवस्थापन, जाणता संपादक आणि खांद्याला खांदा लावून तरुण भारताची गुढी उंच करणारे पत्रकार, कर्मचारी वृंद यांचे खरे तर अभिनंदन.

**मनोज वैद्य**

### संसदेतील चर्चेतून काँग्रेसचे वाभाडे आणि भाजपला इतिहासाची संधी

भारतीय लोकशाहीत संसदेला चर्चा आणि संवादाचे मंदिर मानले जाते. मात्र, गेल्या काही वर्षांतील लोकसभेचे कामकाज पाहिले, तर काँग्रेस पक्षाकडून उपस्थित केले जाणारे मुद्दे आणि त्यानंतर होणारी चर्चा ही काँग्रेससाठी फायद्याऐवजी तोट्याचीच ठरत असल्याचे चित्र दिसते. विशेषतः राहुल गांधी यांनी मांडलेले अविश्वास ठराव किंवा त्यांनी घडवून आणलेली आक्रमक चर्चा ही भाजपला इतिहासाचे उत्खनन करण्याची आयती संधी उपलब्ध करून देत आहे.

राहुल गांधी अनेकदा संसदेत असे प्रश्न उपस्थित करतात, ज्याचे मूळ काँग्रेसच्याच जुन्या धोरणांमध्ये असते. जेव्हा विरोधी पक्षनेते म्हणून ते सरकारला घेरण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा भाजपचे अभ्यासू नेतृत्व प्रत्युत्तर देताना वर्तमानापेक्षा काँग्रेसच्या भूतकाळावर अधिक प्रहार करते. आजच्या मतदारांमधील मोठा हिस्सा हा नवमतदार किंवा तरुण पिढीचा आहे. या पिढीने नेहरू, इंदिरा गांधी किंवा राजीव गांधी यांचा कार्यकाळ प्रत्यक्ष पाहिलेला नाही. संसदेतील या चर्चेच्या निमित्ताने जेव्हा भाजपचे नेते कलम ३७० च्या अंमलबजावणीतील ऐतिहासिक चुका, १९६२ च्या युद्धातील भूभाग किंवा बोफोर्स आणि २-जी स्पेक्ट्रमसारखे भ्रष्टाचाराचे जुने विषय पुराव्यासह मांडतात, तेव्हा ही नवीन पिढी काँग्रेसच्या इतिहासाकडे नकारात्मक दृष्टीने पाहू लागते. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भाजपचे संसद सदस्य आणि प्रवक्ते हे संसदीय आयुधांचा, नियमावलीचा आणि आकडेवारीचा सखोल अभ्यास करून सभागृहात येतात. याउलट, राहुल गांधी यांच्याकडून राफेल विमान खरेदी असो की आर्थिक धोरणांवर त्यांच्याकडून होणाऱ्या विसंगत विधाने संसदेच्या पटलावर टिकत नाहीत. जेव्हा विरोधी नेता सभागृहात विसंगत आकडेवारी मांडतो, तेव्हा भाजपचे नेते त्या संधीचा फायदा घेऊन राहुल गांधींच्या अभ्यासावर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

थोडक्यात सांगायचे तर, जोपर्यंत काँग्रेस पक्ष संसदेत अभ्यासपूर्ण मांडणी करत नाही आणि आपल्या इतिहासातील चुकांचे समर्थन करण्याऐवजी भविष्याचा ठोस अजेंडा मांडत नाही, तोपर्यंत संसदेतील प्रत्येक चर्चा त्यांच्यासाठी सेल्फ-गोल ठरत राहील. राहुल गांधींनी संसदेला आपल्याच पक्षाचे वाभाडे काढण्याचे व्यासपीठ बनवले आहे की काय, असा प्रश्न आज सर्वसामान्यांना पडतो आहे.

**अविनाश देशपांडे**

### आचारसंहितेची पायमल्ली


सुसंस्कारित, सुशिक्षित आणि समंजस कसे म्हणावे हा एक प्रश्नच पडतो. कारण स्त्री-पुरुष हे कोणताही समारंभ, सामुदायिक कार्यक्रम, विवाह सोहळा किंवा अन्य निमित्ताने अशा सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमतात. खूप कालांतराने एकमेकांना भेटतात आणि घोळका करून गप्पा मारत जाण्या-येण्याच्या वाटेमध्ये उभे राहतात. त्यामुळे जाणाऱ्या येणाऱ्यांची मोठी पंचायत होते. गप्पागोष्टीत एवढे रंगून जातात की त्यांना म्हणावे लागते, रस्ता द्या आम्हाला, जाऊ द्या म्हटले तरी त्यांना भान नसते. थोडेसुद्धा बाजूला होत नाहीत आणि बोललं तर राग येतो म्हणून काय म्हणावे अशा लोकांना प्रश्न पडतो.

**देविदास पाठक**

महत्त्वाचे

### ग्वाटेमाला मैत्रीपूर्ण सामन्यात मेस्सीकडे अर्जेंटिनाचे नेतृत्व

**ब्यूनस आयर्स :** फिफा फुटबॉल विश्वचषकात आपल्या विजेतेपदाचे रक्षण करण्याच्या तयारीत असलेल्या अर्जेंटिनाने



३१ मार्च रोजी ग्वाटेमालाविरुद्ध होणाऱ्या मैत्रीपूर्ण सामन्यासाठी लियोनेल मेस्सीला संघात बोलाविले आहे. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे कतारमध्ये २७ मार्च रोजी होणारा अर्जेंटिना व स्पेन यांच्यातील सामना रद्द करण्यात आल्यानंतर, ब्यूनस आयर्समधील ला बोम्बोनेरा येथे हा सामना आयोजित करण्यात आला आहे. प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी यांनी शारीरिक समस्यांमुळे स्ट्रायकर लॉटारो मार्टिनेझ, डिफेंडर लिसांद्रो मार्टिनेझ आणि मिडफिल्डर जिओवानी लो सेल्सो यांना संघातून वगळले आहे. मार्टिनेझ खेळण्यासाठी पात्र ठरला आहे, परंतु तो अद्याप इंटर मिलानसाठी परतलेला नाही. त्याच्या जागी ब्राझीलच्या पाल्मेरास संघाच्या जोस मॅन्युएल लोपेझला बोलाविण्यात आले आहे. मॅन्चेस्टर युनायटेडचा लिसांद्रो मार्टिनेझ शारीरिक त्रासामुळे अनुपलब्ध आहे. रियल बेटिसचा लो सेल्सो स्नायू फाटण्याच्या दुखापतीतून सावरत आहे. तोमास पॅलासिओस व गॅब्रिएल रोजासला पहिल्यांदाच वरिष्ठ राष्ट्रीय संघात बोलावण्यात आले आहे. जियानलुका प्रेस्टियान्नी याला संघात बोलावण्यात आले आहे.

### वैभव सूर्यवंशीला केवळ क्रिकेटचा आनंद घेऊ द्या

**जयपूर :** भारताचा उदयोन्मुख फलंदाज वैभव सूर्यवंशीला मैदानाच्या आत आणि बाहेर कोणत्याही अतिरिक्त दबावाशिवाय त्याच्या खेळाचा आनंद घेण्याची मुभा दिली पाहिजे, असे मत राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान परागने व्यक्त केले. आयपीएलमध्ये सूर्यवंशी भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वालसोबत डावाची सुरुवात करेल. १४ वर्षीय वैभवला कोणत्याही बाह्य दबावाशिवाय त्याच्या खेळात प्रगती करत राहण्यासाठी त्याला त्याची स्वतःची जागा आणि पुरेसा वेळ दिला गेला पाहिजे. तो सध्या अत्यंत उत्कृष्ट खेळ करत आहे व तो नक्कीच देशाची मान उंचावेल, असेही तो म्हणाला. सूर्यवंशीला सामन्याच्या सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करण्याची पूर्ण मुभा दिली जाईल आणि त्याचा वरिष्ठ सहकारी जयस्वाल हा दबावाचा सामना करण्यास पूर्णपणे सक्षम आहे, असेही तो म्हणाला.

### चेन्नई सुपर किंग्समध्ये संजू सॅमसनचे स्वागत

**चेन्नई :** भारताच्या विश्वचषक विजेत्या संघाचा स्टार खेळाडू संजू सॅमसन, पाच वेळा



विजेतेपद पटकावणाऱ्या चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) संघासोबतच्या इंडियन प्रीमियर लीग मोहिमेत सहभागी होण्यासाठी गुरुवारी चेन्नईत दाखल झाला. आयपीएल २०२६ स्पर्धेची सुरुवात २८ मार्च रोजी होणार आहे. सीएसकेने समाजमाध्यमावरून सॅमसनच्या आगमनाचा एक फोटो शेअर करण्यात आला, त्यावर 'चेन्नईमध्ये चैतन्य' असे लिहिले होते. आणखी एका पोस्टमध्ये त्यांनी म्हटले, 'ज्या क्षणाची आम्ही आतुरतेने वाट पाहत होतो, तो क्षण आला! विश्वविजेता संजू सॅमसन इथे दाखल झाला आहे. आपल्या मोहिमेची सुरुवात (पहिला सामना) सॅमसनची जुनी फ्रॅन्चायझी असलेल्या राजस्थान रॉयल्सविरुद्ध करेल. रवींद्र जडेजा आणि सॅम करन यांच्या बदल्यात, राजस्थान रॉयल्सकडूनच या यष्टिरक्षक-फलंदाजाला आपल्या संघात समाविष्ट करून घेतले आहे. सॅमसन सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. हंगामादरम्यान संघाला आक्रमक सुरुवात करून देण्यासाठी, भारताच्या १९ वर्षांखालील विश्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार आयुष म्हात्रे याच्यासोबत तो डावाची सुरुवात (ओपनिंग) करण्याची दाट शक्यता आहे.

### पॉल स्टर्लिंगचा आर्यण्लड टी-२० कर्णधारपदाचा राजीनामा

**डब्लिन :** अनुभवी फलंदाज पॉल स्टर्लिंगने आर्यण्लडच्या टी-२० संघाच्या कर्णधारपदाचा राजीनामा दिला आहे. संघाने २०२८ मध्ये होणाऱ्या आगामी पुरुष २० विश्वचषकासाठी नियोजन करण्यास सुरुवात केली असतानाच हा निर्णय घेण्यात आला आहे. तथापि, ३५ वर्षीय स्टर्लिंग एकदिवसीय सामन्यांमध्ये संघाचे नेतृत्व करणे मात्र सुरूच ठेवणार आहे. स्टर्लिंगची ऑक्टोबर २०२३ मध्ये एकदिवसीय आणि टी-२० या दोन्ही प्रकारांसाठी कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. नुकत्याच पार पडलेल्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये त्याने आयर्लण्डचे नेतृत्व केले होते. भारत आणि श्रीलंकेत आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत ब गटात स्थान मिळालेल्या आयर्लण्ड संघाला पाचपैकी केवळ तीन गुण मिळवता आले आणि त्यांना गटात चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. या युरोपियन संघाने गट फेरीत केवळ एका सामन्यात विजय मिळवला, दोन सामन्यांत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला, तर एक सामना पावसामुळे रद्द झाला.

# महेंद्र गायकवाड, बोडकेची विजयी सलामी

## महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा, वाघोली ● कोल्हापूरच्या मृणालला सुवर्ण, पुण्याच्या ओंकारला रौप्य

◆ **वाघोली, पुणे, १९ मार्च**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने व रामकृष्ण अण्णा सातव पाटील कर्तव्य फाऊंडेशन आयोजित ६८ वी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी किताब कुस्ती स्पर्धा वाघोली, पुणे येथील स्व. अजितदादा पवार क्रीडानगरीत सुरू आहे. केसरी किताबासाठी माती विभागात सोलापूरच्या महेंद्र गायकवाड व नाशिकच्या बाळू बोडकेने विजयी सलामी नोंदविली.

उत्कंठावर्धक लढतीत अनुभवी महेंद्र गायकवाडने विशाल बनकरला ६-१ गुणांनी नमविले, तर बाळू बोडकेने कोल्हापूरच्या बलाढ्य माऊली जमदाडेवर १० - ५ गुणांनी सनसनाटी विजय नोंदविला.

५७ किलो वजन गटाच्या माती विभागात अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या मृणाल पाटीलने पुणे शहराच्या ओंकार निगडेवर ४-२ अशा गुणफरकाने मात करून सुवर्णपदक पटकावले. ओंकारला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. कोल्हापूरच्या सुदर्शन पाटीलने अजय निंबाळकरवर ७-४ अशी मात करून कांस्यपदक मिळविले.



केसरी माती विभाग पहिल्या फेरीच्या लढतीत झुंजताना महेंद्र गायकवाड व विशाल बनकर

गुरुवारी सकाळच्या सत्रात ५७ व ८६ किलो वजनी गटाच्या अत्यंत चुरशीच्या लढती हजारो कुस्ती शौकीनांच्या उपस्थितीत चित्तथरारक लढती झाल्या. यामध्ये पदकांचे दावेदार म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जात होते. अशा काहींचे आव्हान संपुष्टात आल्याने त्यांचे पदकाचे स्वप्न भंगले. माती विभागातील ८६ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत सोलापूर शहरच्या मशीद शेखने सोलापूर जिल्ह्याच्या जय जाधवचा १०-० असा दणदणीत पराभव केला. तर पुणे शहरच्या चंद्रहार नरळे याने साताऱ्याच्या विशाल कोकरे यांचा चुरशीच्या लढतीत अनपेक्षितरीत्या ४-२ अशा पराभव अंतिम फेरीत प्रवेश केला.

गादी विभागातील ५७ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत कोल्हापूर शहराचा राष्ट्रीय मल्ल अक्षय ढेरे याने आपल्या लौकिकाला साजेसा खेळ करत कल्याणच्या विनायक भोईरचा १३-२ असा मोठ्या गुण फरकाने पराभव केला, तर दुसऱ्या लढतीत नाशिक जिल्ह्याच्या शुभम आचपाळे याने साताऱ्याच्या साहिल गोफणेला १०-२ अशी मात देत अंतिम फेरी गाठली.

### प्रामाणिकपणे खेळ करा : सुनेत्रा पवार



'स्व. अजितदादा पवार क्रीडानगरी' येथे आयोजित महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन मातृशक्तीच्या हस्ते करण्यात आले असून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा रंगला. यावेळी नगरविकास व परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, रामदास तडस व आयोजक रामकृष्ण सातव पाटील उपस्थित होते. सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्रातील कुस्ती परंपरेचा गौरव करत खेळाडूंना प्रामाणिकपणे खेळ सादर करण्याचे आवाहन केले.

# पुरुष हॉकी संघ अनुरूप योजनेसह सज्ज असेल

## प्रशिक्षक क्रेग फुल्टन यांचा विश्वास



हॉकीपटूंना मार्गदर्शन करताना प्रशिक्षक क्रेग फुल्टन

◆ **नवी दिल्ली, १९ मार्च**

या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या विश्वचषकात प्रत्येक अवघड प्रतिस्पर्ध्यासाठी 'अनुरूप आणि तपशीलवार' योजनेचे भारतीय पुरुष हॉकी संघ सज्ज असेल असा विश्वास संघाचे प्रशिक्षक क्रेग फुल्टन यांनी व्यक्त केला. सध्या डगमगत असलेला संघ योग्य वेळी सर्वोत्तम कामगिरी करेल, असेही ते म्हणाले.

या हंगामात भारताला केवळ एकच विजय मिळविता आला आहे. होबार्ट येथे झालेल्या एफआयएच प्रो-लीग सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध पेनॉल्टी शूटआऊटमध्ये भारताने विजय मिळविला होता. १५ ऑगस्टपासून नेदरलॅण्ड व बेल्जियममध्ये सुरू होणाऱ्या विश्वचषकाच्या ड गटात भारताला अव्वल मानांकित इंग्लंड, पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तान आणि जिद्दी वेल्स संघाविरुद्ध खेळावे लागणार आहे.

गट फेरीतील सर्व सामने नेदरलॅण्डमधील ॲमस्टेलवीन येथील वॅगेनर हॉकी स्टेडियमवर खेळवले जातील.

आम्ही आमच्या रचनेवर, आमच्या दबावावर व फिनिशिंगवर कठोर परिश्रम घेणार आहोत. या स्तरावरील सामन्यांचा निकाल ठरवणारे सूक्ष्म फरक. या गटातील प्रत्येक प्रतिस्पर्ध्याची ताकद वेगळी आहे, त्यामुळे आमची तयारी गरजेनुसार आणि तपशीलवार असेल. पुढील काही महिने अगदी योग्य क्षणी सर्वोत्तम कामगिरी करण्यावर केंद्रित आहेत, असे फुल्टन यांनी म्हटले आहे.

हा एक मजबूत गट आहे, पण विश्वचषकात सर्वोत्तम संघांविरुद्ध कसोटीला लागण्यासाठी नेमके हेच हवे असते. शिबिरामधील वातावरण खूप सकारात्मक आहे. खेळाडू प्रेरित व जिद्दी आहेत, आणि आता आमचे प्रतिस्पर्धी माहित असल्याने तयारीसाठी खरी स्पष्टता व लक्ष केंद्रित करण्यास मदत झाली आहे, असेही ते म्हणाले.

इंग्लंड हा एक सुसंघटित व शारीरिकदृष्ट्या मजबूत संघ असून तो आमच्या गटातील अव्वल मानांकित संघ आहे. पाकिस्तानचा संघ आकर्षक शैली, अनपेक्षितपणा आणि हॉकीची समृद्ध परंपरा घेऊन येतो. या संघाला कधीही कमी लेखू नये.

या ड गटातील प्रत्येक प्रतिस्पर्ध्याचा आम्ही आदर करतो, परंतु त्या सर्वांविरुद्ध आम्ही आमच्या स्वतःच्या क्षमतेवर ठाम आहोत, असे फुल्टन यांनी ठामपणे सांगितले. १५ ऑगस्ट रोजी वेल्सविरुद्धच्या सामन्याने हा संघ आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. १७ ऑगस्ट रोजी भारत विरुद्ध इंग्लंड व १९ ऑगस्ट रोजी भारत विरुद्ध पाकिस्तान सामने खेळले जातील.

# सॅमसनची उणीव भरून काढणे अशक्य : पराग

◆ **जयपूर, १९ मार्च**

आपल्या संघात संजू सॅमसनची उणीव भरून काढणे अशक्य आहे. रोहित, विराटप्रमाणेच, संजूची जागा कोणीही घेऊ शकत नाही, असे राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग याने गुरुवारी सांगितले.

इंडियन प्रीमियर लीगच्या आधी जयपूर येथे गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेदरम्यान तो बोलत होता. यावेळी संघाचे मुख्य प्रशिक्षक कुमार संगकारा उपस्थित होते.

२०२१ ते २०२५ या काळात रॉयल्सचे नेतृत्व करणाऱ्या संजू सॅमसनला, हंगामापूर्वीच्या एका महत्त्वपूर्ण घडामोडीत चेन्नई सुपर किंग्सकडे (सीएसके) हस्तांतरित करण्यात आले. या व्यवहाराचाच एक भाग म्हणून रवींद्र जडेजा राजस्थान रॉयल्स संघात दाखल झाला आहे.

जर तुम्ही संजू सॅमसनबद्दल बोलायचे झाले, तर तो ज्या दर्जाचा खेळाडू आहे, त्याची जागा घेण्याचा विचारही आम्ही कधी करत नाही, असे पराग म्हणाला. कदाचित आपण त्याच्यासारखेच कौशल्य असलेल्या एखाद्या खेळाडूचा शोध घेऊ शकतो किंवा त्याच्या फलंदाजीच्या क्रमांकावर दुसऱ्या कोणाला तरी फलंदाजीला पाठवू शकतो.

हे अगदी विराट कोहली किंवा रोहित शर्माला पर्याय नसण्यासारखेच आहे. त्याचप्रमाणे, सॅमसनलाही कोणताही पर्याय नाही, कारण तो इतका उत्कृष्ट खेळाडू आहे, असे पराग म्हणाला.

दोन वेगवेगळ्या टप्प्यांत मिळून सलग ११ वर्षे या फ्रॅन्चायझीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संजूने, राजस्थान रॉयल्सचा (आरआर) सर्वात यशस्वी कर्णधार व सर्वाधिक धावा करणारा खेळाडू म्हणून आपली छाप पाडली होती. त्याने संघाला आयपीएल २०२२ च्या अंतिम फेरीत व २०२४ च्या प्ले-ऑफ्समध्ये पोहोचवण्यात मोलाची भूमिका बजावली होती.

टी-२० विश्वचषकातील सॅमसनच्या नेत्रदीपक कामगिरीनंतर त्याची प्रतिष्ठा व महत्त्व अनेक पटींनी वाढले आहे. या स्पर्धेत त्याने सलग तीन सामन्यांत निर्णायक अर्धशतके झळकावत भारताला ऐतिहासिक तिहेरी मुकुट मिळवून दिला, तसेच विजेतेपद राखण्यातही सिंहाचा वाटा उचलला.

अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव केला आणि या सामन्यात संजूला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. राजस्थान रॉयल्ससाठी गत हंगामातील कामगिरी अत्यंत निराशाजनक ठरली, त्यांना १० सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला व दहा संघांच्या गुणतालिकेत त्यांना नवव्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

संजू सॅमसन राजस्थान रॉयल्स संघातून बाहेर पडल्यानंतर या संघाचे कर्णधारपद रियान परागकडे सोपविण्यात आले आहे. गत वर्षी राजस्थान रॉयल्सने अनेक कांटे की टक्कर असलेले (अटीतटीचे) सामने अगदी थोड्या फरकाने गमावले, त्यामुळे २००८ च्या विजेत्या संघाला आता अधिक चांगली रणनीती आणि नियोजनाची गरज आहे, असे रियान पराग म्हणाला.




इंडियन प्रीमियर लीगच्या आधी जयपूर येथे गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेदरम्यान राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग (डावीकडे) व मुख्य प्रशिक्षक कुमार संगकारा

### छोटे-छोटे निर्णय घेतले तर हंगाम वेगळा असेल

प्रत्येक २० सामन्यात असे ३-४ निर्णय घ्यावे लागतात, जे सामन्याची दिशाच बदलून टाकतात. जर आपण ते छोटे-छोटे निर्णय योग्य रणनीती आणि नियोजनासह घेतले, तर हा हंगाम नक्कीच वेगळा ठरेल, असे परागने म्हणाला. अनेक हंगामांत संघर्ष करावा लागूनही, आपल्यावर विश्वास कायम ठेवल्याबद्दल त्याने फ्रॅन्चायझीचे आभारही मानले. जेव्हा मी अवघ्या १७ वर्षांचा होतो, तेव्हापासून मी या संघात आहे. मी या संघातील चढ-उतार सर्व काही अनुभवले आहे. अर्थात, आतापर्यंतच्या प्रवासात सुखाच्या क्षणांपेक्षा कठीण प्रसंगांचाच अनुभव मला अधिक आला आहे, असे पराग म्हणाला.

### आघाडीच्या संघांविरुद्ध खेळण्यास सज्ज : शुभांगी

**नवी दिल्ली :** थायलंडमध्ये होणाऱ्या एएफसी २० महिला आशियाई चषकासाठी सज्ज होत असताना, भारतीय २० महिला संघाची कर्णधार शुभांगी सिंग हिने आपल्या संघाच्या तयारीबद्दल पूर्ण आत्मविश्वास व्यक्त केला आहे. या खंडीय स्पर्धेत आघाडीच्या प्रतिस्पर्ध्यांचा सामना करण्यास आपला संघ सज्ज असल्याचे तिने म्हटले आहे. दोन दशकांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर भारत या स्पर्धेत पुनरागमन करत आहे. २ एप्रिल रोजी जपानविरुद्धच्या सामन्याने भारतीय संघ आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. भारताचा समावेश क गटामध्ये करण्यात आला असून, या गटात त्यांच्यासोबत जपान, ऑस्ट्रेलिया आणि चायनीज तैपेई हे संघ आहेत. शुभांगी म्हणाली की, संघाने अत्यंत आत्मविश्वास आणि स्पष्ट ध्येय समोर ठेवून त्या फेरीचा सामना केला होता. पात्रता मिळवायचीच, या ठाम मानसिकतेने आम्ही तिथे गेलो होतो आणि आम्ही ती मिळवलीही,'' ती म्हणाली. जेव्हा तुम्हाला एखादी गोष्ट नक्की घडणार आहे यावर आधीच विश्वास असतो, तेव्हा ती गोष्ट प्रत्यक्षात आल्यावर त्याचे काही नवल वाटत नाही, असे ती म्हणाली. सध्या कोलकाता येथे सराव करत असलेला हा संघ २० मार्च रोजी बँकॉकसाठी रवाना होईल.

# राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा पुढील वर्षी २९ ऑक्टोबरपासून

◆ **नवी दिल्ली, १९ मार्च**

राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेची आठवी आवृत्ती पुढील वर्षी २९ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर या कालावधीत माल्टा आणि गोझो येथे आयोजित केली जाणार आहे.

या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ २९ ऑक्टोबर रोजी पार पडेल. त्यानंतर ३० ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर या काळात खेळांचा सहा दिवसांचा अत्यंत रोमांचक कार्यक्रम रंगेल. या स्पर्धेत जलतरण आणि पॅरा जलतरण, ॲथ्लेटिक्स आणि पॅरा ॲथ्लेटिक्स, नेटबॉल, नौकानयन, स्क्वॅश, ट्रायथलॉन, वॉटर पोलो आणि भारोत्तोलन अशा आठ खेळांचा समावेश असेल.

माल्टा राष्ट्रकुल युवा क्रीडा २०२७ ही स्पर्धा एक अत्यंत उत्साहवर्धक आणि स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्याचे आश्वासन देते. याद्वारे माल्टीज खेळांचे माहेरघर जगासमोर सादर केले जाईल. जागतिक दर्जाच्या सुविधा आपल्या तरुण खेळाडूंना खरोखरच एक परिवर्तनकारी अनुभव देतील, ज्यामुळे उद्याचे तारे घडवण्यासाठी आणि त्यांना प्रेरणा देण्यासाठी मदत होईल, असे राष्ट्रकुल क्रीडा महासंघाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी केटी सॅडलियर यांनी गुरुवारी म्हटले आहे.




### नौकानयन, वॉटरपोलोचा प्रथमच समावेश

तसेच, या स्पर्धेद्वारे राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात नौकानयन आणि वॉटर पोलो या खेळांचेही प्रथमच पदार्पण होईल. राष्ट्रकुलच्या ७४ राष्ट्रे व प्रदेशांमधून येणाऱ्या, १४ ते १८ वयोगटातील सुमारे १,२०० खेळाडूंचे यजमानपद भूषवण्याची माल्टाला अपेक्षा आहे. या स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या ठिकाणांमध्ये कॉटनरा इनडोअर पूल, ताल-क्रोक्क नॅशनल पूल, मार्सा ॲथ्लेटिक्स स्टेडियम, मार्सा स्पोर्ट्स सेंटर, मेलीहा बे, गोझो इनडोअर स्पोर्ट्स पॅव्हेलियन आणि मार्सालफोर्न बे यांचा समावेश आहे.

या स्पर्धेच्या इतिहासातील हा सर्वात मोठा पॅरा स्पोर्ट (दिव्यांग खेळांचा) कार्यक्रम ठरेल. २०२३ मध्ये त्रिनिदाद आणि टोबॅगो येथे झालेल्या राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेत पॅरा ॲथ्लेटिक्सचा जो ऐतिहासिक समावेश करण्यात आला होता, त्याच यशाची ही पुढील पायरी असेल.

### भारताला २०२८ विश्व इनडोअर ॲथ्लेटिक्स स्पर्धेचे यजमानपद

◆ **नवी दिल्ली, १९ मार्च**

पोलंडमधील तोरुन येथे झालेल्या परिषदेच्या बैठकीत आंतरराष्ट्रीय संस्थेने गुरुवारी या स्पर्धेच्या यजमानपदाचे हक्क भारताला प्रदान केले. त्यामुळे, भारत भुवनेश्वरमध्ये प्रतिष्ठित जागतिक इनडोअर ॲथ्लेटिक्स स्पर्धेचे आयोजन करणार आहे.

पोलंडमधील या शहरात २०२५ च्या जागतिक इनडोअर ॲथ्लेटिक्स स्पर्धा सुरू होण्याच्या एक दिवस आधी जागतिक ॲथ्लेटिक्स परिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

२०२८ सालच्या जागतिक इनडोअर ॲथ्लेटिक्स स्पर्धेचे यजमानपद भारताला देण्यात आले आहे, असे जागतिक ॲथ्लेटिक्सचे उपाध्यक्ष आदिल सुमारीवाला यांनी पोलंडमधून सांगितले.

### अल्प विश्रांतीचा आयपीएलमध्ये फायदा होईल : जोस बटलर

◆ **लंडन, १९ मार्च**

टी-२० विश्वचषकातील निराशाजनक कामगिरीनंतर क्रिकेटपासून काही काळ दूर राहिल्याचा मला नक्कीच फायदा होईल, अशी आशा जोस बटलरने व्यक्त केली.

इंग्लंडच्या फलंदाजीचा मुख्य आधार असलेल्या जोस बटलर या महिन्याच्या अखेरीस सुरू होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये (आयपीएल) गुजरात टायटन्स संघासोबत एका नवीन सुरुवातीच्या शोधात आहे.



भारत व श्रीलंकेत झालेल्या टी-२० विश्वचषकादरम्यान बटलरच्या बॅटमधून धावा निघणे थांबले होते. मर्यादित षटकांच्या क्रिकेटमधील इंग्लंडच्या सर्वात प्रमुख फलंदाजांपैकी एक असलेल्या बटलरसाठी तो एक अत्यंत कठीण काळ होता. असे असूनही, इंग्लंडचा माजी कर्णधार असलेल्या बटलरला संघाचा सतत पाठिंबा मिळत राहिला.

विश्वचषकात इंग्लंडसाठी सलामीला फलंदाजी करताना, बटलरला आठ सामन्यांमध्ये केवळ ८७ धावा करता आल्या. त्याची सरासरी १०.८७ इतकी होती आणि ११९ चा स्ट्राइक रेट तर पूर्णपणे विसरण्याजोगा होता. मुंबईत झालेल्या, धावांचा पाऊस पडलेल्या उपांत्य फेरीत भारताकडून पराभव पत्करावा लागल्यानंतर इंग्लंडचा संघ या स्पर्धेतून बाहेर पडला.

५ मार्च रोजी झालेल्या त्या उपांत्य फेरीच्या सामन्यानंतर त्याने क्रिकेटपासून घेतलेल्या विश्रांतीचा त्याला २८ मार्चपासून सुरू होणाऱ्या आयपीएल स्पर्धेसाठी नक्कीच फायदा होईल, अशी आशा ३५ वर्षीय बटलरला आहे. मी क्रिकेटपासून यापेक्षा जास्त दूर राहूच शकलो नसतो व त्या वेळी माझ्यासाठी तीच गोष्ट अगदी योग्य होती. मला नेमक्या याच गोष्टीची गरज होती, असे बटलरने सांगितले.

# भारताच्या १७ वर्षांखालील संघासाठी जोयाची संस्मरणीय कामगिरी

◆ **नवी दिल्ली, १९ मार्च**

गत १४ मार्च रोजी यांगून येथे म्यानमारविरुद्धच्या सामन्यात, अगदी शेवटच्या क्षणी १४ वर्षीय जोयाच्या व्हॉलीने गोलजाळीचा वेध घेतला आणि भारताचा ३-२ असा दमदार पुनरागमनाचा विजय निश्चित केला. हा क्षण जोयाच्या कायम स्मरणात राहणारा आहे. भारतीय १७ वर्षांखालील महिला राष्ट्रीय संघासाठी केवळ दुसऱ्याच आंतरराष्ट्रीय सामन्यात राखीव खेळाडूंच्या बाकावरून मैदानात उतरलेल्या या युवा स्ट्रायकरने निर्णायक गोल केला. हा गोल करताच, ज्या व्यक्तीने तिला सर्वाधिक पाठिंबा दिला होता, त्या तिच्या आईला तिने तत्काळ फोन करून आपल्या यशाचा आनंद साजरा केला.

जोयासाठी, या क्षणापर्यंतचा प्रवास तिच्या गावातील अरुंद गल्ल्यांमधून सुरू झाला होता. पंजाबमधील फागवाडा येथे लहानाची मोठी होत असताना, शेजारच्या मुलांनी फुटबॉल खेळताना पाहून तिने पहिल्यांदा हा खेळ हाती घेतला.



'सुरुवातीला माझ्या आईला थोडी काळजी वाटत होती. त्या काळात मुली फारशा फुटबॉल खेळत नसत. पण, या खेळाबद्दल मला किती वेड आहे हे समजल्यावर, तिने मला खूप पाठिंबा दिला,'' असे जोयाने अखिल भारतीय फुटबॉल महासंघाच्या अधिकृत संकेतस्थळावर म्हटले आहे.

मला माझ्या प्रशिक्षक हरदीप सिंग यांचे आभार मानायचे आहेत, त्यांनी फागवाडा येथे फुटबॉलच्या दिशेने पहिले पाऊल टाकण्यास मला मदत केली आणि संदीप सिंग यांनी होशियारपूर येथील शहीद भगत सिंग अकादमीमध्ये मला प्रशिक्षण दिले. त्यांच्या सुरुवातीच्या मार्गदर्शनाशिवाय, मी इथपर्यंत पोहोचूच शकले नसते, असे ती म्हणाली.

स्पर्धात्मक फुटबॉलचा तिचा पहिला प्रत्यक्ष अनुभव तिला २०२४ मध्ये मिळाला, जेव्हा तिने १५ खेलो इंडिया महिला फुटबॉल लीगमध्ये सहभाग घेतला. त्या पातळीवर स्पर्धात्मक सामने खेळण्याचा तो माझा पहिलाच अनुभव होता, असे तिने आठवणीने सांगितले.

या स्पर्धेने या युवा फॉरवर्डसाठी एक नवीनच जग खुले केले. त्यानंतर लवकरच, जोयाच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे तिला या वर्षाच्या सुरुवातीलाच बंगळुरू येथील राष्ट्रीय शिबिरासाठी बोलावणे आले. मुख्य प्रशिक्षक पामेला कोंटी यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील काही सर्वोत्तम युवा खेळाडूंसोबत सराव करणे हा तिच्यासाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि परिवर्तन घडवणारा अनुभव ठरला.

'राष्ट्रीय शिबिरात सहभागी होण्याची ही माझी पहिलीच वेळ होती आणि तेथील सरावाचा दर्जा अत्यंत उच्च पातळीचा होता. विश्वचषकांमध्ये खेळाडू व प्रशिक्षक अशा दोन्ही भूमिका वठविणाऱ्या कोंटी यांच्या अनुभवी प्रशिक्षकाखाली खेळणे तसेच देशभरातील विविध भागांतून आलेल्या खेळाडूंसोबत ड्रेसिंग रूम सामायिक करणे यामुळे मला आंतरराष्ट्रीय फुटबॉलचे कामकाज कसे चालते आणि खेळाडू तयारी कशी करतात, याविषयी खूप काही शिकायला मिळाले, असे तिने सांगितले.

त्या तयारीचे फळ तिला यांगून येथे मिळाले. सामन्याच्या उत्तरार्धात जेव्हा तिला पर्यायी खेळाडू म्हणून मैदानात पाठवण्यात आले, तेव्हा जोयाने प्रशिक्षण वर्गाने दिलेल्या सूचनांवर पूर्ण लक्ष केंद्रित केले व त्या संधीचे सोने केले. सामन्याचा निकाल आपल्या बाजूने लावणारा विजयी गोल केल्यामुळे, तो प्रसंग तिच्यासाठी आणखीच अविस्मरणीय ठरला.

### फिनिशर म्हणून आशुतोष शर्माचा सरावावर भर

**नवी दिल्ली :** आशुतोष शर्माला आपल्या खेळाच्या कारकिर्दीत कोणताही मोठा बदल (संक्रमण) झाल्याचे वाटत नाही; परंतु, एक उजव्या हाताचा फलंदाज म्हणून त्याला ठाम विश्वास आहे की, २०२६ मध्ये दिल्ली कॅपिटल्ससाठी फिनिशरची भूमिका बजावताना जेव्हा त्याच्यावर प्रचंड दडपण असेल, तेव्हा मानसिक प्रतिमा उभारणे व सततचा सराव त्याला अधिक यश मिळवून देईल. मी क्रिकेट खेळण्याचा आनंद घेत आहे आणि (दिल्ली कॅपिटल्स) सोबत खेळण्याचाही मनमुराद आनंद लुटत आहे. खेळताना मला खूप मजा येत आहे. फरक केवळ इतकाच आहे की, पहिल्या वर्षी मी या वातावरणात नवीन होतो. दुसऱ्या वर्षी, संघाच्या आणि इतर सर्वांच्या अपेक्षा वाढतात. त्यामुळे, थोडें दडपण नक्कीच असते, पण त्या दडपणाखाली खेळण्याचाही मी आनंद घेत आहे, असे मध्य प्रदेशातील रतलामचा रहिवासी असलेल्या आशुतोषने, २९ मार्चपासून सुरू होणाऱ्या २०२६ स्पर्धेपूर्वी सोबतच्या एका विशेष संभाषणात सांगितले. २०२४ मध्ये पंजाब किंग्ससाठी काही धडाकेबाज आणि छोटेखानी खेळी साकारत आशुतोषने आयपीएलच्या मंचावर जोरदार पदार्पण केले होते.

## थोडक्यात महत्त्वाचे.....



### पारोळ्यात शिवशंभू प्रतिष्ठानने शिवतीर्थावर उभारली गुढी

**पारोळा :** येथील छत्रपती शिवशंभु प्रतिष्ठानच्यावतीने हिंदू नववर्ष आणि गुढीपाडव्याचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शहराचे मुख्य आकर्षण असलेल्या शिवतीर्थवर पारंपरिक पद्धतीने स्वराज्याची गुढी उभारून नूतन वर्षाचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या स्मारकाला माल्यार्पण करून करण्यात आली. त्यानंतर शिवतीर्थ येथे पूजन करून गुढी उभारण्यात आली तसेच जय भवानी, जय शिवाजीचा जयघोष करत हिंदू नववर्षाचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी दामिनी मराठे, प्रविण मोरे, मोतीलाल सोनवणे, निलेश मराठे, कल्पेश मराठे, राज चौधरी, देवेंद्र पाटील, मिलिंद चौधरी यांच्यासह प्रतिष्ठानचे सर्व सदस्य व नागरिक उपस्थित होते.

### हॉटेलसमोरून दुचाकी लंपास

**जळगाव :** पार्किंग केलेली सुमारे २५ हजार रुपये किमतीची एचएफ डिलक्स दुचाकी (एमएच १९ सीपी ६४२६) दुचाकी चोरट्याने चोरुन नेली. शुक्रवारी (१३ मार्च) सायंकाळी साडेसहा ते साडे सात वाजेच्या सुमारास ही घटना नशिराबाद येथे हॉटेल सागर समोर घडली.शोध घेतला असता दुचाकीचा तपास लागला नाही. याप्रकरणी मिलींद सुरेश बऱ्हाटे (वय २४,रा. बेडी,ता.जळगाव) यांच्या तक्रारीनुसार नशिराबाद पोलीस ठाण्यात बुधवारी (१८ मार्च) गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार कमलाकर बागुल हे तपास करीत आहेत.

### बेपत्ता पाच जण मिळाले

**जळगाव :** शहरातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झालेले पाच जण मिसिंग तपासात पोलिसांना बुधवारी (१८ मार्च) मिळुन आले. ८० वर्षीय वयोवृध्द महिला १३ मार्च २०२६ रोजी, ३५ वर्षीय महिला २२ ऑक्टोंबर २०१९ रोजी, २२ वर्षीय तरुणी ३० सप्टेंबर २०२४ रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झाली होती. हे तिघे बुधवारी मिळुन आले. २० वर्षीय तरुणी ४ फेब्रुवारी २०२६ रोजी तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतून तसेच ४७ वर्षीय गृहस्थ ९ मार्च २६ रोजी रामानंदनगर पोलीस ठाण्यातून बेपत्ता झाले होते. हे दोघे जण मिसिंग तपासात मिळुन आले आहेत.



## दुर्धर आजार रोखण्यासाठी 'भूमी सुपोषण अभियान' अत्यंत महत्त्वाचे!

### शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमात डॉ.निलेश चांडक यांचे प्रतिपादन

**जळगाव, १९ मार्च**

रासायनिक खते व कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे भविष्यात मानवी आरोग्यासमोर गंभीर प्रश्न उभा राहू शकतो. अशा परिस्थितीत मातीचे आरोग्य सुधारून अन्नाची गुणवत्ता वाढविणे अत्यंत गरजेचे असून दुर्धर आजार रोखण्यासाठी 'भूमी सुपोषण अभियान' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे, असे प्रतिपादन डॉ.निलेश चांडक यांनी केले.

'भूमी सुपोषण अभियाना'निमित्त रावेर येथे शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी तालुका कृषी अधिकारी वाळके, मंडळ कृषी अधिकारी केचे, कृषी अधिकारी महाजन, मंडळ कृषी अधिकारी गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी काळे, सुरेश धनके, संदिप सावळे, अरविंद देशमुख, अश्विन शैदाने आदी उपस्थित होते.

डॉ. चांडक यांनी, मातीतील सेंद्रिय घटक कमी होत असल्याने उत्पादनाची गुणवत्ता घसरत आहे. यामुळे अन्नातील पोषकतत्त्वे कमी होऊन विविध आजारांचा धोका वाढत आहे. त्यामुळे सेंद्रिय शेती, संतुलित खत व्यवस्थापन आणि माती परीक्षण यावर भर देणे काळाची गरज असल्याचे सांगितले. रासायनिक खते व कीटकनाशकांच्या वाढत्या वापरामुळे कॅन्सर रुग्णांची संख्या वाढत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे तरुण वयातही कॅन्सरचे प्रमाण वाढत असून ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. भविष्यातील पिढी सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येकाने 'भूमी सुपोषण अभियान'मध्ये सक्रिय सहभाग घ्यावा व सेंद्रिय व शाश्वत शेतीकडे वळावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## माध्यमांच्या अभिव्यक्तीत विवेक, शैली, वैचारिक बांधिलकी हवी

(पान १ वरून)

यानिमित्ताने सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांची प्रकट मुलाखत दै. तरुण भारतचे मुख्य संपादक शैलेश पांडे व राजाराम वाचनालयाचे सचिव रवींद्र देशपांडे यांनी घेतली.

मुलाखतीदरम्यान सरसंघचालक म्हणाले की, संघाचे काम वाढले आहे. त्यामुळे त्याची रचना विकेंद्रित होणे आवश्यक आहे. संघाचे व्यक्तिनिर्माणाचे काम मोठे झाले आहे. संघाकडून समाजाच्या अपेक्षा वाढल्याने स्वयंसेवकांना कामाची व्याप्ती वाढवावी लागणार आहे. केंद्रीय स्तरावरून चालणारे काम आता छोटी केंद्रे बनवून सांभाळावे लागणार आहे. म्हणूनच संघाच्या रचनेत काही बदल केले जात आहेत. अशा प्रकारची विकेंद्रित रचना आज काळाची गरज आहे. संघाची कार्यपद्धती मात्र तीच राहणार आहे. त्यात कुठलाही बदल होणार नाही. कार्यपद्धतीमध्ये बदल करण्याचा विचार दर दहा-पंधरा वर्षांनी होत असतो. मात्र, दुसरी कार्यपद्धती संघाला अद्याप सापडलेली नाही. मैत्री करायची आणि आपल्या उदाहरणातून परिवर्तन घडवायचे हीच संघाची कार्यपद्धती पुढेही राहणार आहे. संघाची रचना हे एक रूप आहे. ते काळानुसार बदलत राहणार. तसे ते बदलणार आहे.

कुठलीही संस्था मोठी झाली की असे परिवर्तन होणे आवश्यक असते. शासन-प्रशासनाशीही संघाचा संबंध येतो. त्यामुळे त्यासाठी वेगळी व्यवस्था ठेवणे आवश्यक आहे. सगळे एकाच कामात उतरले तर अडचणी निर्माण होतात. त्यामुळे प्रदेश नावाची एक रचना राहणार असून, ती त्यांच्या स्तरावर प्रदेशाशी संपर्क ठेवेल. दर महिन्याला किंवा दोन-तीन महिन्यांतून एकदा प्रत्येक स्तरावरील कार्यकारिणीने आपल्या कुटुंबासोबत एकत्र राहायला हवे. संपर्क वाढवायला हवा, यावरही काम केले जाणार आहे, अशी माहिती सरसंघचालकांनी दिली.

स्वयंसेवकांना अनुकूलतेची बाधा होऊ नये, यासाठी आम्ही आवश्यक ते लसीकरण करीत आहोत. ही परीक्षा उत्तीर्ण होऊनच आम्हाला पुढे जावे लागणार आहे, असे सांगून सरसंघचालक म्हणाले की, मनुष्य निर्माण व समाज परिवर्तन या दोन्ही प्रक्रिया सोबतच होणे गरजेचे आहे. विशिष्ट बळ प्राप्त झाल्यानंतर समाजाचे प्रबोधन करणे आवश्यक असते. याच भूमिकेतून शताब्दी वर्षानिमित्त मांडलेली पंचपरिवर्तन संकल्पना आज सर्वत्र स्वीकारली जात आहे.

कार्यकर्त्यांमधील आपसातील जिव्हाळा हा संघाचा मुख्य आधार आहे. समाजाप्रति असलेली आत्मीयता संघाच्या वाढीसाठी मदत करते. जोपर्यंत दोन व्यक्तींचे भेटणे बंद होणार नाही, तोपर्यंत संघ बंद होऊ शकत नाही. संघाचे काम संपर्कातूनच सुरू असते. अनेकदा बंदी आली, आघात झाले, पण कार्यकर्त्यांनी ते छातीवर झेलले आणि संघ अधिक जोमाने वाढला, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

## विळ्याने वार करत पत्नीचा खून; मारेकरी पती पोलीस ठाण्यात हजर

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,१९ मार्च**

दाम्पत्यातील कौटुंबिक कलह जिवघेणा ठरला.पतीने धारदार लोखंडी विळ्याने वार करत पत्नीचा निर्घुण खून केला.दिपाली नितीन सोनवणे (वय २८,रा. निमखेडी) असे मृत महिलेचे नाव आहे. गुरुवारी (१९ मार्च) ही खळबजन निमखेडी येथे घडली. तालुका पोलिसांनी बेशुध्दावस्थेत सायंकाळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात नेले असता तपासणीअंती डॉक्टरांनी मृत घोषीत केले. घटनेला स्वरुप दिल्यानंतर संशयित आरोपी पती नितीन सोनवणे तालुका पोलीस ठाण्यात स्वत: हजर झाला.



नितीन सोनवणे हे त्यांची पत्नी दिपाली तसेच एक मुलगा, एक मुलगी यांच्यासह निमखेडी येथे वास्तव्य करत होते. हातमजुरी करुन कुटुंबांचा निर्वाह ते करत होते. प्राप्त माहितीनुसार गेल्या काही दिवसापासुन या दाम्पत्यात कौटुंबिक वाद होता. दुपारी हा वाद उफाळून आला. त्यानंतर पतीने लोखंडी विळ्याने पत्नीच्या मानेवर, पोटावर सपासप वार करत पत्नीचा खून केला.

पत्नीची हत्या केल्यानंतर पती नितीन सोनवणे तालुका पोलीस ठाण्यात हजर स्वत: झाले. प्रकार कळताच पोलीस अधिकाऱ्यांसह पोलिसांनी निमखेडी गावाकडे मार्गस्थ झाले. रक्ताच्या थारोळ्यात महिला घरात पडलेली होती. घराच्या परिसरात ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. बेशुध्दावस्थेतील विवाहितेला तत्काळ रुग्णवाहिकेतून रुग्णालयात पोलिसांनी हलविले असता तपासणीअंती डॉक्टरांनी मृत घोषित केले. ही वार्ता कळताच नातेवाईकांसह आप्तेजणांनी रुग्णालयात धाव घेतली. कुटुंबियांना शोक अनावर होऊन रडू कोसळले. घटनेने रुग्णालयात सन्नाटा पसरला. या घटनेने निमखेडीसह शहरात हळहळ व्यक्त करण्यात आली.

तालुका पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे कामकाज पोलीस ठाण्यात सुरू होते.

## दूध उत्पादक सोसायट्यांचे शासनाने कर्ज माफ करावे

### अरुण पाटील यांची निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**यावल, १९ मार्च**

तालुक्यातील नायगाव येथील श्रीराम दुध उत्पादक सहकारी सोसायटी कर्जाअभावी बंद पडलेली



असून अशा बंद पडलेल्या दुध उत्पादक सोसायटींना कर्ज माफ करावे, अशी मागणी अरुण पाटील-नायगांवकर यांनी केली आहे.

नायगाव (ता.यावल) येथील श्रीराम दुध उत्पादक सोसायटीने शेतीपुरक जोडधंदा म्हणून जिल्हा दुध संघांच्या हमीवर बँक ऑफ बडोदाकडून २० दुध उत्पादक शेतकऱ्यांना प्रत्येकी ३० हजार रुपये या प्रमाणे ६ लाख रुपये कर्ज वाटप केले होते. त्यापैकी संस्थेने ३ लाख रुपयांची कर्जफेड २०१७ पर्यंत केलेली आहे.

उर्वरीत कर्ज बाकी राहिल्यामुळे सस्थेवर बंद होण्याची वेळ आली. म्हणून आता शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीमध्ये नायगाव श्रीराम दुध उत्पादक थकीत शेतकऱ्यांचाही समावेश करून त्यांची कर्जमाफी करावी व बंद झालेली संस्था पुर्ववत सुरु करण्यास सहकार्य करावे, अशी मागणी अरुण पाटील यांनी मुख्यमंत्री देवेद्र फडणवीस, दुग्ध विकासमंत्री अतुल सावे, जळगाव जिल्हा दुध उत्पादक संघाचे चेअरमन आ.मंगेश चव्हाण, जिल्हाधिकारी, दुग्धविकास अधिकारी आणि बँक ऑफ बडोदाचे व्यवस्थापक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



## गरुड महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना मिळणार ऑन जॉब ट्रेनिंग

### पुण्याच्या इलेक्ट्रोसॉफ्ट कंपनीशी केला सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा**
**शेंदुर्णी (ता. जामनेर), १९ मार्च**

येथील अप्पासाहेब र.भा. गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या गुणवत्ता विकास कक्षाच्यावतीने 'इलेक्ट्रोसॉफ्ट सिस्टम' या कंपनीशी सामंजस्य करार करण्यात आला. या कराराच्या माध्यमातून नवीन शैक्षणिक धोरणातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या ऑन जॉब ट्रेनिंग तसेच मोलाचे संशोधन व प्रशिक्षण कार्य केले जाणार आहे.

याप्रसंगी इलेक्ट्रोसॉफ्टचे संचालक निलेश वाघ, सहसंचालक राजेश ठाकरे आदी उपस्थित होते. त्यांनी या सामंजस्य करारात विविध विद्यार्थी केंद्रित उपक्रम कसे राबविता येतील, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात याचे महत्त्व यावर माहिती दिली.

यावेळी प्राचार्य डॉ.संजय भोळे, समन्वयक प्रा.डॉ. दिनेश पाटील, प्रा.नीलेश बारी, प्रा.डॉ. आर.डी. गवारे, प्रा.डॉ. सुजाता पाटील आदी उपस्थित होते.

## पोलिसांनी पकडले वाळूची चोरटी वाहतुकीचे डंपर, ट्रॅक्टर

### पथकाच्या ताब्यातून भडगावातून ट्रॅक्टर पळविले

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ मार्च**

गिरणा नदीपात्रातून अवैधरीत्या वाळूचा उपसा करून तिची रात्री चोरटी वाहतूक केली जात असल्याचा प्रकार पोलिसांच्या कारवाईतून समोर आला आहे. शहरात आकाशवाणी स्वतंत्र चौक रस्त्यावर ट्रॅक्टर, कानळदा रस्त्यावर डंपरवर कारवाई केली. भडगाव वरखेड रस्त्यावर कारवाई केलेले ट्रक्टर वाळुसह पळवून नेले.

ट्रॅक्टर (एमएच १९ एएन ४४५८) वरील चालक गफुर बाबु तडवी (वय ३६,रा. कुसुंबा) हा ट्रॅक्टर (एमएच १९ एएन ४४५८) हे वाहन घेऊन मंगळवारी (१७ मार्च) रात्री दोन वाजेच्या सुमारास आकाशवाणी चौक बसस्टॅन्ड रोड स्वतंत्र चौकातून हे वाहन नेत असताना पोलिसांना मिळुन आला. तपासणीत सहा हजार किमतीची एक ब्रास वाळु, तीन लाख रुपये किमतीचे ट्रॅक्टर, एक लाख किमतीची ट्राली असा एकुण चार लाखाचा मुद्देमाल आढळून आला. कॉन्स्टेबल देविदास पाटील यांच्या तक्रारीनुसार चालकाविरोधात गौणखनिजाची अवैधरित्या वाहतुक प्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक गोपाल देशमुख हे तपास करीत आहेत.

**पकडलेले ट्रॅक्टर पळविले**

भडगाव तहसिलदार यांच्या पथकाने अवैध वाळु वाहतूकीचे ट्रक्टर पकडले होते. दंडात्मक कार्यवाहीसाठी हे वाहन नेत असताना गैरलोकांका जमवून पथकाच्या ताब्यातील ट्रक्टर संशयितानी वाळुसह पळवून नेले. बुधवारी (१८ मार्च) रात्री दीड वाजेच्या सुमारास हा प्रकार भडगाव वरखेड गावा दरम्यान रोडवर घडला.

**डंपरमधून अवैध वाळू वाहतूक**

नदीपात्रातून अवैधरित्या वाळु उत्खनन केलेल्या दोन ब्रास वाळुची डंपरमधुन चोरटी वाहतूक केली जात होती. पोलिसांच्या तपासणीत अत्तरदे पेट्रोलपंपाजवळ हा मामला उघडकीस आला. (एमएच १५ एजी ६०५१) असा वाळु वाहतुकीच्या डंपरचा क्रमांक आहे. चालकाकडे वाळु वाहतुकीचा कोणताही शासकीय परवाना नव्हता.

मंगळवारी (१७ मार्च) रात्री पावणेबारा वाजेच्या सुमारास ही कारवाई केली. याप्रकरणी एलसीबीचे कॉन्स्टेबल राहुल रगडे यांच्या तक्रारीनुसार तालुका पोलीस ठाण्यात डंपर चालक सागर सुधाकर भिल (वय २०,रा. साकेगाव) याच्या विरोधात गौण खनिजे विकास व विनीमय अधिनियम कलम २१ व जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७)(८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस नाईक विजय निकम हे तपास करीत आहेत.

मंडळ अधिकारी दिनेश येंडे यांच्या तक्रारीनुसार याप्रकरणी सरकारी कामात अडथळा आणला तसेच महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम सह गौण खनिज अधिनियम ४८(७),४८(८) प्रमाणे संजय त्रिभुवन, योगेश गंजे, तेजस पाटील, हेमंत शिंदे यांच्या विरोधात भडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक सुशील सोनवणे हे तपास करीत आहेत.

## अवैध वाळू वाहतूक प्रकरणी ४ ट्रॅक्टर जप्त, महसूल विभागाची कारवाई

### स्थानिक ग्रामस्थ, १६ तलाठयांसह महसूल सेवकांच्या पथकाची कामगीरी

**पाचोरा :** पाचोरा तालुक्यात तसेच जिल्हाभरात विविध नदी नाले पात्रातील ७ वाळू गटांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही वाळू गटांची ई ऑक्शन लिलाव प्रक्रिया झालेली नाही. असे असले तरी पाचोरा तहसीलदार कार्यालय क्षेत्रांतर्गत अवैध वाळू उपसा मोठया प्रमाणावर केला जात आहे. यासंदर्भात तालुक्यातील बांबरूड (महादेवाचे) परिसरातून अवैध वाळू वाहतूक करणारे ४ ट्रॅक्टर जप्त करीत महसूल अधिकाऱ्यांच्या पथकाने कारवाई केली.

बांबरूड महादेवाचे परिसरात विनापरवाना वाळू वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती महसूल विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे स्थानिक ग्रामस्थ, तलाठी, पोलीस पाटील, महसूल सेवक यांच्या पथकाने अवैध वाळू उपसा वाहतूक करणारे ९ ते १० ट्रॅक्टर अडवले. यावाहनांवर कारवाईसाठी तब्बल १६ तलाठी व पोलीस प्रशासन नदीपात्रात गेले असता सहा ते सात ट्रॅक्टर ठिबक नळयांसह शेतातील पिकांचे अतोनात नुकसान करीत भरधाव वेगाने पळवून नेले. दरम्यान त्यातील अवैध वाळू वाहतूक करणारे ४ ट्रॅक्टर पथकाच्या हाती लागले. दि.१८ मार्च २०२६ रोजी महसूल विभागाने अवैध वाळू उपसा आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध पथकाने सापळा रचून ही कारवाई केली. पकडलेले चारही ट्रॅक्टर जप्त करण्यात आले असून ते पाचोरा तहसील कार्यालय येथे जमा करण्यात आले आहेत.

जळगाव जिल्हाधिकारी यांनी अवैध वाळू उपसा व वाहतूक कारवाई संदर्भात सूचना व आदेश दिले असून प्रशासनाचे विशेष पथक तैनात करण्यात आले होते. पोलीस पथकात सचिन पाटील, तलाठी दिपक दवंगे, नकुल काळकर, अतुल पाटील, अमोल शिंदे, निखिल भोई, योगेश व्यास, अजमल शाह मकांदा, तात्याराव सपकाळ, सागर मोरे, उमेश पाटील यांच्यासह पोलीस पाटील, ग्राम महसूल सहाय्यक यांच्या पथकाने कारवाई केली.



## 'केशवस्मृती'च्या सेवा वस्ती विभागातर्फे शोभायात्रा

### जळगावमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ मार्च**

केशवस्मृती प्रतिष्ठान संचलित सेवा वस्ती विभागाच्या वतीने आयोजित नववर्ष स्वागत शोभायात्रेला गुढीपूजनाने उत्साहात प्रारंभ करण्यात आला.

प्रमुख अतिथी म्हणून महापौर दीपमाला काळे, नगरसेविका डॉ. अमृता सोनवणे, माजी नगरसेविका पार्वताबाई गीत, केशवस्मृती प्रतिष्ठानचे सचिव दिलीप चोपडा, जिजामाता विद्यालयाचे चेअरमन बापू महाले, माजी महापौर सीमा भोळे, राष्ट्रसेविका समितीच्या कांचन साने तसेच प्रकल्प प्रमुख मनीषा खडके उपस्थित होते. शोभायात्रेत जिजामाता विद्यालयाच्या लेझीम पथकाने आकर्षक सादरीकरण केले, तर राष्ट्रसेविका समितीच्या सेविकांनी लाठी-काठीचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले. महिलांचे ढोल पथक प्रमुख आकर्षण ठरले. याशिवाय छत्रपती शिवाजी महाराज, अहिल्याबाई होळकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. वंदे मातरम गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सादर करण्यात आलेला क्रांतिकारकांचा सजीव देखावा विशेष ठरला. नागरिकांनी स्वागतासाठी रांगोळ्या काढून यात्रेचे स्वागत केले. वाघनगर येथून सुरू झालेली शोभायात्रा हरिविठ्ठलनगर येथे उत्साहात झाली.

## खरात प्रकरणाचा तपास सोपविला 'एसआयटी'कडे

**नाशिक :** सामाजिक व राजकीय



क्षेत्रासह संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या स्वयंघोषित अंकशास्त्रज्ञ कॅप्टन अशोक खरातच्या कृष्णकृत्यांचा छडा लावण्यासाठी राज्य सरकारने आता कंबर कसली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली आहे.

या पथकाच्या प्रमुखपदी महिला आयपीएस अधिकारी तेजस्विनी सातपुते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निर्णयामुळे आता खरातच्या राजकीय आणि धार्मिक संबंधांसह शोषणाच्या रॅकेटचे धागेदोरे उघड होण्याची शक्यता आहे. राज्य गृह विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार, अशोक खरात याच्याविरुद्ध नाशिक शहर, नाशिक ग्रामीण आणि अहिल्यानगर (शिर्डी) येथे नोंदवलेल्या तीन स्वतंत्र गुन्ह्यांचा तपास आता एसआयटीमार्फत एकत्रितपणे केला जाईल.

महाराष्ट्र पोलिस मुख्यालयाने या प्रकरणातील सर्व केस डायरी, पुरावे आणि जप्त केलेले साहित्य तातडीने या विशेष पथकाकडे सोपवण्याचे आदेश दिले आहेत.

## शताब्दी वर्षात संघाचे समाजजोडणीचे लक्ष्य; गृह संपर्क अभियानात १२ लाख घरांपर्यंत थेट संपर्क

### सर्व समाजाने मिळून राष्ट्रहितासाठी काम करणे आवश्यक : अनिल भालेराव

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची तीन दिवसीय अखिल भारतीय प्रतिनिधी सभेची बैठक हरियाणातील समालखा येथे झाली. संघटनात्मक कार्याचा विस्तार, राष्ट्रहितासाठी समाजातील सज्जन शक्तीची अधिक सक्रियता आणि सामाजिक समरसतेचा संकल्प यांसह ही बैठक पार पडली. या पार्श्वभूमीवर देवगिरी प्रांताचे प्रांत संघचालक अनिलजी भालेराव यांनी पत्रकार परिषदेत विस्तृत माहिती दिली.

ते म्हणाले की, गेल्या वर्षभरात संघाच्या संघटनात्मक कार्यात उल्लेखनीय वाढ झाली आहे. देशभरात संघाच्या शाखांची संख्या सुमारे ६ हजारांनी वाढून आता ८८ हजारांहून अधिक झाली आहे, तर शाखा चालणाऱ्या स्थानांची संख्या ५५ हजारांपेक्षा अधिक झाली आहे. यासोबतच साप्ताहिक मिलन आणि संघ मंडळींची संख्याही वाढली आहे. कान्हदेश व मराठवाडा मिळून असलेल्या देवगिरी प्रांतामध्ये व्यापक गृह संपर्क अभियानात १२ लाख कुटुंबाशी थेट संपर्क झाल्याचे त्यांनी सांगितले. संघटनात्मक विस्ताराबरोबरच समाजात गुणवत्ता वृद्धीसाठी संघ सातत्याने कार्यरत आहे. 'पंच परिवर्तन' या उपक्रमाद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. 'भारतीयत्व' किंवा 'हिंदुत्व' हे केवळ विचार नसून ती एक जीवनशैली आहे आणि त्याद्वारे समाजात गुणवत्ता वाढली पाहिजे. या उद्देशाने समाजातील सज्जन शक्तीला एकत्र आणून राष्ट्रहितासाठी कार्य करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

समाजातील महापुरुषांचे कार्य जात-पंथाच्या भेदांपलीकडे असून त्यांच्या विचारांतून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रेरणा घ्यायला हवी. आगामी वर्षात संत शिरोमणी श्री गुरु रविदास महाराज यांच्या ६५० व्या प्राकट्य वर्षानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याची योजना आहे. याच भावनेतून संघ स्वयंसेवकांनी नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर जी यांच्या बलिदानाच्या ३५० व्या वर्षानिमित्त देशभरात २ हजारांहून अधिक कार्यक्रम आयोजित केले होते, ज्यामध्ये ७ लाखांहून अधिक लोकांनी सहभाग घेतल्याचे त्यांनी सांगीतले.

**देवगिरी प्रांतात गृह संपर्क अभियानातून १२ लाख घरापर्यंत झाला संपर्क**



देवगिरी प्रांतातील संघकार्याबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, प्रांतात सध्या ५१७ दैनिक शाखा, ५९८ साप्ताहिक मिलन आणि ८६ संघ मंडळी सुरू आहेत. वर्षभरात ४५ प्रारंभिक वर्ग आयोजित करण्यात आले असून त्यामध्ये ३८०८ उपस्थिती होती. तसेच ८ प्राथमिक वर्गांमध्ये ४४६ उपस्थिती होती. याशिवाय २ संघ शिक्षा वर्गांमध्ये १५५ स्वयंसेवक सहभागी झाले. सेवा, शिक्षण, रोजगार, संस्कार आणि महिला सक्षमीकरण अशा विविध विषयांवर कार्य करणाऱ्या ४४ उपक्रमशील शाखा प्रांतात कार्यरत आहेत.

गृह संपर्क अभियानाच्या पहिल्या टप्प्यात २१ दिवसांमध्ये १२,००,९१९ कुटुंबांपर्यंत आणि ६६४८ गावांपर्यंत संघ पोहोचला आहे. याशिवाय देवगिरी प्रांतातील महाविद्यालयीन वस्तीगृहांमध्ये व खोल्यांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांशीही मोठ्या प्रमाणावर संपर्क साधण्यात आला असून ही प्रक्रिया अद्याप सुरू आहे. आगामी काळात गृह संपर्क अभियानाचा दुसरा टप्पाही राबविण्यात येणार आहे.

संपूर्ण देवगिरी प्रांतातील प्रत्येक तालुक्यात 'सामाजिक सद्भाव' या विषयावर एप्रिल महिन्यापासून बैठका आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात प्रमुख नागरिक संगोष्टी आयोजित केल्या जाणार आहेत. या बैठकींमध्ये समाजातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या प्रमुख व्यक्ती सहभागी होणार आहेत. तसेच संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने समाजाकडून मोठ्या प्रमाणात 'हिंदू संमेलन' कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

**जनजाती समाजाच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण**

देवगिरी प्रांताची सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन जनजाती आणि भटके-विमुक्त समाजातील चाली-रीती, परंपरा तसेच समाजात निर्माण होणारा वैचारिक संभ्रम लक्षात घेऊन विविध स्तरांवर 'चेतना परिषद' आयोजित करण्यात आल्या. या परिषदांमध्ये डॉक्टर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, महिला तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी झाले.

नोव्हेंबर २०२५ मध्ये देवगिरी प्रांतातील नांदेड, परभणी, छत्रपती संभाजीनगर, शिरपूर, चोपडा आणि तळोदा येथे जनजाती व भटके-विमुक्त समाजाच्या चेतना परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदांमध्ये किनवट, नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, भुसावळ, अमळनेर, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यांतील ११ समाजांमधील एकूण १६९३ प्रतिनिधी सहभागी झाले होते. या कार्यक्रमांना पद्मश्री चैत्रामजी पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

तसेच भटके-विमुक्त चेतना परिषद (बीड, लातूर, धाराशिव जिल्हे) या कार्यक्रमात ३८ विविध समाजांतील २३० प्रतिनिधी सहभागी झाले होते. या परिषदेला मा. श्री. भय्याजी जोशी यांचे मार्गदर्शन लाभले होते.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### शेळावे खुर्द येथे ११ दिव्यांग लाभार्थ्यांना धनादेश प्रदान

**पारोळा** : शेळावे खुर्द ग्रामपंचायतीतर्फे ११ दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी दीड हजाराच्या आर्थिक मदतीचे धनादेश प्रदान करीत मदतीचा हात देण्यात आला. माजी सरपंच राजेंद्र पाटील यांच्या हस्ते धनादेश वितरीत करण्यात आले. या वेळी पाटील यांनी सांगितले की, दिव्यांग व्यक्ती हा समाजाचा अविभाज्य घटक असून, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनस्तरावर विविध योजना राबविल्या जातात. या सवलतींचा लाभ दिव्यांगांनी घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. तसेच ग्रामपंचायतीने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी ग्रामसेवक कल्पना पाटील यांनी दिव्यांगांना मिळणाऱ्या शासकीय योजनांची तांत्रिक माहिती दिली. कार्यक्रमाला ग्रामपंचायतीचे सदस्य दुर्योधन बेलदार, खाटीक समाजाचे अध्यक्ष सभी खाटीक, राकेश बिऱ्हाडे, बबन मिस्तरी, ईश्वर सांगळे, छोटू खाटीक, रंगराव बिऱ्हाडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



### बायो जिनियस स्पर्धेत चाळीसगाव, पाचोऱ्याचे विद्यार्थी यशस्वी

**चाळीसगाव** : विद्यार्थ्यांमध्ये जीवशास्त्र विषयाची आवड वाढविण्यासह स्पर्धात्मक आणि वैज्ञानिक विचारांना चालना देणे, या उद्देशाने येथील य. ना. चव्हाण कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा प्राणिशास्त्र विभाग व गव्हर्न्मेंट विदर्भ इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड ह्युमॅनिटीज (अमरावती) यांच्या सहकार्याने 'बायो-जिनियस-२०२६' या राज्यस्तरीय स्पर्धा पार पडल्या. यात चाळीसगाव आणि पाचोरा येथील विद्यार्थ्यांनी यश मिळविले. बायो जिनियस स्पर्धेत धुळे रोड परिसरातील चाळीसगाव महाविद्यालयातील सृष्टी पाटील प्रथम, य. ना. चव्हाण महाविद्यालयाचा मयूर जाधव द्वितीय तसेच गौरी पवार तृतीय, तर पाचोरा एम. एम. महाविद्यालयाचा वेदांत जैनने यश मिळविले. संयोजक म्हणून प्रा. अ. म. चव्हाण, सहसंयोजक डॉ. डी. एन. फुलवाडे, आर. एस. मोरे यांनी काम पाहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. आर. पी. चोंडेकर यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य प्रा. डॉ. जी. बी. शेळके, उपप्राचार्य व आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. जी. डी. देशमुख आणि प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. वाय. एम. भोसले, प्रा. डॉ. वि. आर. लकवाल, प्रा. पल्लवी देशमुख, प्रा. प्रदीप रुद्रस्वार यांचे सहकार्य लाभले. प्रा. अभिषेक धांदे यांनी व प्रा. मेघराज चुडे परीक्षक म्हणून काम पाहिले.



### बुलडाणा अर्बन संस्थेच्या शाखा व्यवस्थापकांची कार्यशाळा

**सोयगाव** : सहकाराला सामाजिक कार्याची जोड देऊन सर्वसामान्य घटकांच्या आर्थिक व सामाजिक उत्थानासाठी कार्य करणाऱ्या बुलडाणा अर्बन संस्थेच्या सिल्लोड विभागीय कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर यांची १७ मार्चला विभागातील शाखा व्यवस्थापकांसाठी कार्यशाळा घेण्यात आली. या वेळी त्यांनी संस्थेच्या व्यवहार वाढीसाठी गोदाम व सोने तारण कर्ज तसेच ठेवीवाढ, नवीन शाखांची निर्मिती, सुरक्षित कर्ज वाटप, संस्थेचे सामाजिक उपक्रम तसेच संस्थेची माहिती देण्यासाठी जनसंपर्क वाढविणे आदी विषयांवर मार्गदर्शनपर सूचना केल्या. या वेळी त्यांनी विभागातील शाखांची माहिती घेतली. सिल्लोडचे विभागीय व्यवस्थापक संजय दळवी व सिल्लोडचे वरिष्ठ शाखा व्यवस्थापक गजानन झाल्टे यांच्या वतीने अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. कार्यशाळेसाठी विभागीय व्यवस्थापक संजय दळवी, विभागीय लेखापरीक्षक, शाखा व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



### ब्रह्मश्री बहुउद्देशीय संस्थेतर्फे गुढीपाडवा साजरा

**जळगाव** : येथील ब्रह्मश्री बहुउद्देशीय सर्व शाखिय ब्राह्मण संस्थेतर्फे गुढीपाडवा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी श्री भगवान परशुराम यांचे पूजन तसेच संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. महाबळ येथील श्री समर्थ रामदास स्वामी मंदिर येथे ब्रह्मश्री बहुउद्देशीय संस्था सकल ब्राह्मण समाजातर्फे गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर श्री भगवान परशुराम पुजन करण्यात आले. यावेळी उदय भालेराव, नितीन कुलकर्णी, अजय कुलकर्णी यांनी सपत्नीक पूजा केली. यावेळी दीपक कुलकर्णी व प्रसाद पटवे गुरुजी यांनी पौरोहित्य केले. यावेळी आ.राजूमामा भोळे यांच्याहस्तेही पूजन करण्यात आले. त्यानंतर नारायणी पार्क भागातील संस्थेच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या ठिकाणी समाज बांधवांना ज्योतिष शास्त्राचे शिक्षण, मार्गदर्शन तसेच इतर अनेक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. याप्रसंगी दीपक कुलकर्णी, डॉ. निलेश राव, अशोक वाघ, दीपक महाजन, उदय खेडकर, कमलाकर फडणीस, प्रसाद निशाणदार आदी उपस्थित होते.

### जिल्हा क्रीडाशिक्षक पुरस्कारासाठी प्रा. घोडेस्वारांची निवड



**जामनेर** : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा शारीरिक शिक्षण व क्रीडाशिक्षक महासंघ आणि जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शारीरिक शिक्षण शिक्षक महामंडळ यांच्यातर्फे देणाऱ्या येणाऱ्या जिल्हास्तरीय क्रीडाशिक्षक पुरस्कार २०२५-२६ साठी जामनेरपुरा येथील इंदिराबाई ललवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा व हिंदी उपशिक्षक प्रा. समीर विष्णू घोडेस्वार यांची निवड करण्यात आली आहे. त्यांनी क्रीडा, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या विशेष उल्लेखनीय कार्याची दखल घेत या पुरस्कारासाठी शिवछत्रपती पुरस्कारार्थी तथा निवड समितीचे अध्यक्ष किशोर चौधरी व जिल्हा निवड समिती सदस्यांनी निवड जाहीर केली. पुरस्कार वितरण ३१ मार्चला होईल. या निवडीबद्दल अध्यक्ष राजेंद्र महाजन, सचिव किशोर महाजन, संचालक मंडळ, मुख्याध्यापक एस. आर. चव्हाण, उपमुख्याध्यापक एस. एन. चवरे, उपप्राचार्य प्रा. डी. झेड. गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. अत्तरदे, पर्यवेक्षक प्रा. व्ही. बी. पाटील, महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स संघटनेचे उपाध्यक्ष राजेश जाधव, क्रीडा विभागप्रमुख जी. सी. पाटील, बी. पी. बेनाडे, जी. डी. कचरे, जामनेर तालुका क्रीडा समन्वयक डॉ. आसिफ खान, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, जामनेर तालुका शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघाचे पदाधिकारी व सदस्यांनी प्रा. घोडेस्वार यांचा गौरव केला.

# चोपड्यात ३० गाळे सील अन् ५० नळजोडण्या खंडित

## पालिकेतर्फे करवसुलीसाठी कारवाई मोहीम; २२ मार्चनंतर अधिक तीव्र होणार

**तभा वृत्तसेवा**
**चोपडा, १९ मार्च**

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मूलभूत सोयी-सुविधांच्या पूर्ततेसाठी आवश्यक असलेल्या करवसुलीबाबत चोपडा पालिका प्रशासन आता पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आले आहे. बुधवारी (१८ मार्च) पहाटेपासूनच पालिकेच्या पथकाने थकीत साडेचार कोटींच्या वसुलीसाठी शहरात सुरू केलेल्या कारवाईत तीस गाळे सील, तर पन्नास नळजोडण्यात खंडित करण्यात आल्या. यामुळे थकबाकीदारांचे धाबे दणाणले. मार्चनंतर कारवाई मोहीम अधिक तीव्र केली जाणार असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

पालिका प्रशासनाने बुधवारी (१८ मार्च) केलेल्या कारवाईत मोठा माळीवाडा, आठवडे बाजार (ए, बी. सी विभाग), छत्रपती शाहू महाराज कॉम्प्लेक्स (आ. क्र. १०२), जुना जलकुंभ परिसर आणि थाळनेर दरवाजा या परिसरातील तब्बल ३० गाळ्यांना सील ठोकले. केवळ गाळेच नव्हे, तर पाणीपट्टी थकविणाऱ्यांविरोधातही कठोर भूमिका घेण्यात आली आहे. आडगाव रस्ता, आदर्शनगर, औद्योगिक वसाहत (खुशबू विवेक जैस्वाल क्षेत्र) आणि आयएचडीपी-ई विंग या भागातील ५० नळजोडण्या खंडित करण्यात आल्या.

**अजूनही अनेक थकबाकीदार 'रडार'वर**

पालिकेची शहरात घरपट्टी व पाणीपट्टीपोटी तब्बल साडेचार कोटींची थकबाकी आहे. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, अजूनही १,१०० नळजोडणीधारक, ६०० निवासी मालमत्ताधारक आणि २०० गाळेधारक पालिकेच्या 'रडार'वर आहेत.

**'बिल मिळाले नाही' ही सबब चालणार नाही**

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, मालमत्ता कर आणि पाणीपट्टी भरण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबरपर्यंत असते. मुदत संपल्यानंतर आता दरमहा दोन टक्के दराने व्याज आकारणी केली जात आहे. अनेक नागरिक 'आम्हाला बिल मिळाले नाही,' असे कारण देऊन कर भरण्यास टाळाटाळ करतात; परंतु प्रशासनाने आता ही सबब ऐकून न घेण्याचे ठरविले आहे. स्वतःहून पालिकेत येऊन कर भरणा करणे ही प्रत्येक मालमत्ताधारकाची कायदेशीर जबाबदारी आहे. बिले वाटप ही केवळ एक प्रक्रिया आहे; परंतु बिल मिळाले नाही तरी कर भरण्याच्या जबाबदारीतून नागरिकांची मुक्तता होत नाही.

**२२ मार्चपासून 'आरपार'ची लढाई**

गुढीपाडवा आणि ईद या सणांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी प्रशासनाला सणापर्यंत थांबण्याची विनंती केली आहे. सणांचा आनंद विस्कळीत होऊ नये, या सामाजिक भावनेतून प्रशासनाने सध्या कारवाईचा वेग थोडा मर्यादित ठेवला आहे. मात्र, ही सवलत केवळ २२ मार्चपर्यंतच असेल. त्यानंतर कोणतीही पूर्वसूचना किंवा सवलत न देता ही मोहीम तीव्र स्वरूपात राबविली जाणार आहे.

**पालिका प्रशासनाचे आवाहन**

पालिकेच्या माध्यमातून रस्ते, स्वच्छता आणि पाणीपुरवठा या सेवा सुरळीत ठेवण्यासाठी वेळेवर कर भरणे आवश्यक आहे. ३१ डिसेंबर ही मुदत संपल्यामुळे आता व्याजासह वसुली सुरू आहे. बिल मिळाले नाही ही सबब यापुढे ग्राह्य धरली जाणार नाही. नागरिकांनी स्वतःहून कार्यालयात येऊन कर भरावा. २२ मार्चनंतर थकबाकीदारांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी दिला आहे.

# संत कबीर हे ज्ञान, विवेक अन् निर्गुण भक्तीचे प्रणेते

## डॉ. मनोज महाजन : अमळनेरला साने गुरुजी वाचनालयात मसापचा संतांचा जागर उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ मार्च**

संत कबिरांनी समाजाला केवळ कोरडे तत्त्वज्ञान ऐकवले नाही, तर ऐकवलेले तत्त्वज्ञान समाजामध्ये तळागाळापर्यंत रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यांची भक्ती निर्गुण, निराकार, अनंत होती. त्यांनी कोणत्याही एका धर्माचा अथवा दैवताचा प्रचार-प्रसार केला नाही. धर्माधर्मात भेद करण्याऐवजी ते धर्माधर्मातील पूल बनले. त्यांनी ज्ञान, विवेक आणि निर्गुण उपासनेला महत्त्व देऊन समाजाला सत्य सांगितले. त्यासाठी त्यांनी राजसत्तेचा विरोध पत्करला. अशा महान संतांचा एकदाच मृत्यू होत नाही तर समाजात त्यांचा वारंवार मृत्यू होतो, असे प्रतिपादन जळगाव येथील मू. जे. महाविद्यालयातील प्रा. डॉ. मनोज महाजन यांनी केले.



अमळनेर येथील पूज्य साने गुरुजी वाचनालयात महाराष्ट्र साहित्य परिषद शाखेतर्फे आयोजित संत साहित्य जागर कार्यक्रमात ते बोलत होते. अमळनेर शाखेचे अध्यक्ष संदीप घोरपडे अध्यक्षस्थानी होते. विचारमंचावर वाचनालयाचे अध्यक्ष तथा समन्वयक दिलीप सोनवणे, साहित्यिक प्रा. बी एन चौधरी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन, दीपप्रज्वलनाने न करता संत कबिरांचे भजन म्हणणाऱ्या एकतारी भजनी मंडळाने दोहे गाऊन केली. याप्रसंगी डॉ. महाजन यांनी संत कबीर यांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांचे साहित्यिक योगदान आणि त्यांच्याबद्दल केले गेलेले आरोप याविषयी विस्तृत स्वरूपामध्ये अभ्यासपूर्ण मांडणी केली. संत कबिरांचे दोहे लिखित स्वरूपात उपलब्ध नसल्याने ते संकलित करण्यात आले. यामुळे त्यांनी न गायलेले दोहेदेखील संत कबिरांचे दोहे म्हणून समाज गातो. त्यातील गुरू गोविंद दोनो खडे आणि बडा हुआ तो क्या हुआ या दोन दोह्यांचा त्यांनी उल्लेख केला. कबिरांनी राजसत्तेला किंवा समाजाला आवडेल ते न गाता, समाजाच्या भल्यासाठी सत्याची आळवणी केली. यामुळे त्यांना राजसत्ता आणि समाजाचाही विरोध पत्करावा लागला. प्रसंगी मृत्यूलाही सामोरे जावे लागले; परंतु न डगमगता त्यांनी सामान्य माणसाची पिडा आणि शाश्वत सत्ये रोखठोकपणे मांडली. ते नारीविरोधी आणि निराशाजनक साहित्याचे पुरस्कर्ते होते, असा त्यांच्यावर आरोप केला जातो, असे डॉ. महाजन यांनी म्हटले. असे असले तरी त्यांनी समाजाला पूजा, पाठ करण्याऐवजी निरीक्षण करायचे आणि प्रश्न विचारायचे बळ दिले. हे शास्त्र आणि पुस्तक अभ्यासण्यापेक्षा मोलाचे आहे, अशी भूमिका महाजन यांनी मांडली.

संदीप घोरपडे यांनी अमळनेर महाराष्ट्र साहित्य परिषद संत विचारांना डोळस पद्धतीने समाजासमोर आणण्याचा नवा प्रयत्न करीत असल्याचा मनोदय व्यक्त केला. अशा कार्यक्रमांना ग्रामीण तसेच शहरी भागातूनही रसिकांची उपस्थिती देतात, यातून पुढील अनेक वर्षे संतविचार समाजातून हद्दपार होणार नाही यावर त्यांनी शिक्कामोर्तब केले. प्रा. डॉ. रमेश माने यांनी सूत्रसंचालन केले. कार्यवाह डॉ. विजया गायकवाड यांनी परिचय करून देत आभार मानले.

कार्यक्रमाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सदस्य नरेंद्र निकुंभ, गोकुळ बागुल, सुनीता पाटील, मनोहर नेरकर यांच्यासह वाचनालयाचे सदस्य आणि रसिक श्रोते उपस्थित होते. महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. हा महाराष्ट्र साहित्य परिषदेचा सलग सहावा उपक्रम होता.



# 'महावितरण'च्या बेपर्वाईमुळे गव्हाचे उभे पीक खाक

## पिंप्राळ्यातील शेतकऱ्याचे अडीच लाखांचे नुकसान

**जळगाव** : पिंप्राळा येथील शेतकऱ्याचे चोरगाव (ता. धरणगाव) शिवारामधील सर्व्हे क्रमांक १५०/२, १५१/२ मधील शेतात 'महावितरण'च्या खांबावरून अवैधरीत्या टाकलेल्या आकड्यांमुळे वीजतारांमध्ये घर्षणाने ठिगण्यांनी काढणीला आलेला संपूर्ण चार बिघे गहू खाक झाला. यात सुमारे अडीच लाखांचे नुकसान झाले आहे.

पिंप्राळा येथील शेतकरी विजय श्रीराम महल्ले यांच्या चोरगाव शिवारात असलेल्या शेतात गतवर्षीही अशीच घटना घडून सुमारे ५० ते ६० हजारांचा कडबा जळून खाक झाला होता. गेल्या सात वर्षांपासून संबंधित वीजखांबावरून 'महावितरण'च्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी बेकायदेशीर वीजजोडणी दिली आहे. त्यामुळे १५ मार्चला दुपारी दोनच्या सुमारास ही आग लागली. आगीत लाखोंचे नुकसान झाले आहे. 'महावितरण'च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिलेल्या अवैध वीजजोडणीमुळेच ही आग लागली असल्याचे शेतकरी विजय महल्ले यांचे म्हणणे आहे. चार बिघे गहू जळून खाक झाल्याने विजय महल्ले हवालदिल झाले असून, त्यांनी 'महावितरण'कडून नुकसानभरपाईची मागणी केली आहे. नुकसानीचा चोरगांव येथील तलाठ्यांनी पंचनामा केला आहे.

# पारोळ्यात रामनवमीपर्यंत भक्तीचा जागर!

## रविकिरण महाराजांचे २५ ला कीर्तन, २७ ला प्रभू श्रीरामांचा पालखी सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, १९ मार्च**

येथील ऐतिहासिक आणि श्रद्धास्थान असलेल्या पुरातन श्री मोठे राममंदिर संस्थानमध्ये हिंदू नववर्ष आणि प्रभू श्री रामनवमीनिमित्त धार्मिक उत्सव सोहळा होत असून, गुरुवारपासून (१९ मार्च) या उत्सवाला मंगलमयी वातावरणात सुरुवात झाली. २७ मार्चपर्यंत विविध भरगच्च कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आल्याची माहिती संस्थानतर्फे देण्यात आली.

उत्सवाचे विशेष आकर्षण म्हणून २५ मार्चला रात्री आठला हरिभक्त परायण रविकिरण महाराजांचे जाहीर कीर्तन होईल. भक्ती आणि ज्ञानाच्या या त्रिवेणी संगमातून प्रभू रामाचा आदर्श भाविकांच्या मनावर बिंबविला



जाणार आहे.

२७ मार्चला रामजन्मोत्सव दिनी सकाळी नऊ ते दुपारी बारा या वेळेत जळगाव येथील प्रसिद्ध श्री श्याम सेवा समितीतर्फे भक्ती संगीताचा कार्यक्रम सादर केला जाणार आहे. सुश्राव्य भजनांनी संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय होणार आहे.

२७ मार्चला दुपारी बाराला प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव सोहळा थाटात साजरा केला जाईल. या वेळी मुख्य महाआरती करण्यात येईल. जन्मोत्सवानंतर उपस्थित भाविकांना संस्थानतर्फे साबूदाणा खिचडीचा महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. दरवर्षीच्या परंपरेनुसार, उत्सवाची सांगता भव्य पालखी सोहळ्याने होणार आहे. २७ मार्चला सायंकाळी पाचला श्री मोठे राम मंदिर संस्थानपासून प्रभूंची पालखी मिरवणूक निघेल. फुलांनी सजवलेला रथ, टाळ-मृदंगाचा गजर आणि भाविकांच्या उपस्थितीत सोहळा शहराच्या मुख्य मार्गावरून मार्गस्थ होईल. धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना पारोळा शहर व परिसरातील भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल, सचिव कल्पेश अग्रवाल, ॲड. दत्ताजी महाजन, डॉ. अनिल गुजराथी यांनी केले आहे.

# अमळनेरमध्ये 'केरळ स्टोरी-२'चा मोफत शो

## रोटरी क्लब अन् रोट्रॅक्ट क्लबतर्फे तरुणींमध्ये जनजागृती

**अमळनेर** : तरुणींना सामाजिक आणि वैयक्तिक आयुष्यातील धोक्यांविषयी जागरूक करण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब व रोट्रॅक्ट क्लब, अमळनेर यांच्या वतीने 'केरळ स्टोरी २' या चित्रपटाचे मोफत प्रक्षेपण करण्यात आले. या उपक्रमाला शहरातील तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

१५ ते २१ या वयोगटातील मुलींसाठी एस.एस. सिनेप्लेक्स येथे विशेष शोचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी रविवारी १४७ मुलींनी या शोचा लाभ घेतला. वाढत्या प्रतिसादामुळे सोमवार व मंगळवारी दुपारी ३ ते ६ या वेळेत आणखी तीन शो घेण्यात आले. या तीन दिवसांत एकूण सुमारे ४५० मुलींनी चित्रपट पाहिला असून, बुधवारी आणखी एक शो घेण्यात आला असल्याचे आयोजकांनी सांगीतले.

चित्रपट पाहताना अनेक मुली भावूक झाल्याचेही दिसून आले. पालकांचे मार्गदर्शन, योग्य संस्कार आणि सतर्कता यांचे महत्त्व विषद करण्यात आले. या उपक्रमासाठी रोटरी व रोट्रॅक्ट क्लब अध्यक्ष देवेंद्र कोठारी, ध्रुव पारख, सचिव आशिष चौधरी, निधीश कोचर, प्रोजेक्ट चेअरमन पूनम कोचर, रोहित सिंघवी, मोनीश माखिजा, शाहू निकम तसेच इतर सदस्यांनी सहभाग नोंदविला.



# पारोळा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची श्री ओम ॲग्रोमध्ये शैक्षणिक क्षेत्रभेट

## वनस्पतिशास्त्र विभागाचा उपक्रम; बायोमास तंत्रज्ञान-जैवविविधतेचा प्रत्यक्ष अनुभव

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, १९ मार्च**

येथील राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागातर्फे प्रथम वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची बोदर्डे शिवारातील श्री ओम ॲग्रो इंडस्ट्रीजमध्ये विशेष शैक्षणिक अभ्यासभेट घडवून आणण्यात आली. भेटीदरम्यान, विद्यार्थ्यांनी बायोमास तंत्रज्ञान आणि जैवविविधतेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आणि कृषी-आधारित उद्योगांची ओळख करून देणे, हा या अभ्यासभेटीचा मुख्य उद्देश होता. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना वनस्पतींच्या टाकाऊ अवशेषांपासून (बायोमास) पर्यावरणपूरक इंधननिर्मितीची प्रक्रिया जवळून पाहता आली. उद्योगात परिसरातील वनस्पतींचे खोड, फांद्या आणि वाळलेल्या पानांचा वापर करून बायोमास ब्रिक्वेट्स व बायोकोल पेलेट्स तयार केले जातात.

कारखान्याच्या परिसरात असलेल्या विविध वनस्पतींच्या प्रजातींचा विद्यार्थ्यांनी अभ्यास केला. प्रा. जे. बी. पाटील यांनी बांबू, सुबाभूळ, शेवगा, साग आणि विविध फळझाडांची शास्त्रीय नावे, त्यांची कुळे आणि त्यांच्या आर्थिक उपयोगांबाबत मार्गदर्शन केले. मोठ्या खोडांचे मशीनद्वारे लहान तुकड्यांत रूपांतर केले जाते. ग्राइंडर आणि हॅमर मशीनच्या सहाय्याने लाकडाचे बारीक चूर्ण केले जाते. या पावडरपासून ६ व ८ मिलिमीटरचे पर्यावरणपूरक ब्रिक्वेट्स तयार करून ते पॉवर प्लान्ट, बॉयलर आणि घरगुती वापरासाठी इंधन म्हणून विक्रीस पाठविले जातात, अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

या वेळी उद्योगाचे संचालक अमित मुंदाणकर, पुरुषोत्तम मुंदाणकर व बंटी शिंदे यांनी विद्यार्थ्यांना इंधननिर्मितीच्या तांत्रिक बाबींची माहिती दिली. वनस्पतींची बाह्यरुपिकी अर्थात मॉर्फोलॉजी पुस्तकात वाचण्याऐवजी प्रत्यक्ष अनुभवायला मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. अभ्यासभेट प्राचार्य डॉ. व्ही. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपप्राचार्य डॉ. अजय पाटील यांच्या सहकार्याने पार पडली. समन्वयक म्हणून प्रा. जे. बी. पाटील व प्रा. प्रतिभा पाटील यांनी नियोजन केले.

# धरणगाव-एरंडोल महामार्गाची दुर्दशा; धुळीने प्रवासी त्रस्त; अपघाताची वाढली भीती

**कडू महाजन**
**धरणगाव, १९ मार्च**

एरंडोल ते धरणगाव या राज्य महामार्गाच्या रूंदीकरणासह कॉंक्रीटीकरणासाठी बांभोरी व टोळी गावापासून सुकमल लॉन्सपर्यंत रस्त्याची दोन्ही बाजू खोदल्या आहेत. तर यावर टाकलेल्या खडी, मुरुम यामुळे येथे प्रवाशांना तर गावातील नागरिकांनाही धुळीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

दरम्यान, यामुळे प्रवाशांच्या आरोग्याला धोका, अपघाताची भीती वाढली असून वाहनांचे नुकसान, वेळेचा अपव्यय आदी प्रकार सुरू आहेत. दिवसा धूळ तर रात्री अंधारामुळे प्रवास जीवघेणा झाला आहे. अनैक दिवसांपासून हे प्रलंबित कामाची अद्यापही पुर्नत्वात येत नसल्याने नांगरीक चिड व्यक्त होत आहे.

**कासव गतीने कामे**

काही दिवस काम बंद ठेवणे अन् कासवगतीने काम सुरू ठेवणे, यामुळे काम लांबणीवर पडले तर अपघाताचे प्रमाण वाढून निष्पाप लोकांना जखमी वा प्राणाला मुकावे लागेल. याला सर्वस्वी जबाबदार ठेकेदार व या कामावर नियंत्रण ठेवणारी शासकीय यंत्रणा है जबाबदार राहतील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

**तालुका वार्तापत्र**

तसेच रस्त्याचा उरलेला भाग व रूंद केलेला कच्चा रस्ता वाहतुकीसाठी खुला केला आहे. मात्र, या रस्त्यावरील उखडलेली खडी, माती व धुळीचे लोट यांना प्रवाशांना सामोरे जावे लागत असून नाच रस्त्यावरुन सर्व वाहनांची वाहतूक सुरू आहे. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

विशेषता रस्ता एका बाजूला खोदण्याचे काम सुरू असून वाहन चालकांना धुळीचा तर सामना करावा लागत आहे, परंतु स्थानिक रहिवाशांना श्वसनाचा त्रास सुरू झाला आहे. आहे. परंतु, या समस्येकडे लोकप्रतिनिधी, प्रशासनाकडून पूर्णता दूर्ल केले जात असल्याने ठेकेदाराची मनमानी सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

धरणगाव ते एरंडोल या मार्गाची लांबी अवधी १२ किमी असून या मार्गावर रात्रदिवस वाहनांची वर्दळ सुरू असते. प्रत्येक वाहन रस्त्यावरुन जाताना धुळीचे लोट उठत असल्याने वाहतूक करणे कमालीचे धोक्याचे झाले आहे. अवघ्या १२ किमीच्या रस्त्यावरून प्रवास करण्यासाठी पूर्वी २० मिनिटे लागत असत. मात्र आता वाहनांना एक तास लागतो. एरंडोल, टोळी, बांभोरी व पंचक्रोशीतील गावांचे शेतकरी रात्री या मार्गाने शेतात ये-जा करतात. परंतु, या मार्गावरील प्रवास म्हणजे 'जीवाला धोका आणि अपघाताला मोका' असा प्रकार सुरू आहे.

**दिवसातून ३ वेळा पाणी टाकावे**

एका बाजूने वाहतूक सुरू असून खड्डे, उंचवटे व खही तुडवत वाहनांना तारेवरची कसरत करत मार्ग काढावा लागत आहेत. आत्तापर्यंत दुचाकी वाहने घसरून अनेक अपघात झाले आहेत. रहदारी एका बाजूने सुरू असल्याने वाहनांच्या ठिकठिकाणी रांगा लागत आहेत. परिणामी प्रवासी व वाहनचालक कमालीचे त्रस्त झाले आहेत कच्च्या रस्त्यावर टॅंकरद्वा पाणी टाकण्याची गरज आहे ही सुविधा दिवसातून सकाळी दुपारी व संध्याकाळी करावी अशी मागणी होत आहे.

रात्री रस्त्याचे काम सुरू असलेल्या ठिकाणी पुरेशी प्रकाश योजना करून द्यावी, असे सुजाण नागरिकांचे मत आहे. कामास दिवसेंदिवस दिरंगाई होत असल्याने प्रवासी संघटना आंदोलनाचा तयारीत असून प्रशासकीय पातळीवर या कामाची दखल घेऊन काम पुर्ण करावे अशी मागणी जनतेतून होत आहे

## महत्त्वाचे

### भगवान झुलेलाल यांची आज भव्य शोभायात्रा

**जळगाव :** भगवान झुलेलाल यांच्या जन्म उत्सव तसेच चेट्री चंड्र (सिंधी दिवस) निमित्त शुक्रवारी (२० मार्च) दुपारी चार वाजता शहरातून भव्य शोभा यात्रेचे आयोजन अमर शहीद संत कंवरराम ट्रस्टव्दारा तसेच झुलेलाल उत्सव समितीतर्फे करण्यात आले आहे. फुले मार्केट येथील मरीमाता मंदिरात पूजाविधी करुन शोभायात्रेला सुरुवात होईल. शास्त्री टॉवर, एम.जी. रोड, गोलाणी मार्केट, मनपा इमारत, नेहरु चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळला (कोर्ट) चौक स्टेट बँक मार्गे भगवान झुलेलाल मंदिर- संत कंवरराम चौक येथुन पंतमुखी हनुमान मंदिर, गणेश नगर, बाबा हरदासराम हाऊसिंग सोसायटी, बाबा हरदासराम समाज मंदिर मार्ग कंवर नगर येथील पुज्य सेवा मंडळ येथे मिरवणुकीचा समारोप होईल. या निमित्त दुपारी चार वाजेपासून सिंधी समाज बांधव त्यांचा व्यवसाय बंद ठेवतील.

### पीकविमा प्रकरणी सेंटरचालकाविरुद्ध गुन्हा

**जळगाव :** पीक विमा पोर्टलवर शेतकऱ्यांच्या शेतातील पिकाचा विमा खोटा भरुन शासकीय अनुदानाचा गैरफायदा घेण्याच्या उद्देशाच्या १०.८८ कोटी रुपयांच्या फसवणुक प्रकरणी अनिल पवार, किशोर सोनवणे महेंद्र बडगुजर (रा.भोकर) यांच्यासह इतरांवर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक अनंत अहिरे याप्रकरणी तपास करीत आहेत.

### मुलास पळवून नेले

**जळगाव :** अल्पवयीन मुलास त्याच्या राहत्या घरातून अमिष दाखवून पळवून नेले. मंगळवारी (१७ मार्च) दुपारी दोन ते सव्वाचार वाजेच्या सुमारास ही घटना शहरात शनिपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत योगेश्वर नगरात घडली. पुनित राजेंद्र भोळे (वय १३ वर्ष,रा. योगेश्वर नगर)) असे मुलाचे नाव आहे. त्याने पांढ्या रंगाचा शर्ट व निळ्या रंगाची हाप पॅन्ट परिधान केली आहे. कुटुंबियांनी सर्वत्र शोध घेतला असता मुलाचा तपास लागला नाही. पीडित मुलाच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार याप्रकरणी बुधवारी पोलीस ठाण्यात पळवून नेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार उमेश ठाकुर हे तपास करीत आहेत.

### ज्वेलर्स शॉपजवळ दुचाकी चोरी

**जळगाव :** सुमारे १५ हजार किमतीची होंडा शाईन दुचाकी (एमएच १९ सीएम ६००६) चोरट्याने चोरुन नेली. शहरातील नवीपेठेतील ज्वेलरी शॉप शेजारी हेमंग मेहता यांचे घरासमोर रस्त्यावर ही घटना मंगळवारी (१७ मार्च) दुपारी घडली. दुचाकीचा शोध परिसरात घेतला असता तपास लागला नाही. बबन मारुती इकडे (वय ४८,रा. साई प्रसाद कॉलनी मेहरुण) यांच्या तक्रारीनुसार याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार भगवान पाटील हे करीत आहेत.

### ट्रॅक्टरचे धुड चोरून नेले

**जळगाव :** घराच्या मागील बाजूला गोठ्यात लावलेले सुमारे एक लाख २५ हजार रुपये किमतीचे स्वराज ट्रॅक्टरचे धुड (एमएच १९, डीव्ही २४८९) चोरट्यांनी लांबविले. बुधवारी (१८ मार्च) सकाळी सहाच्या सुमारास ही घटना रवंजे खुर्द (ता. एरंडोल) येथे उघडकीस आली. गाव शिवारात शोध घेतला असता ट्रॅक्टर मिळून आले नाही. पांडुरंग मोहन पाटील (वय ५४, रा. रवंजे खुर्द) यांच्या तक्रारीनुसार याप्रकरणी एरंडोल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार दिनेश पाटील तपास करीत आहेत.




गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध

संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९


**अंकासाठी संपर्क**

'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.९०२३३४५५५० ९६२३६०४७१२









# गुढीपाडवा-नववर्षाचे जल्लोषात स्वागत!



## शोभायात्रा, सामाजिक उपक्रमांसह संगीत सभा अन् महापालिकेत पहिल्यांदा उभारली गुढी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ मार्च**

गुढी पाडवा आणि नवीन वर्षाच्या पावन दिवसाची सुरुवात गुरुवारी (२० मार्च) शहरात आनंदमय व उत्साहमय वातावरणात झाली. सकाळी घर- अंगण गृहिणींनी स्वच्छ केले. दारापुढे विविध रंगाची रांगोळी काढली. घराच्या प्रवेशव्दाराच्या उजव्या बाजुला भूमीवर पाटावर स्वस्तिक काढले. त्यावर गुढी उभारत नवीन वर्षाचे आनंदाने स्वागत केले. नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर अनेक ठिकाणी विविध सामाजिक उपक्रमांचा श्रीगणेशा झाला. स्वागत यात्रा निघाल्या. नवीन संकल्पनेचा प्रारंभही करण्यात आला.पहाट संगितमय मैफलीने प्रसन्न झाली. महानगरपालिकेत यंदा पहिल्यांदा गुढी पाडव्याची महापौर यांच्या हस्ते गुढी उभारण्यात आली. तसेच पुजन करण्यात आले.

**पारंपरिक वेशभूषा**

जगतगुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी - जगद्गुरु रामानंदाचार्य (दक्षिण पीठ नाणिजधाम) अनुयायी यांच्या मार्फत दरवर्षीप्रमाणे चैत्र शु. १ शके १९४८ गुरुवारी (२० मार्च) हिंदु नववर्ष स्वागत यात्रा मिरवणुकीचा चिमुकले राममंदिरापासून शहरात सुरुवात करण्यात आली. पारंपारिक वेशभूषा परिधान करत महिला,युवती पुरुष या शोभायात्रेत सहभागी झाले होते. ढोल ताशांच्या गजरात लेझीमच्या तालावर ठेका घेत नरेंद्र महाराज यांच्या अनुयायी भक्तांनी मिरवणुकीत रंगत आणली. तसेच नवनवर्षाचा आंनदोत्सव साजरा केला. ही शोभा यात्रा शिवाजी पुतळा चौक, नेहरू चौक, टॉवर चौक, चौबे शाळा, सुभाष चौक, ग्रामदैवत श्रीराम मंदिर रथ चौकात आली. आणि या ठिकाणी शोभायात्रेचा समारोप झाला.

कार्यक्रमासाठी जिल्ह्याचे निरीक्षक गणेश राकडे, उत्तर महाराष्ट्र उपपीठ प्रसिद्धी प्रमुख डिगंबर टोके, जिल्हाध्यक्ष विठ्ठल दांगोडे, जिल्हा महिला अध्यक्ष उषाताई कोळी, माजी जिल्हाध्यक्ष डॉक्टर बोरसे, नरेंद्र खाचणे जिल्हा सेवा समिती सर्व जिल्ह्यातून सर्व तालुक्यांच्या तालुका सेवा समिती सेवा केंद्र समिती असे तळागाळातून सर्वत्र साधक शिष्य भक्तगण हजारोच्या संख्येने सहभागी झाले होते.

**गुरुपूजन करून स्वागत यात्रा**

सकाळी रथामध्ये गुरुपूजन करून स्वागत यात्रा ची सुरवात झाली. कार्यक्रमासाठी आमदार सुरेश भोळे, विजय लक्ष्मण बांधेल, धर्मराज फाउंडेशन फाउंडेशनचे विनायक पाटील, पूजा विजय जगताप नगरसेविका शिवाजीनगर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात आमदार भोळे यांच्या हस्ते करण्यात आली. कार्यक्रमांमध्ये सुरुवातीला मुख्य बॅनर, निशानधारी महिला, पुरुष बँड पथक,कलश धरी महिला, वासुदेवाने तर सर्व प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले.

**सामाजिक उपक्रम देखावे**

श्रीराम पंचायतन जगद्गुरु श्रीमद रामानंदाचार्य यांच्या प्रेरणेतून सामाजिक उपक्रमांतर्गत मरणोत्तर देहदान व अवयव दान देखावा, जय मल्हार देखावा, संत गजानन महाराज देखावा, भारत माता देखावा, लेझीम पथक, भजनी मंडळ, रथयात्रा त्यानंतर विविध सामाजिक उपक्रमाचे फलक घेऊन भक्तगणांनी या शोभायात्रेतून हिंदू धर्माचे संवर्धन दाखविले. या मंगलमय शोभायात्रेने संपूर्ण शहरात भगवे वातावरण झाले. रामानंद संप्रदाय जळगाव जिल्हातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## महापौरांच्या हस्ते गुढीपूजन; महापालिकेत प्रथमच जल्लोष

**जळगाव :** मराठी नववर्षाचे स्वागत आणि गुढीपाडव्याचे औचित्य साधून जळगाव शहर महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच गुरुवारी उत्साही वातावरणात गुढी उभारण्यात आली. महापौर दीपमाला काळे यांच्या संकल्पनेतून राबविलेल्या या उपक्रमाने मनपा परिसरात भक्तीमय आणि सांस्कृतिक वातावरण पाहायला मिळाले.



**विधीवत पूजन - गुढीची स्थापना**

सकाळी १० वाजता महानगरपालिकेच्या मुख्य प्रांगणात महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते विधीवत गुढीपूजन करण्यात आले. यावेळी पारंपारिक पद्धतीने गुढी उभारून नववर्षाचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती सिंधुताई कोल्हे, सभागृह नेते नितीन लद्धा यांच्यासह भाजप गटनेते प्रकाश बालाणी, शिवसेना गटनेते विष्णू भंगाळे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे गटनेते प्रफ ुल्ल देवकर आणि लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महापुरुषांना अभिवादन अन् परिसर स्वच्छता**

गुढी उभारल्यानंतर महापौरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. मनपा प्रांगणातील लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या पुतळ्यालाही पुष्पहार अर्पण करून वंदन केले. गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांची विशेष स्वच्छता करण्यात आली. सर्वच ठिकाणी माल्यार्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

**सजावटीने सजला परिसर**

या सोहळ्यासाठी संपूर्ण मनपा परिसर आकर्षक रांगोळ्यांनी सजवण्यात आला होता. कार्यक्रमाला नगरसेवक डॉ. विश्वनाथ खडके, अॅड. शुचिता हाडा, नितीन सपके, जयश्री पाटील, रेश्मा काळे, मंगला चौधरी, पूजा जगताप, रीटा सपकाळे, कलाबाई शिरसाळे, पियुष कोल्हे, गायत्री राणे, सुरेखा तायडे, विजय बांदल, कविता शिवदे, राजेंद्र घुगे पाटील, माधुरी बारी, निलेश तायडे, ऋतिक ढेकळे, रबियाबी खान यांसह मनपाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

> मराठी संस्कृतीचे जतन करणे आणि आपल्या महापुरुषांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. मनपाच्या इतिहासात हा सण पहिल्यांदाच अशा पद्धतीने साजरा होत असल्याचा आनंद आहे.
>
> **- दीपमाला काळे, महापौर.**

**तीन दिवस राहणार रोषणाई**

गुढीपाडवा ते महानगरपालिका स्थापना दिन असा दुहेरी उत्सव जळगावकर अनुभवणार आहेत. यानिमित्त १९ ते २१ मार्च या कालावधीत मनपा इमारत आणि शहरातील मुख्य चौकांमध्ये झगमगाटी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वर्ष प्रतिपदा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ मार्च**

देशाला परमवैभवाला नेणे, विश्वगुरू बनविणे हेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांचे अंतिम लक्ष्य आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. नितीन बारी यांनी केले. ते गुरुवारी (दि.१९), आशाबाबा नगरमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वर्ष प्रतिपदा उत्सवात बोलत होते.



सकाळी, स्वयंसेवकांनी परिसरातून सघोष पथसंचलन केले. यानंतर झालेल्या उत्सवप्रसंगी व्यासपीठावर नगर कार्यवाह कैलास अग्निहोत्री, माजी मुख्याध्यापक व्ही. डी. पाटील उपस्थित होते. प्रा. नितीन बारी म्हणाले की, संघ परिवार हा राष्ट्र प्रथम मानून काम करत असतो. संघाच्या शाखांमध्ये व्यक्ती निर्माण होते. देशाचा इतिहास पाहाल तर, प्रत्येक आपत्तीत मदतीला सर्वात प्रथम स्वयंसेवक उभा राहिला आहे. संघाचे विचार क्रीडा, शिक्षण, सेवा, राजकीय आदी विविध क्षेत्रात पोहोचले आहेत. संघाची शतकी वाटचाल सोपी नव्हती. आज प्रत्येक क्षेत्रात संघ काम करत आहे. देशाला परम वैभवाला नेणे, विश्वगुरू करणे हे स्वयंसेवकांचे अंतिम ध्येय आहे. भारताचे महत्त्व जगातील देशांना पटले आहे. त्यामुळे आताच्या युद्धात भारताने मध्यस्थी करावी, असे या देशांना वाटत आहे. ते मोठ्या आशेने भारताकडे पाहत आहेत.

सरसंघचालक मोहन भागवत यांनी पंच परिवर्तनाचे सूत्र सांगितले आहे. पर्यावरण रक्षण, कुटूंब प्रबोधन, सामाजिक समरसता, नागरिक कर्तव्य, स्वदेशी यावर स्वयंसेवक काम करत आहेत, असेही प्रा. नितीन बारी यांनी सांगितले. व्ही. डी. पाटील यांनी संघरचना सांगितली. प्रतिकूल परिस्थितीला, आव्हानाला सामोरे जाताना संघ शांतपणे आपले काम करत राहिला. यातून दरवेळी तो अधिक विस्तारला, असेही ते म्हणाले. प्रास्ताविक कैलास अग्निहोत्री यांनी केले. या संचलनात स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग नोंदवित परिसरात देशभक्तीपर वातावरण निर्माण केले.



## चैत्र पालवी स्वरोत्सवची रंगली मैफिल

**जळगाव :** गुढी पाडवानिमित्त पहाट चैत्र पालवी स्वरोत्सव ही सुरेल मैफल शहरातील महात्मा गांधी उद्यानात भक्तीगीत, अभंग, नाट्यगीत आणि सुगम संगिताने रंगली. स्व.वसंतराव चांदोरकर स्मृती प्रतिष्ठानतर्फे आयोजित संगतीमय मैफिलीला गुरु वंदनने सुरुवात झाली. प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त दीपक चांदोरकर यांनी गुरु वंदना सादर केली. महापौर दीपमाला काळे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.विवेकानंद कुलकर्णी, आमदार सुरेश भोळे तसेच दीपक चांदोरकर यांनी दीपप्रज्वलन केले. वरुण नेवे, श्रुती जोशी तसेच बासरीवादनावर राजेश्वरी रत्नपारखी यांनी सुरेख सादरीकरण केले. कार्यक्रमाचे निवेदन प्रिती झारे यांनी केले. नुपुर खटावकर यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी स्निग्धा कुलकर्णी तसेच भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशन यांचे सहकार्य लाभले.

## हिंदू जनजागृती समितीतर्फे ३१ ठिकाणी सामूहिक गुढी

**जळगाव :** गुढीपाडव्याच्या पावन पर्वानिमित्त हिंदु जनजागृती समिती आणि सनातन संस्थेच्या वतीने गुरुवारी शहरात ३१ ठिकाणी सामूहिक गुढी पूजनाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण पूरक पध्दतीने हा सण साजरा करण्याचा संकल्प आणि संदेश देण्यात आला.

मेहरूण भागातील श्रीराम मंदिर येथे परिसरातील ५० हुन अधिक नागरिक उपस्थित होते. तसेच शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नगर, म्हाडा कॉलनी, मेहरूण येथे दोन ठिकाणी, चौगुले प्लॉट, शिरसोली प्र ण, यशनगर पिंप्राळा, सम्राट कॉलनी, लक्ष्मी नगर, श्रीराम नगर रामेश्वर कॉलनी, व्यंकटेश नगर, देविदास कॉलनी, रवंजे बुद्रुक, रवंजे खुर्द, महादेव मंदिर विखरण, मधली गल्ली विखरण, खर्ची खुर्द, खर्ची बुद्रुक पथराड, फुलपाट यावल, डोंगरकठोरा ओंकारेश्वर मंदिर चोपडा यासह पाळधी, आव्हानी, नांद्रा या ठिकाणी सामूहिक गुढी पूजनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ५०० हुन अधिक धर्माभिमानी नागरिक उपस्थित होते,अशी माहिती हिंदु जनजागृती समितीचे उत्तर महाराष्ट्र संघटक प्रशांत जुवेकर यांनी दिली.





## किमती घसरविणाऱ्या व्यापाऱ्यांच्या 'लॉबी'वर नियंत्रण आणणार

### शेतकरी अन् समस्यांविषयी चर्चा संवादादरम्यान केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचा इशारा

**जळगाव :** शेतकऱ्यांना खते वा अन्य लाभांच्या योजनांसाठी सबसिडी देण्यासाठी निर्णय झाला असेल तर त्यांची अंमलबजावणी पूर्ण करीत शेतकऱ्यांना लाभ मिळालाच पाहिजे अशा स्पष्ट शब्दात प्रशासन अधिकाऱ्यांना सूचनावजा आदेश देत, गडबड धोकाधडी घोटाळा करणाऱ्या तसेच शेतमाल केळी पिकांच्या अचानक किमती घसरवणाऱ्या व्यापाऱ्यांच्या लॉबीला सोडणार नसल्याचा स्पष्ट इशारा केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दिला.



कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे शेतकरी, केळी उत्पादक, गट समूह शेतीसंस्थांचे पदाधिकारी आदींसमवेत केळी उत्पादन व त्यांसदर्भात येत असलेल्या समस्यांविषयी चर्चा केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी केली. केंद्रीय मंत्री चौहान हे आज जळगाव जिल्हा दौऱ्यावर आले असता त्यांनी जैन इरिगेशन सिस्टीम्स, तसेच कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे यावेळी केळी उत्पादक शेतकरी व त्यांच्या समस्याविषयी चर्चा संवाद कार्यक्रमादरम्यान ते बोलत होते. ते म्हणाले कि, कोणताही व्यापारी परस्पर ठरवून शेतकऱ्यांच्या नुकसानीस कारणीभूत ठरणाऱ्या व्यापाऱ्यांच्या लॉबी संदर्भात सक्षम अशी विशिष्ट यंत्रणा उभारण्यात येवून त्या माध्यमातून योग्य ती कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले.

**शालेय पोषण आहारात केळीचा समावेश करा**

जळगाव जिल्हा केळी उत्पादनात तसेच निर्यातक्षम केळी उत्पादनात अग्रेसर आहे. दोन वर्षापूर्वी तत्कालीन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केळी क्लस्टर संदर्भात तसेच कोल्ड स्टोरेजसह शेतकऱ्यांच्या केळी उत्पादनाला योग्य दर मिळण्यासंदर्भात चर्चा करीत बनाना हब प्रकल्पाला चालना देण्यात येत असल्याचे सांगीतले होते. यावेळी केळी उत्पादक शेतकरी तसेच गट शेती समूह संस्थांनी केळीवरील रोगांवर उपाययोजना, केळी पीक विमा, शालेय पोषण आहारात केळीचा समावेश, केळी महामंडळाची स्थापनेसंदर्भासह कोल्ड स्टोरेज, केळी उत्पादना हमीभाव, दररोजच्या केळी क्विंटल दराबाबत व्यापाऱ्यांच्या विशिष्ट लॉबीवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात आदी मागण्यांसंदर्भात केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडे समस्या मांडल्या.

**बनावट बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे आर्थीक नुकसान**

दरम्यान, कृषी विभागाकडून मान्सूनपूर्व काळात वेळेवर कपाशी वाणाचे बियाणे उपलब्ध होत असले तरी त्यात बऱ्याच वेळा नित्कृष्ट दर्जाचे वा बनावट तसेच उगवण क्षमता कमी असलेले बियाणे मिळत असल्याने शेतकऱ्यांची फसवणूक होवून आर्थीक नुकसान होत असल्याची तक्रार एका शेतकऱ्यांने मांडली.

या शेतकरी संवाद चर्चेदरम्यान केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी कार्यक्रमाची औपचारिकता बाजूला ठेवत स्वतः हातात माईक घेत शेतकऱ्यांशी थेट चर्चा केली. यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या समस्यांचा पाढाच वाचला. विशेष म्हणजे, जिल्ह्यात बनावट केळी पिक विमा प्रकरणावरून प्रशासनाच्या कारवाईवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करीत ही कारवाई म्हणजे केळी पिक विमा बंद करण्याचं षडयंत्र आहे,' असा आरोप केंद्रीय कृषिमंत्र्यांसमोर करण्यात आला.

**कृषी समस्या निवारणाविषयी लवकरच तोडगा**

दरम्यान याबाबत कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेत केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या तसेच कृषी विषयक समस्या निवारणाविषयी लवकरच तोडगा काढण्यात येईल असे असल्याचे आश्वासन देत मंत्री आहे परंतु मी राजा नसून शेतकऱ्यांची पूजा ही परमेश्वरापेक्षा कमी नाही असे मी मानतो. त्यामुळे यासंदर्भात मंत्रालयात संबधीत अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून योग्य ते धोरण ठरवण्यात येईल आणि ते धोरण हे शेतकऱ्यांच्या हिताचेच राहणार असल्याची ग्वाही केंद्रीय मंत्री चौहान यांनी यावेळी दिली.

**केळी क्लस्टरची महत्त्वाची भूमिका**

ते म्हणाले कि, केळीसाठीच २०० कोटी रुपयांच्या निधीतून क्लिक लिस्ट मंजूर झाले असून ते मिळणार असल्याची मंत्र्यांनी माहिती दिली आहे. जळगाव जिल्ह्यात पाच कोटी केळीचे प्लांट क्लस्टर मध्ये तयार होतील, अशा पद्धतीने त्यांची रचना केली जाईल. तसेच केळी पीकावरील रोग नियंत्रणासाठी संशोधकांचे स्वतंत्र पथक तयार करण्यात येईल. त्यासाठी स्वतंत्रपणे काम करण्यात येत असून केळीवर वेगवेगळे प्रक्रिया उद्योग निर्माण करण्यासाठी देखील क्लस्टरची महत्त्वाची भूमिका राहणार असल्याचे त्यांनी सांगीतले.

**शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्याविषयी प्रयत्नशील**

केंद्रीय मंत्री आज जळगावच्या दौऱ्यावर आले असताना जिल्ह्यातील शेतकऱ्यांशी त्यांच्या समस्यांविषयी चर्चा करावी, हा निर्णय घेत आपल्यासोबत चर्चा केली व सर्वप्रथम तुमच्या अडीअडचणी व समस्या जाणून घेतल्या आहेत. त्यापैकी काही गोष्टी सोडवण्यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करेन अशी ग्वाही देत शेतकरी हितासंदर्भातले निर्णय घेण्यासाठी सर्वतोपरी शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्याविषयी प्रयत्नशील असल्याचे सांगत मंत्री चौहान यांनी शेतकऱ्यांशी संवादादरम्यान मराठी भाषेतून सर्व प्रथम उपस्थित शेतकरी बांधवानां गुढीपाडव्याच्या शुभेच्छा यावेळी दिल्या.

### केळी पीकविमा बंद करण्याचे षड्यंत्र; शेतकऱ्यांचा गंभीर आरोप

जिल्ह्यात गेल्या दोनतीन महिन्यापासून बनावट केळी पिक विमा प्रकरण उद्भवले असून त्यासंदर्भात बनावट नोंद केलेल्या बोगस शेतकऱ्यांसोबतच रितसर पीक विमा उतरविलेल्या शेतकऱ्यांना देखील याचा फटका बसत असून प्रशासनाकडून करण्यात येत असलेली कारवाई हे केळी पिक विमा बंद करण्याचं षडयंत्र असल्याचा आरोप केळी उत्पादक शेतकऱ्यांनी केला. यंदा मान्सूनदरम्यान हवामान आधारीत पिक विमा अंबिया बहार अंतर्गत बऱ्याच केळी फळ पीक विमा शेतकरी हिस्सा रकमेचा भरणा करीत शेतकऱ्यांनी पीक विमा घेतला. परंतु २०२५-२६ दरम्यान एकाच वर्षात हजारो हेक्टर क्षेत्रावर केळी लागवड नसून बनावट केळी पिक नोंद करीत केळी पीक विमाधारक शेतकरी कृषी विभागाच्या तंत्रज्ञानातून एकाच वेळी कसे आढळले? असा प्रश्न उपस्थित करीत जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे

## थोडक्यात महत्त्वाचे...

### जळगावात रविवारी विराट हिंदू संमेलन

**जळगाव** - धर्मरक्षण, संस्कृती संवर्धन आणि राष्ट्रीय एकात्मतेचा दिवा अधिक तेजाने प्रज्वलित करण्यासाठी तसेच हिंदू जागरणाच्या कार्याला नवी उर्जा व चेतना देण्यासाठी नवीपेठ, जयकिसन वाडी वस्ती भागातील सकल हिंदू समाजाच्यावतीने रविवारी (२२ मार्च) सायंकाळी सहाला महापालिका इमारतीजवळ विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनात श्री संत नामदेव महाराज यांचे १७ वे वंशज हभप निवृत्ती माधव महाराज नामदास तसेच मुख्य वक्ते म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र कार्यवाह बाळासाहेब चौधरी हे उपस्थित राहणार आहेत. संमेलनापूर्वी शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. गोलाणी मार्केट परिसरातील दक्षिणमुखी हनुमान मंदिर येथून या शोभायात्रेला सुरुवात होणार आहे. शोभायात्रेसह विराट हिंदू संमेलनास सहकुटूंब उपस्थित राहावे, असे आवाहन स्वागत कमिटी अध्यक्ष दिलीप गांधी, विजय मोघे यांनी केले आहे.

### गव्हाचे उभे पीक आगीत खाक; शेतकऱ्याचे अडीच लाखांचे नुकसान

**जळगाव** : चोरगाव (ता.धरणगाव) शिवारातील सर्व्हे नं.१५०/२ व १५१/२ मधील शेतातील महावितरणच्या पोलवर अवैधरित्या टाकलेल्या आकोड्यांमुळे स्पार्किंग होऊन काढणीला आलेल्या चार बिघे क्षेत्रावरील गहू जळून खाक झाल्याची घटना १५ मार्च रोजी दुपारी २ वाजता घडली. यात सुमारे शेतकऱ्याचे अडीच लाखाचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. पिंप्राळा येथील शेतकरी विजय श्रीराम महल्ले यांचे चोरगाव शिवारात शेत असून त्यांनी चार बिघे क्षेत्रावर गव्हाची लागवड केली आहे. दरम्यान, शेतातील महावितरणच्या पोलवरून देण्यात आलेल्या कनेक्शनमध्ये स्पार्कींग होवून गव्हाला आग लागली. गेल्या ७ वर्षापासून या पोलवरून महावितरणच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी बेकायदेशीर वीज कनेक्शन दिलेले आहेत. त्यामुळे १५ मार्च रोजी दुपारी २ वाजता ही आग लागून लाखोचे नुकसान झाले आहे. महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिलेल्या अवैध वीज कनेक्शनमुळेच ही आग लागली असल्याचा आरोप शेतकरी विजय महल्ले यांनी केला आहे. चार बिघे गहू जळून खाक झाल्याने महल्ले हवालदिल झाले असून महावितरणकडून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, चोरगाव येथील तलाठयांनी या घटनेचा पंचनामा केला. मागील वर्षी देखील अशीच घटना घडली होती. यात ५० ते ६० हजाराचा कडबा जळून खाक झाल्याचेही शेतकरी महल्ले यांनी सांगितले.

### क्रिकेटच्या जुन्या वादातून हाणामारी; बाप-लेकावर बॅटने हल्ला

**भुसावळ** : क्रिकेट खेळण्याच्या जुन्या वादातून एकाच कुटुंबातील तिघांनी बाप-लेकावर बॅटने तसेच हातातील कड्याने हल्ला केल्याची घटना १४ मार्च रोजी सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास लक्ष्मीनगर परिसरात घडली. याप्रकरणी सोमवारी (दि.१६) भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गोपाळ रवींद्र बारी (वय-४०) हे आपल्या कुटुंबियांसह वांजोळा रोडवरील लक्ष्मीनगर येथे वास्तव्यास आहेत. त्यांच्या मुलगा ध्रुव आणि संशयित यांच्यात काही दिवसांपूर्वी क्रिकेट खेळण्यावरून वाद झाला होता. याच जुन्या वादाचा राग मनात ठेवून संशयितांनी बारी यांच्या घरासमोर येत गोंधळ घातला. यावेळी उमेश विकास धनगर, ओम विकास धनगर आणि रंजना विकास धनगर यांनी गोपाळ बारी, त्यांचा मुलगा ध्रुव आणि वडील रवींद्र बारी यांना शिवीगाळ करत मारहाण केली. यावेळी त्यांनी क्रिकेटची बॅट आणि हातातील कड्याचा वापर करून मारहाण केल्याने यात तिघे जखमी झाले. यावेळी त्यांनी मुलाला जीवे मारण्याची धमकी देत परिसरात दहशत निर्माण केल्याचे, फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी गोपाळ बारी यांनी दिलेल्या तक्रारीवरून तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील हवालदार जितेंद्र पाटील तपास करीत आहेत.

### देवेंद्रनगरात बंद घर फोडत ६६ हजारांची चोरी

**जळगाव** : शहराचा उच्चभ्रू भाग समजल्या जाणाऱ्या देवेंद्र नगर परिसरातील 'प्रभुस्पर्श' अपार्टमेंटमधील एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे ६६ हजार ७५० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले आहेत. या प्रकरणी रामानंद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, प्रीतम प्रल्हाद साळुंखे (वय ४०) हे व्यवसायाने इन्शुरन्स एजंट असून ते कुटुंबासह देवेंद्र नगर भागात राहतात. १६ मार्च रोजी साळुंखे हे घराला कुलूप लावून काही कामानिमित्त बाहेर गेले होते. दुपारच्या सुमारास चोरट्यांनी संधी साधली. अज्ञात चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजाचा कडी-कोंडा आणि कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि कपाटातील दागिन्यांवर डल्ला मारला. चोरट्यांनी कपाटातून सोन्याचे दागिने, सोन्याची चैन आणि सोन्याच्या वाट्या असे एकुण ६६ हजार ७५० रूपयांचा ऐवज चोरून नेला. हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी रामानंद नगर पोलीस ठाण्यात धाव घेवून तक्रार दिली. त्यानुसार पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार सुशील चौधरी तपास करीत आहेत.

### श्री संत ज्ञानेश्वर विद्यालयात उभारली चिऊताईच्या संवर्धनासाठी गुढी

**जळगाव** : श्री संत ज्ञानेश्वर विद्यालयाच्या प्राथमिक विभागातर्फे गुढीपाडव्यानिमित्त चिमणी वाचवा, निसर्ग वाचवाचा संदेश देणारी चिमणी संवर्धनाची गुढी उभारण्यात आली. पर्यावरणातील पशु-पक्षी, प्राणी, वनस्पती आदीचे संरक्षण व संवर्धन झाले पाहिजे, यासाठी इको क्लब प्रयत्नशील आहे. उपक्रमांतर्गत चिमणी संवर्धनासाठी मार्गदर्शन करुन टाकाऊपासून टिकाऊ घरटी बनवून त्या घरट्यांचे वाटप केले जाते. चिमणी बचावसाठी विद्यार्थ्यांनी घेतलेला पुढाकार निश्चितच चिमण्यांची संख्या वाढीसाठी पोषक ठरेल, असा विश्वास मुख्याध्यापक मुकेश नाईक यांनी व्यक्त केला.

### गुरांसाठी १५० जलकुंड, पक्ष्यांसाठी होणार ५० परळ वाटप

**जळगाव** : उन्हाळ्याची तीव्रता वाढली असून तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. या कडक उन्हामुळे मोकाट जनावरे, पशू आणि पक्ष्यांना पाण्याअभावी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील सामाजिक कार्यकर्ते तथा व्यावसायिक रमेशकुमार मुनोत यांनी भूतदयेच्या भावनेतून जलकुंड आणि परळ मोफत वाटपाचा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत शहरात १५० जलकुंड आणि ५० परळ वितरित करण्यात येणार आहेत. नागरिकांनी हे जलकुंड सावलीच्या ठिकाणी ठेवून जनावरांना पाण्याची सोय करून द्यावी, असे आवाहन मुनोत यांनी केले आहे. विशेष म्हणजे, ज्यांच्याकडे सावलीची जागा उपलब्ध नाही त्यांच्यासाठी बॅनरची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. समाजसेवेचा हा उपक्रम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावा यासाठी, इच्छुक नागरिकांनी जलकुंड किंवा परळ मिळवण्यासाठी उद्यापासून ९३२५९२२३०५ या क्रमांकावर संपर्क साधून अगोदर नोंदणी करावी, असे आवाहनही रमेशकुमार मुनोत यांनी केले आहे. सोमवार, दि.२३ पासून शाहू नगरातील ओम साई रिअल इस्टेट कन्सल्टन्स याठिकाणी या जलकुंड आणि परळचे वाटप केले जाणार आहे.

### अमराठींना 'केसीई' शिकवणार मराठी

**जळगाव** : खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीच्या अब्दुल कलाम स्किल डेव्हलपमेंट सेंटर अंतर्गत अमराठी भाषिकांना मराठी शिकता यावी यासाठी एक महिन्याचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. ऑनलाईन पद्धतीने हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविला जाणार असून मूळजी जेठा महाविद्यालयातील मराठी विभागाच्यावतीने या अभ्यासक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. मराठी भाषेतील लेखन आणि संभाषण कौशल्ये या प्रमाणपत्र अभ्यासक्रमात शिकविली जाणार आहेत. स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करणाऱ्यांसाठीदेखील हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरणार आहे. या अभ्यासक्रमाचे शुल्क ५०० रुपये असून या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी रविवार, दि.२२ पर्यंत मू.जे. महाविद्यालयाच्या मराठी विभागातील डॉ.योगेश महाले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आशा स्वयंसेविकांना तुटपुंजे मानधन; सवलती पुरेशा नाहीत

## अडावद शासकीय रुग्णालयाच्या बैठकीत उमटला सूर

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ मार्च**



आशा सेविकांना सेवा पुरवितांना अनेक अडीअडचणींना सामोरे जावे लागते.तुटपुंज्या मानधनावर त्यांना दिवसरात्र काम करावे लागत आहे. शासनाकडून शासकीय सवलती पुरेश्या दिल्या जात नाहीत,असा सुर भारतीय अंगणवाडी शिक्षिका-आशा स्वयंसेविका कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी लावला. न्याय हक्काच्या मागणीसाठी अडावद (ता.चोपडा) येथे शासकीय वैद्यकीय रुग्णालयात प्रमुख मागण्यासाठी चर्चा बैठक गुरुवारी (१८ मार्च) दुपारी पाच वाजता पार पडली. त्यात विविध प्रश्न मांडण्यात आले.

संघटनेच्या जिल्हा अध्यक्ष स्नेहा सोनवणे, सचिव वंदना पाटील, तालुका अध्यक्ष आशा अनिल सपकाळे यांनी शासकीय वैद्यकीय अधिकारी डॉ.पवन सुशिल तसेच सेविका गटप्रवर्तक संध्या दीपक बोरसे, आशा स्वयंसेविका शारदा विनायक महाजन, प्रतिभा नेरकर तसेच सर्व आशा स्वयंसेविका याप्रसंगी उपस्थित होते.

चोपडा अडावद येथील आशा सेविकांच्या मागण्यांचे निवेदन शासनाकडे पाठवून संबंधित अधिकारी यांना देण्यात आले. या मागण्यांच्या पूर्तीसाठी संघटनेच्या माध्यमातून पाठपुरावा केला जाईल,अशी ग्वाही संघटनेच्या जिल्हाध्यक्ष स्नेहा सोनवणे यांनी याबैठकीतून दिली.

### अशा आहेत मागण्या

आशा सेविकांना शासनाकडून ऑनलाईन ट्रेनिंग देण्यात यावे. ट्रेनिंग देताना डाटा मराठीतून असावा, ट्रॅव्हल अॅलाउन्स (टीए) देण्यात यावा, पेन्शन योजना लागू व्हावी, आशा स्वयं सेविकाच्या मुला-मुलींसाठी शासकिय शिक्षणाचा खर्च शासनाने करावा अथवा सवलत द्यावी, दिवाळी बोनस मिळावा, बीपीएल व एपीएल च्या सर्वांना सरसकट लाभ मिळावा,महिन्यातून शासकीय रविवार सुट्टी मिळावी, स्वत: आशा सेविकांसाठी मेडिकल खर्च शासनाकडून मिळावा इत्यादी मागण्या यावेळी मांडण्यात आल्या.

# लोकचित्रकलेचा प्रचार आवश्यक : दीपमाला काळे

## पु. ना. गाडगीळ अॅण्ड सन्सच्या कलादालनात वारली चित्रप्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ मार्च**



लोक चित्रकला आणि चित्रकला या कला शालेय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांची कला वृद्धिंगत होण्यास मदत होईल. या कलेचा प्रचार आणि प्रसार होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन महापौर दीपमाला काळे यांनी केले.

जिल्ह्यातील भुसावळ शहरातील चित्रकार रमाकांत भालेराव यांच्या वारली चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन जळगाव येथील पु. ना. गाडगीळ अँड सन्सच्या कलादालनामध्ये १६ मार्चपासून भरविण्यात आले आहे. प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. या वेळी प्रसिद्ध रंगकर्मी शंभू पाटील, भारत विकास परिषदेचे देवगिरी प्रांताचे संपर्क सचिव योगेश मांडे, कोठारी क्लासेसचे बिपिन शाह व पी.एन. गाडगीळ अँड सन्सचे व्यवस्थापक गिरीश डेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी शंभू पाटील यांनी वारली चित्रकला शैलीबद्दल वक्तव्य केले. यात काळानुरूप वारली चित्रकलेची शैली कशी बदलत आहे यावर त्यांनी प्रकाश टाकला. मान्यवरांनी प्रदर्शन पाहिल्यानंतर चित्रकार रमाकांत भालेराव यांचे कौतुक केले. राजेश्री देशमुख यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

या वेळी भुसावळ येथील रंगकर्मी आणि चित्रकार अनिल कोष्टी, नृत्यशिक्षिका चारू भालेराव, संपदा भुरे, सन्मुख चोरडिया आदी रसिक उपस्थित होते. प्रदर्शन ३० मार्चपर्यंत बुधवार वगळता सकाळी साडेदहा ते रात्री आठपर्यंत रोज खुले राहणार आहे. शहरातील रसिक प्रेक्षकांनी याचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन चित्रकार रमाकांत भालेराव यांनी केले आहे.

# रोटरी क्लबतर्फे वर्धिष्णू संस्थेला लॅपटॉप भेट

## आनंदघरातील मुलांना हायजीन किटचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ मार्च**



रोटरी क्लब जळगावतर्फे समाजोपयोगी उपक्रमांतर्गत वर्धिष्णू या स्वयंसेवी संस्थेला कार्यालयीन कामकाज सुलभ व्हावे यासाठी लॅपटॉप भेट देण्यात आला. लॅपटॉपचा उपयोग संस्थेच्या नियोजन, अहवाल तयार करणे व आर्थिक हिशेब मांडणीसाठी होणार आहे.

याच उपक्रमांतर्गत शहरातील तंट्या भिल वस्तीतील आनंदघरातील विद्यार्थ्यांना हायजीन किटचे वितरण करण्यात आले. या किटमध्ये टूथब्रश, टूथपेस्ट यांसह पौष्टिक आहार म्हणून राजगिरा लाडू व चिक्कीचा समावेश होता. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच त्यांच्या आरोग्याचीही काळजी घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान वर्धिष्णू संस्थेच्या प्रणाली सिसोदिया यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. रोटरी क्लबचे अध्यक्ष गिरीश कुळकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षण, शिस्त व स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी माजी अध्यक्ष संदीप शर्मा, कॅप्टन मोहन कुलकर्णी, तसेच चंदन महाजन, योगेश गांधी, डॉ. शुभदा कुलकर्णी, सुबोध सराफ, संवाद सचिव पंकज व्यवहारे उपस्थित होते.

उल्लेखनीय बाब म्हणजे, रोटरी क्लब जळगावने यापूर्वीही समतानगर परिसरातील आनंदघरातील विद्यार्थ्यांसाठी संगणक भेट देऊन त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लावला आहे. हा उपक्रम रोटरीच्या 'मूलभूत शिक्षण व साक्षरता' आणि 'समुदाय विकास' या प्रमुख क्षेत्रांना पूरक ठरत आहे.

# संघटनात्मक कार्यातून कर्मचाऱ्यांच्या समस्यांची उकल : अशोक डहाळे

**जळगाव** : कर्मचारी हा प्रशासनाचा अत्यंतिक महत्त्वाचा घटक असून त्याला असणाऱ्या समस्यांची उकल संघटनात्मक कार्यातून होत असते. संघटन कौशल्य नेतृत्वासाठी अत्यंत महत्त्वाचे असते आणि त्यासाठी जळगाव जिल्हा सतत कर्मचाऱ्यांच्या समस्या निवारण्यासाठी अग्रेसर असल्याचे मत जय महाराष्ट्र शासकीय, निमशासकीय अधिकारी-कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष अशोक डहाळे यांनी व्यक्त केले.

जय महाराष्ट्र शासकीय, निमशासकीय अधिकारी-कर्मचारी संघटनेची बैठक नुकतीच पार पडली. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी नितीन पाटील, प्रमोद काळे, पुरुषोत्तम पाटील, पंकज पाचपोळ, किरण लाडवंजारी, गणेश पाटील, नयन गोहिल, सचिन विसपुते, संजय कोळी, अनिल चौधरी, जयवंत सावंते, विवेक अत्तरदे यांच्यासह मेडिकल कॉलेज कर्मचारी, पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद कर्मचारी, लिपिक वर्गीय कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी संघटनेचे पालक अध्यक्ष आर. टी. सोनवणे यांनी, काही दिवसांपूर्वी लिपिकवर्गीय जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या झालेल्या आंदोलनाने त्यांच्या समस्या शासनस्तरावर मांडल्या गेल्या. संघटनेच्या दृष्टिकोनातून ही बाब महत्त्वपूर्ण असून, जिल्हा परिषदेच्या लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांनी दाखविलेल्या एकजुटीमुळेच आंदोलन यशस्वी होऊ शकल्याचे सांगितले.







# क्रीडा क्षेत्राकडे करिअर म्हणून बघा : डॉ. दिनेश पाटील

## डॉ. बेंडाळे महिला महाविद्यालयात खेळाडू गौरव सोहळा उत्साहात

**जळगाव, १९ मार्च**

खेळाडूंनी आपल्या आवडीच्या खेळाकडे वळून त्यात अचूक मार्गदर्शन, सरावात सातत्य ठेवणे, तसेच जीवनातील प्रत्येक अपयश पचवण्याची क्षमता ज्यांच्या अंगी असेल, तो कधीही स्पर्धेत अपयशी होत नाही. क्रीडा क्षेत्रात करिअर म्हणून बघा, असे मत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील यांनी मांडले.

शहरातील डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयात खेळाडू गौरव सोहळा उत्साहात झाला, त्या वेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. के. नारखेडे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय योगा अथलेट्स डॉ. शरयू विसपुते उपस्थित होत्या. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. पी. एन. तायडे, उपप्राचार्य डॉ. सत्यजित साळवे, आयक्यूएसीच्या समन्वयक प्रा. डॉ. स्मिता चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. एन. जी. बावस्कर, मलाबार गोल्ड अँड डायमंड जळगाव शाखेच्या प्रियंका पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. क्रीडा संचालिका डॉ. अनिता कोल्हे यांनी प्रास्ताविकात, जिमखाना विभागाची गौरवशाली परंपरा व आयोजनाची भूमिका मांडली. डॉ. शरयू विसपुते यांनी महाविद्यालयाच्या खेळाडूंशी हितगुज साधताना सांगितले की, कितीही अपयश आले तरी खचू नका, यश मिळेपर्यंत थांबू नका, क्रीडा क्षेत्रात नावलौकिक मिळविण्यासाठी अथक परिश्रम आणि मार्गदर्शन आवश्यक असून, आलेल्या संधीचे सोने करा व उत्तम आरोग्यासाठी योगसाधना करा, असा विचार मांडला.

प्राचार्य डॉ. आर. के. नारखेडे यांनी खेळाडूंचा फिटनेस, सराव, मानसिकता व शैक्षणिक गुणवत्ता, तसेच महाविद्यालयात खेळाडूंसाठी आणखी नवनवीन उपक्रम राबवून उत्तम दर्जाचे खेळाडू तयार केले जातील, असे मत मांडून खेळाडूंचे मिळविलेल्या यशाबद्दल कौतुक केले.

याप्रसंगी वरिष्ठ विभागाची जनरल चॅम्पियनशिप नम्रता देविदास आस्वार (तृतीय वर्ष कला) व कनिष्ठ महाविद्यालयाची जनरल चॅम्पियनशिप निकिता दिलीप पवार (बारावी विज्ञान) हिला देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात राष्ट्रीय, राज्यस्तर, विद्यापीठ स्तरावरील विविध खेळांमध्ये विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते पदक, सन्मानचिन्ह व रोख पारितोषिके देऊन गौरवण्यात आले, तसेच खेळाडू पालकांना मलाबार गोल्डकडून भेटवस्तू देण्यात आली. प्रा. दीपक पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. छाया चिरमाडे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी संजय सुरवाडे, भावेश तायडे यांनी सहकार्य केले.

# 'क्रीडासृष्टीमध्ये भारतीय सृष्टी' राज्यस्तरीय परिषद

## १२० क्रीडाशिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग; विविध विषयांवर चर्चामंथन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ मार्च**



पीएम उषाअंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भारतीय मानव्य प्राच्यविद्या अध्ययन केंद्र, कला व मानवविद्या प्रशाळा यांच्यातर्फे व नॉलेज पार्टनर क्रीडा भारती (जळगाव)च्या सहकार्याने बुधवारी (१८ मार्च) 'क्रीडासृष्टीमध्ये भारतीय सृष्टी' राज्यस्तरीय परिषद घेण्यात आली. राज्यस्तरीय परिषदेसाठी १२० क्रीडाशिक्षक सहभागी झाले होते.

परिषदेचे उद्घाटन पुणे येथील क्रीडा भारतीचे अखिल भारतीय महामंत्री केशव (राज) चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी होते. विचारमंचावर प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र नन्नवरे, जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, छत्रपती संभाजीनगर येथील क्रीडा प्रशासक पंकज भारसाखळे, संचालक प्रा. राम भावसार उपस्थित होते. कार्यशाळेत हे आहेत.

याप्रसंगी केशव (राज) चौधरी यांनी बीज भाषणात, भारतात अनेक खेळांचा जन्म झाला असून, भारतीय शिक्षणांमध्ये विविध खेळांची दृष्टी दिसते, भारतात प्राचीन काळांपासून छोट्या-छोट्या खेळातून शैक्षणिक मूल्ये जोपासली जात आहेत. आपल्या हातात येईल त्या साधनाने खेळणे ही भारतीय संस्कृती आहे. लेझीम, तलवारबाजी, मलखांब, कबड्डी, विट्टी-दांडू, मातीतील कुस्ती आदी खेळांमधून बुद्धी आणि शक्तीचा विकास होतोच, तसेच त्यातून आपण शैक्षणिक प्रगतीही साधू शकतो. नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत शारीरिक शिक्षण व खेळ, संतुलित आहार, क्रीडा, शासनाच्या योजना तसेच खेळातून रोजगाराच्या संधी यांची माहिती दिली.

कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अभ्यासक्रमासोबतच सहअभ्यासक्रम आणि अभ्यासक्रमेत्तर उपक्रमांना महत्त्व दिले गेले आहे. त्यामध्ये खेळासोबत शिक्षण घेणाऱ्याला क्रेडिट गुण दिले जातात. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला जर विकसित करावयाचे असेल, तर क्रीडा क्षेत्रात नैपुण्यता महत्त्वाची आहे. भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्व भारतीय खेळातील क्रीडाप्रकारात जाणवते. यात कौशल्य, सहनशक्ती व ताकद या तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. आजच्या आधुनिक युगात क्रीडाप्रकारांमध्ये नवतंत्रज्ञानाचा उपयोग आणि मानसिक आरोग्य याला महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यापीठ क्रीडा विकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना राबवीत आहे, असेही त्यांनी सांगितले. सुरुवातीला क्रीडा प्रशासक पंकज भारसाखळे यांनी सांगितले की, 'क्रीडा से निर्माण चरित्र का, चरित्र से निर्माण राष्ट्र का' यानुसार क्रीडा धोरणांची वाटचाल सुरू आहे. क्रीडासारख्या विषयावर होत असलेल्या या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन या विद्यापीठात होत आहे ही आनंदाची बाब आहे.

राजेंद्र नन्नवरे यांनी प्रास्ताविकात, भारतात खेळाचे महत्त्व फक्त मनोरंजन म्हणून नाही तर ती आपली जीवनशैली आहे. भारतीयांचा खेळांकडे बघण्याचा दृष्टिकोन रचनात्मक राहिला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षणाबरोबर खेळाला महत्त्व प्राप्त झाले आहे. दीपाली माळी व खेमराज पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. शरद पाटील यांनी आभार मानले.

### क्रीडाप्रकारांच्या विविध विषयांवर व्याख्याने

दरम्यान, उद्घाटन सत्रानंतर 'क्रीडाविकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजना व खेळातून रोजगाराच्या संधी' या विषयावर जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांचे व्याख्यान झाले. संभाजीनगर येथील डॉ. दयानंद कांबळे यांचे 'भारतीय पारंपरिक आहार व आधुनिक पोषणशास्त्र' तसेच अमृत बिऱ्हाडे यांचे 'क्रीडा धोरणे व भारतीय क्रीडासृष्टीचा विकास' यावर व्याख्याने झाली. या वेळी क्रीडा भारतीचे जिल्हामंत्री प्रशांत जगताप, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील डॉ. संजय चौधरी, जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. सुरेश थरकुडे उपस्थित होते.






### देवा सपकाळेचा कुलगुरूंच्या हस्ते गौरव

**जळगाव** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा विद्यार्थी देवा सपकाळे याने चेन्नई येथील सत्यभामा विद्यापीठात आयोजित ३९ व्या आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवात फाइन आर्ट (क्ले मॉडेलिंग) प्रकारात रौप्यपदक पटकावले. या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी त्याचा गौरव केला.

देशभरातील विविध विद्यापीठांमधून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वातावरणात देवा सपकाळे याने सृजनशीलतेचा आणि कलात्मकतेचा ठसा उमटवला. सातत्यपूर्ण सराव आणि मेहनतीच्या जोरावर त्याने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदक मिळवले.

कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांचा गौरव केला. प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, सदस्य नितीन झाल्टे तसेच विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी यांनीही देवा सपकाळे याचा गौरव केला. संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. डॉ. संजय शिंगाणे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली

### विद्यापीठात लिन्टा चौधरींचे 'हठयोग'वर व्याख्यान

**जळगाव** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्राध्यापक प्रबोधिनी कार्यक्रमांतर्गत विद्यापीठाच्या योगा विभागातील लिन्टा चौधरी यांचे 'हठयोग' या विषयावर व्याख्यान झाले. प्रशाळेचे संचालक डॉ. म. सु. पगारे अध्यक्षस्थानी होते. लिन्टा चौधरी यांनी, आसन, प्राणायाम, मुद्रा अशा विविध माध्यमातून शरीरातील पंचेंद्रिये आणि ज्ञानेंद्रियांची शुद्धी होण्यासाठी हठयोग केला जातो. यासोबतच शरीराची शुद्धी करण्यासाठी षटकर्मही हठयोगात येतात, असे सांगितले. प्रा. म. सु. पगारे यांनी, मनाच्या एकाग्रतेसाठी योग आवश्यक असून, त्यामुळे स्वतःच्या शरीराच्या निरोगीपणाकडे लक्ष दिल्याने मन आणि शरीर निरोगी असेल तरच कामाच्या ठिकाणी कर्तव्य करत असताना कोणतेही कार्य व्यवस्थितपणे करता येते, असे सांगितले. याप्रसंगी प्रशाळेतील प्राध्यापकांनी हठयोग या विषयावर चर्चेत सहभाग घेतला. डॉ. दीपक खरात, डॉ. भारती सोनवणे, प्रा. डॉ. सुदर्शन भवरे, कृष्णा संदानशिव, प्रतिभा गलवाडे, प्रा. डॉ. प्रीती सोनी, खेमराज पाटील, महेश सूर्यवंशी, नेहा लाम्हणे, प्रीती मनुचारी, पल्लवी बारी, सुकन्या जाधव, चंद्रकांत बिऱ्हाडे आदी उपस्थित होते. सहाय्यक प्रा. प्रतिभा गलवाडे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### वडील आमदार डॉ. गावितांच्या प्रकृतीत सुधारणेसाठी डॉ. हिना गावित यांच्याकडून शनिदेवाला साकडे

**नंदुरबार :** माजी मंत्री तथा आमदार डॉ. विजयकुमार गावित यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी भाजपच्या माजी खासदार डॉ. हिना गावित यांनी शनिदेवाच्या चरणी प्रार्थना करत साकडे घातले. दोन महिन्यांपूर्वी आमदार डॉ. गावित यांची तब्येत हृदयविकारामळे बिघडली होती. तेव्हापासून मुंबई येथील रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. आता प्रकृतीत सुधारणा होत असून, सर्व प्रकारच्या उपचारांना उत्तम प्रतिसाद देत असल्याचे गावित परिवाराकडून सांगण्यात आले. त्यांची कन्या व माजी खासदार डॉ हिना गावित यांनी बुधवारी (१८ मार्च) तालुक्यातील शनिमंडळ येथील प्रसिद्ध देवस्थान श्री शनिदेवाच्या मंदिरात विधिवत पूजन करीत, आमदार डॉ. गावित यांच्या उत्तम आरोग्यासाठी श्री शनिदेवाच्या चरणी साकडे घातले. पुजारी पांढारकर गुरुजी यांनी मंत्रोच्चार केले. याप्रसंगी शनी महाराज मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रवीण पाटील, जगदीश पाटील, हिम्मत पाटील, महेंद्र पाटील, भटू धनगर, महेंद्र राजपूत, चिंधू धनगर, प्रकाश भिल, विवेक पाटील आदी उपस्थित होते.



### पटेल कन्या विद्यालयात जलप्रतिज्ञा उपक्रम उत्साहात

**शिरपूर :** शहरातील एच. आर. पटेल कन्या माध्यमिक विद्यालयात जलसंवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जलमहोत्सव उपक्रम ंतर्गत आयोजित कार्यक्रमात जलप्रतिज्ञा घेण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणविस्तार अधिकारी मनीषा ठाकूर (धुळे), निवृत्त पोलीस निरीक्षक तथा आमदार अमरिशभाई पटेल पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राचे संचालक अन्साराम आगरकर, प्राचार्य एस. जे. पाटील, पर्यवेक्षक बी. बी. अग्रवाल, ज्येष्ठ शिक्षक आर. आर. रघुवंशी, दीपक चौधरी, कलाशिक्षक बी. एस. मोरे, क्रीडाशिक्षक व्ही. ई. सिसोदे, क्रीडाशिक्षिका मयुरी भामरे आदी उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते जलसंवर्धनाचे महत्त्व विद्यार्थिनींना सांगण्यात आले. पाणी ही जीवनाची मूलभूत गरज असून, त्याचा योग्य वापर व जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. यानंतर विद्यार्थिनींना जलसंवर्धन व पाणी बचतीची प्रतिज्ञा देण्यात आली. या जलप्रतिज्ञा उपक्रमात सुमारे ३०० विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग नोंदविला. विद्यार्थिनींनी पाणी वाचवण्याचा आणि जलस्रोतांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये पाणी बचतीबाबत जागरूकता निर्माण झाली असून, पर्यावरण संरक्षणासाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.



### दोंडाईचा अपर तहसील कार्यालयात ग्राहक दिन

**मालपूर (शिंदखेडा) :** दोंडाईचा येथील अपर तहसील कार्यालयात जागतिक ग्राहक दिनानिमित्त ग्राहकांच्या हक्कांविषयी जनजागृती करण्यासाठी विशेष कार्यक्रम उत्साहात झाला. प्रा. डॉ. श्रीराम महाजन अध्यक्षस्थानी होते. श्री. शास्त्री यांनी ग्राहक दिनाविषयी माहिती दिली. त्यांनी ग्राहक सुरक्षा कायदा इतिहास स्पष्ट करीत ग्राहकांनी फसवणुकीपासून कसे अलिप्त राहावे. ग्राहकाने जागृत राहिले पाहिजे, पक्के बिल घेतले पाहिजे. तोंडी विश्वासावर व्यवहार करू नये, असे मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. श्रीराम महाजन, ग्राहक पंचायतीचे सचिव सुरेश मोरे यांनी मार्गदर्शन केले. नायब तहसीलदार राजेश घोलप यांनी प्रास्ताविक केले. महिला पंचायतीच्या कार्यकर्त्या इंदिरा महाजन, स्वस्त धान्य दुकानदार, स्थानिक नागरिक उपस्थित होते.



### शासकीय सेवेतील दिव्यांगांची वैद्यकीय पडताळणीची मागणी

**धुळे :** जिल्ह्यातील शासकीय सेवेत असणाऱ्या दिव्यांगांची वैद्यकीय पडताळणी करावी, अशा मागणीचे निवेदन भाजप दिव्यांग विकास आघाडीतर्फे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख यांना देण्यात आले. त्यात म्हटले आहे की, शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेच्या विविध अस्थापनांतील शासकीय सेवेत असणाऱ्या दिव्यांगांची वैद्यकीय तपासणी करावी. यामुळे खऱ्या व खोट्या दिव्यांगांची पडताळणी होणार आहे आणि खऱ्या दिव्यांगांना न्याय मिळण्यास मदत मिळणार आहे. निवेदनाची दखल घेत लवकरच विविध अस्थापनांतील दिव्यांगांची वैद्यकीय तपासणी करण्यासंदर्भात कार्यालयीन कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याप्रसंगी भाजप दिव्यांग विकास आघाडीचे अध्यक्ष संजय सरग, अपंग पुनर्विकास संस्थेचे जिल्हाध्यक्ष कमलाकर महानोर उपस्थित होते.



### दाब आश्रमशाळेत आत्मरक्षा अभियानात प्रशिक्षण

**तळोदा :** दाब (ता. अक्कलकुवा) येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत महिला दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेतर्फे राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा अभियानांतर्गत विशेष मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. मुख्याध्यापक एस. आर. वळवी, जिल्हा समन्वयक दीपक पाठक, हेतल वसावे यांची प्रमुख उपस्थिती होती. अभियानांतर्गत मुलींना स्वसंरक्षणासाठी आवश्यक विविध प्रकारचे प्रशिक्षण, पात्र प्रशिक्षकांकडून देण्यात आले. प्रशिक्षणाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून मुलींना योगाचेही प्रशिक्षण देण्यात आले.

# सिलेंडर नोंदणी करताना तांत्रिक अडचणींमुळे धुळ्यात ग्राहक त्रस्त

## ॲपमध्ये सुधारणा करण्यासह काळा बाजार त्वरित थांबविण्याचे निर्देश द्या
## आमदार अनुप अग्रवाल यांनी मांडला विधिमंडळात औचित्याचा मुद्दा

**धुळे :** शहरातील विविध पेट्रोलियम कंपन्यांच्या गॅस सिलेंडर नोंदणी प्रक्रियेत तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या असून, ग्राहकांना सिलेंडरची नोंदणी करताना अनंत अडचणी येत आहेत. यामुळे धुळे शहरातील ग्राहक त्रस्त झाले असून, गॅस एजन्सींच्या बाहेर विनाकारण रांगा लागत आहेत. याबाबत संबंधित सर्व पेट्रोलियम कंपन्यांना त्यांच्या सिलेंडर नोंदणी ॲपसह सॉफ्टवेअरमध्ये तत्काळ सुधारणा करण्याचे तसेच गॅस सिलेंडरचा काळा बाजार रोखण्याचे शासनाने निर्देश द्यावेत, अशी मागणी आमदार अनुप अग्रवाल यांनी बुधवारी (१८ मार्च) विधिमंडळात औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली.

राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत सुरू असून, बुधवारी (१८ मार्च) आमदार अनुप अग्रवाल यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे शहरातील गॅस ग्राहकांच्या समस्यांवर सभागृहात जोरदारपणे बाजू मांडली. आमदार अग्रवाल म्हणाले, की धुळे शहरातील इंडियन ऑइल कंपनीसह अन्य कंपन्यांच्या गॅस ग्राहकांना घरगुती वापराचे सिलेंडर मिळविताना



विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. या कंपन्यांच्या गॅस सिलेंडर नोंदणीसाठीच्या ॲप व सॉफ्टवेअरमध्ये तांत्रिक अडचणी असून, ग्राहकांना नोंदणी करता येत नाहीत. अनेक ग्राहकांना सिलेंडर मिळण्यापासून वंचित राहावे लागत असून, गॅस एजीन्सीसमोर ग्राहकांच्या नाहक रांगा लागत आहेत. सिलेंडर मिळत नसल्याने अनेकदा वादाचे प्रसंग उद्‌भवत आहेत. या पार्श्वभूमीवर पेट्रोलियम कंपन्यांनी त्यांच्या सिलेंडर नोंदणी ॲपमध्ये सुधारणा करण्याबाबत शासनाने संबंधित कंपन्यांना निर्देश द्यावेत. तसेच पेट्रोलियम कंपन्यांनी नोंदणीनंतर किती दिवसांत सिलेंडर मिळेल, याबाबतचे लघुसंदेश देण्याचे निर्देश द्यावेत.

**गॅसचा काळा बाजार त्वरित थांबवा**

अमेरिका - इस्राईल- इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाला आहे. ही संधी साधत धुळे शहरात अनेकांकडून गॅस सिलेंडरचा काळा बाजार केला जात आहे. तसेच अनेक गॅसवरील वाहनधारक त्यांच्या वाहनांमध्ये अवैधपणे घरगुती गॅसचा वापर करत असल्याने या गॅस सिलेंडरच्या काळ्या बाजाराला चालना मिळत असून, ग्राहकांना वापरासाठी सिलेंडरचा तुटवडा जाणवत आहे. यामुळे घरगुती गॅस सिलेंडरचा काळा बाजार करणाऱ्या व अवैधपणे वापर करणाऱ्यांवर कारवाई करावी, तशा सूचना प्रशासनाला द्याव्यात, अशी मागणी आमदार अग्रवाल यांनी केली.

### आमदार आझमींच्या वक्तव्याचा निषेध

पुण्यातील सासवड परिसरात इफ्तारसाठी जमलेल्या मुस्लिमांवर हल्ला झाल्याचा औचित्याचा मुद्दा मांडताना समाजवादी पक्षाचे आमदार अबू असिम आझमी यांनी सांगितले, की देशात परंपरा राहिली आहे की, मशिदींमध्ये जेव्हा मुस्लिम बांधव नमाजपठण करत होते तेव्हा हिंदू भगिनी बालकांसमवेत पाणी घेऊन मशिदींबाहेर उभ्या राहत. जेणेकरून मुस्लिम बांधव मशिदीतून परतत असताना त्या पाण्यावर मुस्लिम फुंक मारतील आणि ते पाणी पिऊन हिंदू महिलांच्या मुलांचे विविध आजार बरे होतील. मात्र, सध्या छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन मुस्लिमांवर हल्ले होत आहेत. गुंडागर्दी केली जात आहेत. हे प्रकार बंद झाले पाहिजेत, अशी मागणी आझमी यांनी केली. आमदार आझमी यांच्या या वक्तव्याचा आमदार अग्रवाल यांनी जोरदार निषेध करठत सांगितले, की आझमी यांनी हिंदू भगिनींबाबत केलेले वक्तव्य भंपक आणि भ्रामक असून, असे असत्य कथन करून दिशाभूल केली जात आहे. यातून विनाकारण द्वेष पसरविला जात आहे. आमच्या कुठल्याच हिंदू भगिनी असा प्रकार करत नाहीत. आमदार आझमी यांची ही वक्तव्ये सभागृहाच्या पटलावरून तत्काळ काढून टाकावीत, तसेच त्यांनी सभागृहाची माफी मागावी, अशी मागणी आमदार अग्रवाल यांनी केली. यावर तालिका अध्यक्षांनी हे वक्तव्य तपासून ते सभागृहाच्या पटलावरून काढून टाकण्यात येईल, असे आश्वासन आमदार अग्रवाल यांना दिले.



## बुडकीच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यास आर्थिकरूपी खासगी मदत

### आमदार पावरांसह भूपेशभाई अन् चिंतनभाई पटेल यांच्या हस्ते प्रदान

**शिरपूर :** तालुक्यातील बुडकी येथील नुकसानग्रस्त शेतकरी हिंमत पावरा यांना आमदार काशिराम पावरा, प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन भूपेशभाई पटेल, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या हस्ते खासगी स्वरूपात आर्थिक मदत देण्यात आली.

बुडकी येथे हिंमत पावरा यांच्या शेतात १३ मार्च २०२६ रोजी दुपारी विजेच्या तारांमध्ये घर्षणाने ठिणग्यांनी गव्हाच्या पिकाला आग लागली. आगीत सुमारे दोन एकर गहू खाक झाला. आमदार काशिराम पावरा यांनी प्रत्यक्ष भेट देऊन नुकसानीची पाहणी करून त्यांना धीर दिला. तसेच शहहरातील 'जनक व्हिला' आमदार कार्यालयात सोमवारी (१६ मार्च) सकाळी आमदार काशिराम पावरा, प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन भूपेशभाई पटेल, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांनी खासगीस्वरूपात हिंमत पावरा यांना आर्थिक मदत दिली.

हे नुकसान वीज वितरण विभागाच्या हलगर्जीमुळे झाले आहे. वीज वितरण कंपनीने आगग्रस्त शेतकऱ्याला नुकसानभरपाई तत्काळ द्यावी म्हणून आमदार काशिराम पावरा व भूपेशभाई पटेल यांनी वीज वितरण अधिकाऱ्यांशी संपर्क साधून मदत देण्याविषयी चर्चा केली. या वेळी आमदार पावरा, भूपेशभाई पटेल साहेब, चिंतनभाई पटेल, बाजार समितीचे सभापती के. डी. पाटील, शिरपूर पीपल्स बँकेचे संचालक संजय चौधरी, शेतकरी हिंमत पावरा, मनजित पावरा, विश्वास पावरा, शिवदास पावरा आदी उपस्थित होते.

## बालनाट्य प्रशिक्षणामुळे जिल्ह्याचे नाव नाट्य क्षेत्रात उंचावेल

### संगीत दिग्दर्शक चंद्रशेखर चव्हाण : नंदुरबारमध्ये शिबिराचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १९ मार्च**

बालनाट्य प्रशिक्षण शिबिरामुळे प्रशिक्षित बालकलावंत तयार होऊन त्यांचा विकास होईल व भविष्यात नंदुरबार जिल्ह्याचे नाव नाट्य क्षेत्रात उंचावेल, असे मत संगीत दिग्दर्शक चंद्रशेखर चव्हाण यांनी व्यक्त केले.

ते नंदुरबार येथे राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत बालनाट्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रशिक्षण शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलत होते.

येथील हॉटेल डीएसके रेसिडेन्सीमध्ये राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे ६ ते १५ या वयोगटातील नवोदित बालकलाकारांसाठी बालरंगभूमीचे जतन व संवर्धन करून नवीन बालकलाकार तयार व्हावेत, या हेतूने सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सांस्कृतिक कार्य संचालक श्रीराम पांडे यांच्या नियोजनाखाली दहादिवसीय बालनाट्य प्रशिक्षण शिबिर घेण्यात



आले.

शिबिराच्या समारोपप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून संगीत दिग्दर्शक चंद्रशेखर चव्हाण यांच्यासमवेत सिनेअभिनेते रणजित राजपूत, मौखिक साहित्य परिषदेचे संयोजक भीमसिंग वळवी, नाट्यकर्मी मनोज सोनार, बालरंगभूमी परिषद नंदुरबार जिल्हा शाखेचे अध्यक्ष राजेश जाधव, प्रशांत कोटेचा, समन्वयक नाट्यकर्मी नागसेन पेंढारकर आदी उपस्थित होते.

रणजित राजपूत म्हणाले की, बालनाट्य प्रशिक्षण म्हणजे बालकलावंतांसाठी महत्त्वाचा पाया आहे. यातून कलावंतांना शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळाले असेल, यात शंका नाही. शिबिरात १० दिवसात सुजय भालेराव (नेपथ्य), योगेश शुक्ल (रंगभूषा व वेशभूषा), आसेफ अन्सारी (प्रकाशन योजना), राहुल खेडकर (उत्स्फूर्त अभिनय), सिनेअभिनेत्री वैशाली दाभाडे (अभिनय व आवाज जोपासना), अमजद सय्यद (दिग्दर्शन व कलात्मकता), प्रकाश पारखी (लेखन, एकपात्री, नाट्यछटा), मनोज सोनार (तालीम, संघिकता व एकाग्रता) यांनी प्रशिक्षण दिले.

शिबिरात ३५ बालकलावंतांनी सहभाग नोंदविला. समारोपप्रसंगी बालकलाकारांनी तीन लघुनाटिकांचे प्रभावी सादरीकरण करून रसिक-प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी जिया फातेमा अन्सार शेख, श्रवण स्वप्नील वाणी, सर्वेश गोविंद सूर्यवंशी, वेदांत दिलवरसिंग ठाकरे, मेहक महेश नवले, रुजल महेश गुरव, पल्लवी भरत पाटील या बालकलाकारांनी व पालकांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी सहभागी बालकलाकारांना प्रमाणपत्र देण्यात आले. समन्वयक नागसेन पेंढारकर यांनी प्रास्ताविक केले. रेवा रवींद्र पवार व अथर्व किरण दाभाडे यांनी सूत्रसंचालन केले. युक्ता धीरज खैरनार या बालकलाकाराने आभार मानले.

## डी. आर. हायस्कूलमध्ये चिमणी दिनानिमित्त विविध स्पर्धा



**नंदुरबार :** येथील श्रीमती दुर्गाबाई रघुवंशी हायस्कूलमध्ये जागतिक चिमणी दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी चित्ररंगभरण, निसर्गातील वनौषधींची माहिती संकलन करणे, युद्धाचे हवामानावर होणारे परिणाम यावरील कात्रण स्पर्धा, तसेच चिमणीसोबत सेल्फी घेणे या स्पर्धा घेण्यात आल्या.

मुख्याध्यापक मोहन अहिरराव अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून वनपरिक्षेत्र अधिकारी अरुण माळके, वनपाल प्रकाश पवार, उपमुख्याध्यापक श्रीराम मोडक, पर्यवेक्षक संजय सैंदाणे, नीलेश गावित, दिनेश वाडेकर उपस्थित होते.

अरुण माळके यांनी निसर्गाचे जतन व संवर्धन करावे, चिमण्यांच्या घरट्यांची काळजी घ्यावी, उन्हात त्यांना दाण्यापाण्याची सोय करावी, असे मार्गदर्शन केले. उपमुख्याध्यापक श्रीराम मोडक यांनी हवामान बदलाचे पक्ष्यांवर होणारे परिणाम यावर मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक मोहन अहिरराव यांनी पर्यावरणाचे संरक्षण करावे, पाणी वाचवावे. जेणेकरून पक्षी वाचतील, असे सांगितले.

विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धाही घेण्यात आल्या. पाचवीसाठी चित्ररंगभरण स्पर्धेत त्रैलोक्य कुलकर्णी प्रथम, कन्हैया कुमावत द्वितीय, सहावीसाठी निसर्गातील वनौषधींची माहिती संकलन करणे स्पर्धेत तन्वीश पाटील प्रथम, प्रशील चव्हाण द्वितीय, सातवीसाठी युद्धाचे हवामानावर होणारे परिणाम यावरील कात्रण स्पर्धेत ईशांत कोल्हे प्रथम, खुशाल गावित द्वितीय, आठवीसाठी चिमणीसोबत सेल्फी स्पर्धेत जितेश चव्हाण प्रथम, पार्थ कोकणी द्वितीय आला. विद्यार्थ्यांना सामाजिक वनीकरण विभागातर्फे सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. सुझलॉन कंपनीकडून विद्यार्थ्यांना पक्ष्यांचे घरटे भेटस्वरूपात देण्यात आले. लायन्स क्लबतर्फे दिनेश वाडेकर यांनी विद्यार्थ्यांना बर्ड फिडर दिले. चंद्रशेखर पाटील यांनी सूत्रसंचालन केले. रवींद्र पाटील यांनी प्रास्ताविक केले. नितेश ठाकरे यांनी परिचय करून दिला. शशिकांत हजारी यांनी बक्षीस यादीचे वाचन केले. प्रशांत पाटील यांनी आभार मानले.



## पाणीपुरवठा योजनेच्या शाश्वततेसाठी ग्रामस्थांत स्वमालकीची भावना गरजेची

### आमदार आमश्या पाडवी : अंबाबारी येथे जलअर्पण कार्यक्रम

**नंदुरबार :** जलजीवन मिशनअंतर्गत अंबाबारी (ता. अक्कलकुवा) गावासाठी करण्यात आलेली नळ पाणीपुरवठा योजना ही शासनाची नसून, ती ग्रामस्थांची आहे. योजनेतून कायमस्वरूपी शुद्ध, नियमित व पुरेसे पाणी मिळण्यासाठी त्याची नियमित देखभाल- दुरुस्तीची जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे. त्यासाठी सर्वांनी ग्रामपंचायतीला पाणीपट्टी वेळेवर भरून सहकार्य करावे. तसेच योजनेतून पाणीपुरवठा शाश्वत राहण्यासाठी ग्रामस्थांमध्ये स्वमालकीची भावना रुजवावी, असे आवाहन आमदार आमश्या पाडवी यांनी केले.

पाणीपुरवठा योजना अधिक शाश्वत व मजबूत करण्यासाठी आणि योजनेमध्ये सामुदायिक सहभाग वाढविण्यसाठी केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालय व राज्य शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सूचनांनुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्या मार्गदर्शनात ८ ते २२ मार्चदरम्यान 'जलमहोत्सव' उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार अंबाबारी (ता. अक्कलकुवा) येथे अक्कलकुवा-अक्राणी मतदारसंघाचे आमदार आमश्या पाडवी यांच्या प्रमुख उपस्थितीत जल अर्पण कार्यक्रम घेण्यात आला.

या वेळी आमदार पाडवी म्हणाले की, नळ पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झाले असून, योजनेचे ग्रामपंचायतीकडे हस्तांतरण करण्यात येत आहे. योजनेतून शुद्ध, मुबलक पिण्याचे पाणी ग्रामस्थांना देण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची असली, तरी पाणीपुरवठा उपांगांची देखभाल करून योजनेविषयी ग्रामस्थांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण झाली तरच योजना शाश्वत राहील. यासाठी सर्वांनी ग्रामपंचायत प्रशासनाला सहकार्य करून वेळेवर पाणीपट्टी भरावी, असे आवाहनही त्यांनी केले.

या वेळी विद्यार्थी व ग्रामस्थांनी गावातून जलदिंडी काढून योजनेविषयी ग्रामस्थांमध्ये जाणीव-जागृती केली. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अजय पाटील यांनी प्रास्ताविक केले. यानंतर आमदार पाडवी यांच्या हस्ते जलपूजन करण्यात येऊन पाणीपुरवठा योजनेचे उद्‌घाटन करण्यात आले. या वेळी कार्यकारी अभियंता अजय पाटील, अक्कलकुवा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विजय अहिरे, सरपंच विद्या तडवी यांच्या हस्तेही जलपूजन करण्यात आले. कार्यक्रमाला उपअभियंता तुषार वाघ, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे शाखा अभियंता नीलेश तडवी, ग्रामपंचायत अधिकारी गुलाबसिंग वळवी, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

## श्रॉफ हायस्कूलमध्ये प्लास्टिकमुक्तीचा संदेश

### विद्यार्थ्यांकडून रिड्यूस, रीयूज अन् रीसायकलचा अवलंब

**नंदुरबार :** शहरातील श्रीमती हि. गो. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातर्फे पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टिकोनातून राबविण्यात येत असलेल्या 'प्लास्टिकमुक्त नंदुरबार' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांकडून प्लास्टिकचा रिड्यूस, रीयूज आणि रीसायकलचा अवलंब केला जात असून, त्यातून प्लास्टिकमुक्तीचा संदेश दिला जात आहे.



श्रीमती हि. गो. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टिकोनातून 'प्लास्टिकमुक्त नंदुरबार' अभियान राबविण्यात येत आहे. याद्वारे विद्यार्थी आपापल्या घरी निर्माण होणारे स्वच्छ प्लास्टिक इतरत्र न फेकता एकत्र करून ठेवतात. विद्यार्थ्यांनी एकत्र केलेले प्लास्टिक शाळेत नित्याने संकलित करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या प्लास्टिकचा पुनर्वापर करून विविध शालेय उपयोगी वस्तू बनविण्यात येतात. प्लास्टिक संकलन व पुनर्वापराचा पहिला टप्पा नुकताच पार पडला. या वेळी प्राचार्या सुषमा शाह, अल्केमी पॉलिवूडचे संचालक वसीम काझी, रोटरी क्लबचे अध्यक्ष फादर टेनी, डॉ. निर्मल गुजराथी, देवेंद्र उपासनी, उपमुख्याध्यापक प्रशांत बागुल, पर्यवेक्षिका सीमा पाटील व पर्यवेक्षक भिकू त्रिवेदी उपस्थित होते.

रोटरी क्लब ऑफ नंदुरबारच्या प्लास्टिक एन्व्होक्लीन-नंदुरबार या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत शाळेतील पाचवी ते सातवीच्या सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी आपापल्या घरी दैनंदिन जीवनात निर्माण होणारे प्लास्टिक इतरत्र न फेकता जमा करून ठेवले. प्लास्टिक शाळेमध्ये संकलित करण्यात आले. प्लास्टिक अल्केमी पॉलिवूड या प्लास्टिकचा पुनर्वापर करणाऱ्या कंपनीकडे सुपूर्द करण्यात आले. कंपनीने या प्लास्टिकचा पुनर्वापर करून शालेय उपयोगात येणाऱ्या विविध वस्तू बनविल्या. त्यात कचराकुंडी, खुर्ची व अभ्यागताना बसण्यासाठीचे बाक आदी वस्तूंचा समावेश आहे.

रोटरी क्लब ऑफ नंदुरबार व अल्केमी पॉलिवूड यांनी नुकत्याच या वस्तू सार्वजनिक स्तरावर शाळेकडे सुपूर्द केल्या. चिमुकल्यांचा आदर्श घेत शाळेत सर्वच विद्यार्थी व शिक्षक सातत्याने प्लास्टिकचे संकलन करीत आहेत. यासंदर्भात शाळेने अल्केमी पॉलिवूड कंपनीसोबत नियमितरीत्या प्लास्टिकचे संकलन व त्याचा पुनर्वापर करण्याचा करारही केला आहे. या उपक्रमाने पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टिकोनातून नंदुरबार शहरात एक आदर्श निर्माण केला आहे.

शाळेतील शिक्षक राहुल वडनेरे व वैभव पाटील यांनी प्लास्टिक संकलनासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उपक्रमासाठी मीना नंदवाळकर, गीता महाजन, प्रतिभा साळुंखे, हर्षिता पाटील, केशव राजभोज, गिरीश चव्हाण, देविदास पाटील, नरेंद्र सूर्यवंशी, सुनील गिरासे व हेमचंद्र मराठे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.



## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : २०/०३/२०२६ **वार** : शुक्रवार **शके** : १९४७
**अयन** : उत्तर **ऋतू** : वसंत **मास** : चैत्र **पक्ष** : शुक्ल **महिना** : मार्च
**संवत** : २०८२ **अयनांश** : २४-१३-२६ **तिथी** : द्वितीया **नक्षत्र** : रेवती
**योग** : ब्रह्म **करण** : बालव **सूर्योदय** : ६.४७ **सूर्यास्त** : १८-४७
**चंद्रराशी प्रवेश** : मीन **शुभाशुभ** : शुभ

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : कारण नसतांना खर्च वाढणार आहे.
**वृषभ** : दूजवरांना स्थळे येतील.
**मिथून** : वडिलांसोबत केलेले कार्य भाग्यकारक ठरेल.
**कर्क** : विद्यार्थी वर्गास यश मिळेल.
**सिंह** : कार्य करतांना अचानक समस्या येतील.
**कन्या** : कौटुंबिक कार्यासाठी वेळ द्याल.
**तुला** : व्यापारी वर्गास उत्तम दिवस येणार.
**वृश्चिक** : आपली प्रगती आश्चर्यदायक ठरेल.
**धनू** : कुटुंबातील सदस्या व्यतिरिक्त इतर जणांचा त्रास वाढेल.
**मकर** : कामामध्ये अडचणी येतील.
**कुंभ** : आर्थिक प्रगती पुस्तक उत्तम राहील.
**मीन** : आपण कसे वागतात याचे परिक्षण होईल.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु.पो. रावेर, जि. जळगाव, मोबा. ९८५००१५५५८**

## थोडक्यात महत्त्वाचे.....



### व्यास धनवर्षा बँकेचे गणेश बुरुजताले तज्ज्ञ संचालक

**यावल** : येथील श्री व्यास धनवर्षा सहकारी बँकेच्या तज्ज्ञ संचालकपदी जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे निवृत्त अधिकारी गणेश जगन्नाथ बुरुजवाले यांची नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत सर्वानुमते निवड करण्यात आली. गणेश बुरुजवाले यांनी जिल्हा बँकेत विविध पदांवर ३७ वर्षे सेवा बजावली आहे. याप्रसंगी गणेश बुरुजवाले यांनी संचालक मंडळाचे आभार मानले व आपण आपल्या अनुभवाचा फायदा बँकेला करून देऊ, असे सांगितले. बँकेचे अध्यक्ष हेमंत चौधरी, उपाध्यक्ष शरद यावलकर, संचालक जगदीश कवडीवाले, महेश वाणी, यशवंत सोनवणे, तेजस यावलकर, सुनीता गडे, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाणी यांच्यासह संचालक व कर्मचारी उपस्थित होते.



### जे. टी. महाजन इंग्लिश स्कूलमध्ये गुढीपाडवा उत्साहात

**यावल** : येथील जे. टी. महाजन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये गुढीपाडवा सण उत्साहात झाला. प्राचार्या दीपाली धांडे अध्यक्षस्थानी होत्या. प्राचार्या रंजना महाजन, पर्यवेक्षिका गौरी भिरूड, लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते गुढीपूजन व सरस्वतीमाता प्रतिमापूजन करण्यात आले. मांगल्याची सजवलेली गुढी विद्यार्थ्यांचे तसेच शिक्षकांचे लक्ष वेधून घेत होती. याप्रसंगी शिक्षिका माधुरी भारंबे, प्रीती भंगाळे यांनी गुढीपाडव्याचे महत्त्व व माहिती दिली. प्राचार्या दीपाली धांडे यांनी गुढीपाडव्याचे महत्त्व सांगितले. वैशाली अडकमोल यांनी सूत्रसंचालन केले. डिम्पल इंगळे यांनी आभार मानले.

### शिंदी स्मशानभूमीत रोप लागवड लवकरच

**भुसावळ** : तालुक्यातील शिंदी येथील स्मशानभूमीच्या विकास कामांतर्गत



जमीन सपाटीकरणाचे काम प्रगतीपथावर असून लवकरच आगामी काळात तेथे वृक्ष रोप लागवड करण्यात येणार आहे. ओसाड खडकाळ परिसरात असलेल्या या स्मशानभूमीचा सामाजिक कार्यकर्ते किरण जाधव यांच्या प्रयत्नांमुळे विकास केला आहे. काही महिन्यांपूर्वी रस्त्याचे काम सुरू असताना त्या ठिकाणाहून निघणारे दगड, माती येथील स्मशानभूमी परिसरात भर टाकण्यासाठी आणण्यात आले होते. या भरावाचे जेसीबीच्या मदतीने समतलीकरण करण्याचे काम हाती घेतले असून लवकरच येत्या पावसाळ्यात या ठिकाणी दीर्घकाळ सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड केली जाईल, ज्यामुळे परिसर अधिक सुंदर आणि पर्यावरणपूरक बनेल असे किरण जाधव यांनी सांगितले.

### अस्मिता खेलो इंडिया फेन्सिंग लीग

**भुसावळ** : खेलो इंडिया अंतर्गत व क्रीडा मंत्रालयाने महिलांच्या क्रीडा सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी अस्मिता खेलो इंडिया फेन्सिंग लीग सुरू केली आहे. या उपक्रमात फेन्सिंग हा खेळ समाविष्ट आहे. भारतातील विविध शहरांत अस्मिता खेलो इंडिया फेन्सिंग लीग आयोजित केले जात असून भुसावळ येथे २८ मार्च रोजी सेंट अलॉयसेस स्कूल, भुसावळ येथे आयोजित स्पर्धेत जास्तीत जास्त महिला खेळाडू यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जळगाव जिल्हा तलवारबाजी संघटनेचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत सोनवणे, जळगाव जिल्हा तलवारबाजी संघटनेचे सचिव प्रशांत जगताप, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त डॉ प्रदिप तळवेलवर, प्रा. डॉ. संजय चौधरी, गोरख सुर्यवंशी, मेघाश्याम शिंदे यांनी केले आहे. या स्पर्धेतून निवड झालेले महिला खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होतील या लीगचा उद्देश महिला खेळाडूंना संधी देणे आणि नवीन प्रतिभा शोधणे असून या स्पर्धेतून खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर स्पर्धेची संधी, प्रतिभावान खेळाडूंची निवड, क्रीडा प्रशिक्षण आणि पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी मार्ग सुकर होणार असून या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### ममता पाटील यांना दामिनी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**न्हावी (ता. यावल)** : येथील मूळ रहिवासी व महाराष्ट्र राज्य खादी व



ग्रामोद्योग विभागाचे (मुंबई) राज्यमंत्री रवींद्र साठे यांच्या स्वीय सहाय्यक ममता यशवंत पाटील (ह. मु. तारापूर, जि. पालघर) यांना उद्योग व सामाजिक क्षेत्रातील विशेष उल्लेखनीय कार्याबद्दल महिला दिनानिमित्त दामिनी राष्ट्रीय पुरस्कार- २०२६ प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळा नाशिक येथील शालिमार चौकातील रोटरी क्लब सभागृहात झाला. ममता पाटील यांना हा पुरस्कार मिसेस इंडिया तसेच मिसेस इंटरनॅशनल (दुबई) अश्विनी अत्रे- दीक्षित यांच्या हस्ते देण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे उपस्थित होते. त्यांचा पुरस्काराबद्दल सुदाम पाटील, प्रा. एन टी तळेले, प्रा. आर वाय. पाटील, अनिल लढे, प्रा. एल. डी. चौधरी, प्रा. देवेंद्र पाचपांडे, किशोर झोपे, युवराज वाघुळदे, प्रमोद चौधरी, यशवंत पाटील, ललितकुमार फिरके आदींनी गौरव केला.

# भुसावळला खडका चौक परिसर अस्वच्छतेच्या विळख्यात!

## रहिवाशांचे आरोग्य 'सलाइन'वर; कचरा, गटार अन् रस्त्यांच्या अभावामुळे त्रस्त

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १९ मार्च**

शहरातील खडका चौक परिसरातील गॅलेक्सी हॉटेलच्या मागील भागात असलेल्या आयान कॉलनी, जिया कॉलनी, अली रजा कॉलनी, फातिमा कॉलनी आणि हलिमा मस्जीद कॉलनी परिसरात कचरा, गटार व रस्त्यांच्या समस्येमुळे रहिवाशांना जगणे अक्षरशः कठीण झाले आहे. अनेक वेळा पालिका प्रशासनाकडे निवेदने देऊनही या भागातील मूलभूत समस्या अद्याप कायम असल्याची तीव्र नाराजी रहिवाशांनी व्यक्त केली आहे.





शहरातील खडका चौक परिसरात घरगुती कचरा, प्लास्टिक, अन्नाचे उरलेले पदार्थ व इतर कचरा मोठ्या प्रमाणात साचत असल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. पालिकेची फिरती कचरा गाडी नियमित येत नसल्यामुळे रहिवाशांना खुल्या जागेत कचरा टाकण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. त्यामुळे परिसर दिवसेंदिवस अधिक दूषित होत असून, रहिवाशांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

साचलेल्या कचऱ्यामुळे माशा, डास आणि किटकांचे प्रमाण वाढले असून, डेंग्यू, मलेरिया, टायफॉईड, कॉलरा, अतिसार तसेच त्वचारोग यांसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला आहे. विशेषतः येणाऱ्या पावसाळ्यात नाल्यांची योग्य व्यवस्था नसल्याने पाणी साचण्याची समस्या आणखी तीव्र होण्याची भीती रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

सध्या परिसरात नाल्यांची सुविधा नसल्यामुळे काही रहिवाशांना घरासमोर खड्डे करून त्यामध्ये सांडपाणी सोडावे लागत आहे. त्यामुळे दुर्गंधी पसरत असून, आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय परिसरात रस्त्यांची योग्य व्यवस्था नसल्याने रहिवाशांना रोज ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**रमजानमध्येही समस्या कायम**

मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरू असतानाही मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याने या भागातील रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी आहे. स्थानिक आमदार आणि नगरसेवकांनी परिसराला भेट देऊन आश्वासने दिली असली, तरी अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना झाली नाही, अशी तक्रार रहिवाशांनी केली आहे.

**मुलांच्या आरोग्याचीही चिंता**

परिसरात एमआय तेली इंग्लिश स्कूल असल्यामुळे शहरासह आसपासच्या गावांमधून अनेक विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात. मात्र, परिसरातील अस्वच्छता आणि दुर्गंधीमुळे शाळकरी मुलांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची भीती पालक आणि रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

### प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी

स्वच्छता राखण्याची जबाबदारी आम्हीही घेण्यास तयार आहोत. मात्र, आमच्याकडे रस्ता नाही, गटारांचा अभाव आहे आणि कचरा उचलण्यासाठी गाडीही येत नाही. मग स्वच्छता कशी राखायची, असा सवाल रहिवाशांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे प्रशासनाने या परिसराची तातडीने दखल घेऊन रस्ते, गटार व कचरा व्यवस्थापनाची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी रहिवाशांमधून जोर धरत आहे.

# केळी पीकविमा घोटाळा

## रावेरमध्ये चार तर मुक्ताईनगरमध्ये पाच जणांवर गुन्हा दाखल, रावेरमध्ये दोन जण रडारवर

**तभा वृत्तसेवा**
**रावेर/जळगाव १९ मार्च**

शासनातर्फे तालुक्यात राबविलेल्या केळी पीकविमा योजनेत सुमारे चार कोटी ७४ लाखांचा घोटाळा झाल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी रावेर पोलीस ठाण्यात चार तर मुक्ताईनगर तालुक्यात तब्बल सहा कोटी ६५ लाख रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पाच सीएससी सेंटर चालकांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याने परिसरात एकच खळबख उडाली आहे. तर रावेरमध्ये अजून दोन जण विभागाच्या रडारवर असल्याचे प्रशासन सुत्रांनी म्हटले आहे.

रावेर तालुक्यात विमा कंपनीतर्फे केळीसाठी अंबिया बहार विमा योजना राबविण्यात आली होती. या योजनेत शेतकऱ्यांतर्फे सहभाग नोंदविला जातो. पीकविम्याचा अर्ज सीएससी सेंटरमार्फत पीकविमा कंपनीकडे सादर केला जातो. मात्र, एमआरसाक प्रणालीने केलेल्या पडताळणीत तालुक्यातील शेकडो हेक्टर क्षेत्रातील केळी पिक आढळून आले नाही. त्यामुळे या क्षेत्रातील पीकविमा जास्तीचा आढळून आला आहे. तालुक्यातील जयेश कोळी (रावेर), विजय पाटील (तामसवाडी), प्रफुल्ल सराफ (रावेर) व हर्षल पाटील (अटवाडे) या सीएससी सेंटरचालकांनी शासनाचा विश्वासघात करून फसवणूक केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध बुधवारी (१८ मार्च) रावेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुका कृषी अधिकारी भाऊसाहेब वाळके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पीकविमा घोटाळ्यातील अनेक चेहरे पोलीस चौकशीतून समोर येणार आहेत. पीकविम्याच्या घोटाळा प्रकरणी गुन्हा दाखल झाल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे.

### मुक्ताईनगरमध्ये पाच सीएससी सेंटरवर कारवाई

मुक्ताईनगर तालुक्यात शासनाची तब्बल सहा कोटी ६५ लाख रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी मंडळ कृषी अधिकारी प्रथमेश थोरात यांनी पाच सीएससी सेंटर चालकांवर गुन्हा दाखल केला आहे. यात निलेश शांताराम पाटील ( रा. उचंदे, ता. मुक्ताईनगर), अनिरूध्द तुकाराम अहिरे रा. मुक्ताईनगर, चिरायू भुवनेश्वर चौधरी रा. मुक्ताईनगर, विजय रामदास पाटील रा. अंतुर्ली आणि डिगंबर सुकदेव चौधरी रा. कर्की या पाच जणांचा समावेश आहे. याठिकाणी पीक विम्याचा गैरफायदा घेत शासनाची ३,७८,३९,४५२ रूपये तर केंद्र शासनाची २,८६,६६,२५२ रूपये अशी तब्बल ६ कोटी ६५ लाख पाच हजार सातशे चार रूपयांची फसवणूक केल्याचे मंडळ कृषी अधिकारी यांच्या तक्रारीत म्हटले आहे.



# वर्षप्रतिपदेनिमित्त अमळनेरला सघोष पथसंचलन

**तभा वृत्तसेवा**
**अमळनेर, १९ मार्च**

येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने वर्षप्रतिपदेनिमित्त सघोष पथसंचलन उत्साहात काढण्यात आले. प्रताप मिल कंपाऊंड येथे स्वयंसेवक एकत्र जमले. प्रारंभी गणशः सर्वांचे संपत करण्यात आले. त्यानंतर ध्वजारोहण व संघ प्रार्थना झाल्यानंतर संचलनास सुरुवात झाली.

संचलनात सर्वात पुढे भगवा ध्वज, त्यानंतर गण एक व दोन, त्यापाठोपाठ घोष पथक आणि त्यानंतर गण तीन ते सहा अशा शिस्तबद्ध रचनेत स्वयंसेवक सहभागी झाले होते. प्रताप मिल कंपाऊंड येथून कॉलेज रोड, धुळे रोड, भगवा चौक, मराठा मंगल कार्यालय, महाराणा प्रताप चौक, कचेरी रोड, बजरंग सुपर शॉप मार्गे पुन्हा प्रताप मिल कंपाऊंड येथे संचलनाची सांगता झाली.

संचलन मार्गावर ठिकठिकाणी नागरिकांनी आकर्षक रांगोळ्या काढून तसेच फुलांचा वर्षाव करून स्वयंसेवकांचे स्वागत केले. सर्व स्वयंसेवक गणवेशात शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी झाले होते.

संचलनानंतर वर्षप्रतिपदेचा उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी आद्य सरसंघचालकांना प्रणाम करण्यात आला. प्रास्ताविक राजेंद्र शिंदे यांनी केले. जिल्हा संघचालक डॉ. मनोज साळुंखे यांनी संघरचनेतील विविध जबाबदाऱ्यांची घोषणा केली. यानंतर सांघिक पद्य, अमृतवचन व सुभाषितांचे सादरीकरण झाले. वैयक्तिक पद्य दिनेश पाटील, प्रमुख वक्ते व अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य व्यंकयाजी भागयाजी यांनी बौद्धिक मार्गदर्शन करताना वर्षप्रतिपदेचे महत्त्व, विक्रमादित्य-शालिवाहन परंपरा, तसेच स्वयंसेवकांच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाची गरज यावर मार्गदर्शन करीत पंचपरिवर्तन व समरसतेचे महत्त्व आणि संघ समजून घेण्यासाठी शाखेत सहभागी होण्याचे आवाहन केले. संघ प्रार्थनेनंतर कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# अमळनेरला हिंदू नववर्षानिमित्त भव्य शोभायात्रा

**अमळनेर, १९ मार्च**

हिंदू नववर्ष गुढीपाडवा निमित्त येथे हिंदू नववर्ष स्वागत समिती, अमळनेर यांच्यावतीने २२ व्या वर्षीची भव्य गुढी उभारून तसेच प्रताप शेट यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून शोभायात्रेस सुरुवात करण्यात आली.

प्रताप मिल येथील बंसीलाल पॅलेस येथून निघालेल्या शोभायात्रेत गायत्री परिवार, प्रजापती ब्रह्मकुमारी, आर्मी स्कूल, तुकाराम महाराज, स्वामी नारायण, विश्व हिंदू परिषद, भगवान महावीर, अग्रेसन महाराज, प्रताप महाविद्यालय, स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूल, फार्मसी स्कूल, क्षेत्रीय माळी समाज, गाडगेबाबा तसेच श्री गजानन महाराज मंदिर आदी विविध संस्था व मंडळांच्या आकर्षक रथ-झांक्यांनी सहभाग घेतला.

ढोल-ताशांच्या गजरात, घोषणाबाजी व पारंपरिक व धार्मिक वातावरणात शहरातील तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग होता. 'जय श्रीराम' 'भारत माता की जय' आदी घोषणा देत शोभायात्रा शहरातील विविध प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत असताना नागरिकांनी ठिकठिकाणी पाणी, शरबत व नाश्त्याची व्यवस्था केली होती. तसेच घरासमोर रांगोळ्या काढून व गुढी उभारून नववर्षाचे स्वागत करण्यात आले.

शोभायात्रा प्रताप मिल, स्टेशन रोड, स्वामी नारायण मंदिर, सुभाष चौक, राणी लक्ष्मीबाई चौक, दगडी दरवाजा, सराफ बाजार, वाडी चौक, माळी वाडा, झामी चौक पोलीस चौकी, राजहंस चौक, पवन चौक, तिरंगा चौक, पाचपावली देवी मंदिर, कोंबडी बाजार, विजय शॉपी, पोस्ट ऑफिस, बजरंग सुपर मार्केट मार्गे श्री संकटमोचन हनुमान मंदिर येथे मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात येवून समारोप करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वितेसाठी हिंदू नववर्ष स्वागत समितीच्या पदाधिकारी, बजरंगशेठ अग्रवाल, डी. डी. पाटील व नीरज अग्रवाल यांनी सहभाग घेत विशेष परिश्रम घेतले. सहभागी नागरिकांचे आभार मानले.



# भुसावळ पालिकेची सर्वसाधारण सभा वादळी

## प्रसारमाध्यमांना सभागृहात बसण्यास प्रशासनाचा मज्जाव

**भुसावळ** : येथील पालिकेची तिसरी सर्वसाधारण सभा १३ मार्चला दुपारी चारला सत्ताधारी-विरोधक एकमेकांशी भिडल्यानंतर तहकूब झाली होती. ती सभा १७ मार्चला घेण्यात आली. सभा वादळी होणार असल्याचे गृहीत धरून पोलीस प्रशासनाने पालिका आवारात बंदोबस्त ठेवला होता.

मात्र, सभा सुरू झाल्यानंतर पत्रकारांना प्रतिनिधी सभागृहात दाखल झाल्यानंतर त्यांना पालिका प्रशासनाच्या अभियंत्यांनी नगराध्यक्षांच्या सूचनेवरून सभागृहात बसण्यास मनाई केल्याचे जाहीर केला. त्याचा पत्रकारांनी या प्रकाराचा तीव्र शब्दात निषेध करीत सभागृह सोडले. गतवेळी तहकूब सभा होणार असल्याने या सभेकडे नागरिकांचे लक्ष लागले होते. सभेला सुरुवात होताच भाजप पदाधिकाऱ्यांनी नगराध्यक्षांना निवेदन देण्याचा प्रयत्न केला. मात्र, यावेळी सत्ताधारी नगरसेविकेने यास विरोध केल्यानंतर आधी महिलांमध्ये व नंतर पुरुष नगरसेवकांमध्ये शाब्दिक वादाला सुरुवात झाली.

या वेळी विरोधातील भाजप व सत्ताधारी नगरसेवक समोरासमोर आल्यानंतर शाब्दिक वादामुळे गोंधळ वाढून सभागृहात तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिस्थिती अधिक गोंधळाची झाल्यानंतर नगराध्यक्षा गायत्री भंगाळे व माजी आमदार संतोष चौधरी यांनी दालन सोडले व त्यानंतर सत्ताधारीही सभागृहाबाहेर पडले.

# गुढीपाडव्यानिमित्त नशिराबादमध्ये रा. स्व. संघाचे पथसंचलन

**नशिराबाद (ता. जळगाव)** : येथे गुढीपाडव्यानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या झिपरू अण्णानगर तालुका शाखेतर्फे गुरुवारी (१९ मार्च) सकाळी साडेआठला पथसंचलन करण्यात आले होते. पथसंचलनाचे नेतृत्व भादली बुद्रुक (ता. जळगाव) येथील मुकेश रवींद्र सोनवणे यांनी केले.



गावातील चौबे ग्राउंडपासून प्रारंभ झालेल्या पथसंचलनाने ग्रामपंचायत चौक, शिवाजी महाराज चौक, जुनी युनियन बँक परिसर, सावता महाराज मंदिर खालची आळी, बसस्थानक, पोलीस ठाणे, रामपेठ चौक, साती बाजार, उंचआड, होळी मैदानमार्गे आठवडे बाजार, कुंभार दरवाजा व इंदिरा चौक असे मार्गक्रमण करीत पुन्हा चौबे ग्राउंडवर सकाळी सव्वानऊला शांततेत समारोप झाला.

पथसंचलनात सुमारे १२५ ते १५० स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पथसंचलनामुळे नशिराबाद शहरात नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. या वेळी नशिराबाद पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे उपस्थित होत्या. तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# धरणगावात हिंदू नववर्षाचे जल्लोषात स्वागत

## शहरातून भव्य मिरवणूक; महाराणा प्रताप चौकात गुढीपूजन

**तभा वृत्तसेवा**
**धरणगाव, १९ मार्च**

येथील बालाजी वाहन व्यवस्थापक मंडळाच्यावतीने शहरातून भव्य मिरवणूक काढून मराठी नववर्षाचे म्हणजेच चैत्र शुक्ल प्रतिपदेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.



सर्व प्रथम बालाजी मंदिरा जवळील महाराणा प्रताप चौकात गुढीचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी नगराध्यक्ष लीलाताई चौधरी, वाहन व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष डी. आर. पाटील, उपाध्यक्ष गुलाबराव वाघ, सचिव प्रशांत वाणी, जीर्णोद्धार समितीचे कार्याध्यक्ष जीवन बयस, माऊली वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हभप महामंडलेश्वर भगवानदास महाराज, ज्ञानाई वारकरी संस्थेचे अध्यक्ष हभप हिरालाल महाराज, श्री संतकृपा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हभप नाना महाराज, चर्मकार महासंघाचे कार्याध्यक्ष भानुदास विसावे, शहर विकास आघाडीचे गटनेते निलेश चौधरी, महाराष्ट्र जनविकास आघाडीचे गटनेते विलास महाजन, मच्छिंद्र पाटील, नगरसेविका हेमांगी अग्निहोत्री, माळी समाजाचे अध्यक्ष व्ही.टी. माळी, नाना पाटील, मराठे समाजाचे अध्यक्ष दिलीप मराठे, ललित उपासनी, शिरीष बयस, प्रथम सूर्यवंशी, आनंद बजपाई, बाळू जाधव, सुधाकर येवले, माजी नगरसेवक ललित येवले, कैलास माळी, ॲड.वसंतराव भोलाने, चंद्रकांत अमृतकर, पंडित चौधरी, कडू महाजन, धर्मराज मोरे, भगीरथ माळी, किरण अग्निहोत्री, अमोल महाजन, राजेंद्र महाजन, दीपक चौधरी, पूनीलाल महाजन, पापा वाघरे, गणेश भाटिया, सुनिल चौधरी, ॲड. महेंद्र चौधरी, नरेंद्र पाटील, एस.डब्लू. पाटील, डॉ.मनोज अमृतकर, पंकज अमृतकर, जितेंद्र परदेशी उपस्थित होते.

### भव्य मिरवणुकीने वेधले लक्ष

यावेळी शहरातून भव्य मिरवणुक काढण्यात आली. बालाजी मंदिरापासून या मिरवणूकीला सुरुवात होवून धरणी चौक, मुख्य बाजार पेठ, भावे गल्ली, परिहार चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, बस स्टॅन्ड, धनगर गल्ली, मातोश्री कॉम्प्लेक्स, गुप्ता वाडा, चारा बाजार, बजरंग चौकमार्गे पुन्हा बालाजी मंदिरात या मिरवणुकीचा समारोप करण्यात आला. त्यानंतर या ठिकाणी बालाजी महाराजांची आरती करण्यात आली. मिरवणुकीदरम्यान, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, लाल बहाद्दूर शास्त्री, संत रविदास महाराज आणि अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकाला मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करुन पूजन करण्यात आले. यावेळी राम आणि लक्ष्मण यांच्या वेशभूषेत दोन वेगवेगळ्या घोड्यांवर बसलेल्या प्रभास अमृतकर आणि आदेश सूर्यवंशी या बालकांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यशस्वीतेसाठी संचालक आर.डी. महाजन, राजेंद्र बागड, बाळकृष्ण येवले, संस्थेचे सचिव प्रशांत वाणी, सहसचिव अशोक येवले, खजिनदार किरण वाणी, संचालक श्याम भाटिया, गणेश सिकरवार आदींनी परिश्रम घेतले.